# प्रकरण तीन

## शिक्षण विभाग

**3.62 जिल्हा परिषद प्राथमिक व उच्च प्राथमिक विदयार्थ्यांसाठी कृती आधारीत अध्ययन सुरु करणे.**

**जिल्हा परिषद ठाणे, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 2) -** सदरबाबत रक्कम रूपये 5,93,04,988/- खर्च करण्यात आलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) जिल्हा परिषदेच्या ठरावाच्या आदेशावर क्रमांक व दिनांक नमूद नाही.

2) ई-निविदेची प्रत नस्तीत आढळून आली नाही. तसेच याबाबत नरेंद्र प्रॉडक्ट यांनी ही ई-निविदा संगणकावर दिसून आली नसल्याची तक्रार केलेली आहे. याबाबत खुलासा करावा.

3) जाहिरात खर्च रक्कम रुपये 99,663/- मध्ये दैनिक सकाळ व एस.बी.मिडीया यांना अनुक्रमे रुपये 3,120/- व रुपये 40,953/- असे एकूण रुपये 44,037/- दुबार प्रदान झालेले आहे. त्याचा खुलासा करावा.

4) प्राप्त झालेल्या निविदेची मुळ कागदपत्रे नस्तीत नसल्याने निविदा प्रक्रियेबाबत तपासणी करता आली नाही. तसेच निविदेचे तुलनात्मक विवरणपत्र नसल्याने दराची खात्री करता येत नाही. तसेच संगणकार प्री-बीड नंतर भरलेल्या गोषवाऱ्यात फक्त मे. आयडीया ॲडवरटाइझमेंट वगळता इतर पुरवठादार Rejected झालेले दिसतात. असे असतांना एक निविदा मंजूर कशी केली? पुन्हा जाहिरात देऊन फेरनिविदा का मागविण्यात आल्या नाहीत? याचा खुलासा करावा.

5) मे. आयडीया ॲडवरटाइझमेंट यांना दिलेल्या पुरवठा आदेशातील अट क्रमांक 8 नुसार पुरवठादाराची 1 वर्षाची बँक गॅरेटी घेणे आवश्यक आहे. नस्तीत बँक गॅरेटी दिसून आली नाही.

6) पुरवठा आदेशातील अट क्रमांक 9 (इ) नुसार पुरवठादाराने दिलेली सॉफ्ट प्रिंट शिक्षणाधिकारी यांनी तपासणे आवश्यक आहे. तशी कार्यवाही केलेली नस्तीत दिसून आली नाही.

7) साठा नोंदवहीत अध्ययन कार्ड व कॅश कार्ड हे डिलीव्हरी चलनाप्रमाणे नोंदवलेले दिसून येत नाहीत. दिनांक 12/07/2015 ला डिलीव्हरी चलनाप्रमाणे 500 नग प्रत्यक्षात प्राप्त झाले तर साठा नोंदवहीत 1500 नग प्राप्तीची नोंद कशी घेतली? याचा खुलासा करावा.

8) पुरवठादारास अदा केलेले मुळ देयक सोबत आवश्यक त्या सर्व कागदपत्रासंह लेखापरीक्षणास तपासण्याकरीता मिळाले नाही.

9) पुरवठा आदेशात पुरवठा दिनांक 26/07/2015 रोजी करणे आवश्यक असताना, जर पुरवठादारास त्या दिनांकापर्यंत पुरवठा करणे शक्य नसल्यास त्याने तसे त्या दिनांकापुर्वी कळविणे आवश्यक होते. मात्र त्यांने दिनांक 30/07/2015 रोजी विलंबाची कारणे नमुद न करता आपण विना दंडात्मक दिनांक 04/08/2015 रोजी कोणत्या प्राधिकरानुसार मुदतवाढ मंजूर केली याचा खुलासा करावा.

10) वाढीव डिझाईन (686 डिझाईन प्रती 1500 संच) किमंत रुपये 28,60,500/- यास जिल्हा परिषद समितीस अधिकार असल्याने मंजुरी दिलेली दिसून येते. वाढीव केलेली खरेदी कोणत्या आधारे केली? याबाबत कोणतीही कागदपत्रे नस्तीत नाही. सदर खरेदीस प्राथमिक शिक्षण संचालनालयाची मंजुरी घेतलेली दिसून येत नाही. तसेच त्याच ठेकेदारास कोणत्या प्राधिकारानुसार सदर खरेदीचे पुरवठा आदेश दिले.

11) नव्याने पुरवठा आदेश दिल्यामुळे रुपये 28,60,500/- किंमतीचा पुन्हा करारनामा करणे आवश्यक आहे. तसेच सुरक्षा अनामत रक्कम व मुद्रांक शुल्क आकारणे आवश्यक आहे. तशी कार्यवाही का केली नाही? याचा खुलासा करावा.

12) जिल्हा स्तरावरुन तालुक्यांना रुपये 24,06,270/- रक्कमेचे वित्तप्रेषण दिले आहे. तालुका स्तरावर केलेल्या खरेदीस व वाहतुक खर्चाच्या नस्त्या तसेच त्याचे utilization नस्तीत दिसून आले नाही.

13) प्राथमिक शिक्षण संचालनालयाच्या मंजुरी आदेशातील अट क्रमांक 7 नुसार खर्चाचा अहवाल आयुक्ताना तसेच शासनास सादर करावा असे नमुद असून त्याप्रमाणे कार्यवाही केलेली दिसून येत नाही.

**3.63 नवीन जिल्हा परीषद नर्सरी (इंग्रजी माध्यम सुरु करणे) यासाठी प्रदान करण्यात आलेल्या खर्चातील अनियमितता.**

**जिल्हा परिषद ठाणे, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 3) -** सदरबाबत रक्कम रूपये 9,84,000/- खर्च करण्यात आलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

शिक्षण विभाग, जिल्हा परिषद ठाणे विभागाच्या सन 2015-2016 च्या लेखापरीक्षणामध्ये नवीन जिल्हा परिषद नर्सरी व शिशुवर्ग मधील पर्यवेक्षक नर्सरी शिक्षक व मदतनीस यांचे मानधनावर रुपये 9,84,000/- इतका खर्च जिल्हा परिषद निधीतून केलेला आहे. सदर खर्चाची तपासणी केली असता खालील अभिप्राय देण्यात येत आहेत.

सन 2011-2012 ते 2014-2015 पर्यंत वेळोवेळी लेखापरीक्षणाने याबाबत आक्षेप घेऊन सन 2015-2016 मध्ये देखील सदर इंग्रजी माध्यम शाळेच्या नर्सरी शिक्षक व मदतनीस यांना शासन मान्यतेशिवाय जिल्हा परिषद निधीतून मानधन देण्यात येत आहे. महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम 1961 चे कलम 100 व 101 मध्ये नमूद केलेल्या योजनेव्यतिरीक्त इतर योजना घ्यावयाची असल्यास त्यास शासनाची मंजूरी घेणे आवश्यक आहे.

**3.64 केंद्र प्रमुखांना नियमबाह्यपणे प्रदान करणेत आलेला कायम प्रवास भत्ता व प्रवास भत्त्याबाबत.**

**जिल्हा परिषद पालघर, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 7) -** सन 2015-2016 चे वेतन देयकांची तपासणी केली असता केंद्र प्रमुखांना कायम प्रवासभत्ता दरमहा रक्कम रुपये 1,650/- तसेच प्रवास भत्त्यासाठी ग्रेड पे निहाय रकमेचे प्रदान करणेत आलेले आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) संचालक शिक्षण (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य यांच्याकडून केंद्र प्रमुखांना प्रवास भत्ता रक्कम रुपये 3,47,000/- अनुदान प्राप्त झाले असताना महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन निर्णय दिनांक 03/03/2010 अन्वये केंद्रप्रमुख पदांस कायम प्रवासभत्ता अनुज्ञेय नसल्याने देण्यात आलेला कायम प्रवास भत्ता दर प्रतिमहा रक्कम रूपये 1,650/- प्रमाणे जिल्ह्यामधील केंद्रप्रमुखांना देणेत आलेल्या कायम प्रवास भत्त्याची परिगणना करून जादा आदा रक्कम वसूल करून शासन सदरी भरणा करणे आवश्यक आहे.

2) महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, परिपत्रक क्रमांक वाहभ-1099/ प्र.क्र.45/ सेवा-5, दिनांक 09/05/2003 मधील मुद्दा क्रमांक 5 नुसार दीर्घ कालावधी 30 दिवसांपेक्षा जास्त असेल तर वाहतूक भत्ता अनुज्ञेय असणार नाही.

3) शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, पालघर यांचे जावक क्रमांक पाजिप/शिक्षण/माध्य./ का.क्र.2/ 20125/ 362, दिनांक 13/04/2015 नुसार पालघर जिल्ह्यामधील सन 2015-2016 च्या शैक्षणिक वर्षात पालघर जिल्हातील सर्व शिक्षकांना दिनांक 02/05/2016 ते दिनांक 14/06/2016 पर्यंत 44 दिवसांची दीर्घ कालीन सुट्टी देण्यात आलेली आहे. सदर कालावधीमध्ये सर्व शिक्षकांना व केंद्र प्रमुखांना अनुक्रमे प्रवास भत्ता व कायम प्रवास भत्त्याचे प्रदान करणेत आलेले आहे. ते वसूल करणेत यावे.

**3.65 जिल्हा परिषद शाळांच्या इयत्ता ५ वी च्या विद्यार्थ्यांना दप्तर पुरविण्याच्या निविदेतील अनियमिततेबाबत.**

**जिल्हा परिषद पालघर, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 14) -** सदरबाबत रक्कम रुपये 39,93,120/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, उद्योग, उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांक भाखस - 2014/ प्र.क्र.82/ उद्योग - 4, दिनांक 30/10/2015 अन्वये शालेय दप्तर साहित्य हे मुद्दा क्रमांक 6.17 परिशिष्ठ -17 नुसार कारागृहातर्फे तयार केल्या जाण्याऱ्या वस्तू सूचीमध्ये अनुक्रमांक 62 वर नमूद असताना सदर खरेदी निविदेद्वारे करणेत आलेली असल्याने सदर खरेदी नमूद शासन निर्णयास अनुसरून केली गेलेली नाही.

2) निविदा प्रक्रियेमध्ये ठेकेदाराकडून अनामत रकमेपोटी जमा केलेली बँक गॅरंटी लेखापरीक्षणास उपलब्ध करून देण्यात आलेली नसल्याने सदरचे लेखापरीक्षण होऊ शकले नाही.

3) स्थानिक बाजार किंमत ठरविताना पुरवठादाराकडून प्राप्त दर पत्रकावर PAN नंबर, VAT नंबर, TAN नंबर इत्यादी नमूद असणे आवश्यक असताना सादर करणेत आलेले दरपत्रकावर या बाबी नमूद नसल्याने

दप्तरासाठी प्राप्त दरपत्रके प्राधिकृत असल्याचे दिसून येत नाही. दरपत्रकावर दिनांक नमूद नाहीत. त्यामुळे सदरची दरपत्रके केव्हा घेण्यात आली, याबाबत साशंकता आहे.

4) सामान्य प्रशासन विभागाच्या रोटेशन रजिस्टरनुसार A ग्रेड वृत्तपत्रामध्ये “Economic Times ”व C ग्रेड वृत्तपत्र “जागल्या ” यामध्ये जाहिरात देणे बंधनकारक असताना स्थानिक वृत्तपत्र “दैनिक आमची मुंबई” मध्ये जाहिरात देण्यात आलेली आहे.

5) दप्तर पुरवठादाराकडून खाली नमूद केल्याप्रमाणे तांत्रिक बाबींची पूर्तता नसताना निविदा प्रक्रिया राबविण्यात आलेली आहे:-

i) निविदेमध्ये नमूद केलेल्या अटी व शर्ती मधील अट क्रमांक 2 व 10 नुसार पुरवठादाराचा शालेय दप्तर पुरवठा करण्याचा नोंदणीकृत व्यवसाय असल्याचे कोणतेही प्रमाणपत्र नस्तीसोबत जोडलेले नाही.

ii) निविदेमध्ये नमूद केलेल्या अटी व शर्ती मधील अट क्रमांक 5 नुसार मुंबई दुकान व संस्था अधिनियम 1948 (शॉंप ॲक्ट ) नुसार नोंदणी प्रमाणपत्र नाही.

iii) निविदेमध्ये नमूद केलेल्या अटी व शर्तींमधील अट क्रमांक 8 व 9 नुसार पुरवठादार यांचे व्यवसायाची मागील तीन वर्षामधील उलाढाल रक्कम रूपये 15.00 लक्ष असणे आवश्यक होती. मात्र, पुरवठादाराने सदर बाबींची पूर्तता केलेली नाही.

iv) लिफाफा क्रमांक 1 वर शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांची स्वाक्षरी नाही. त्याचप्रमाणे लिफाफा क्रमांक 2 वर मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, पालघर व मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद, पालघर यांची दिनांकित स्वाक्षरी नाही.

6) तडजोडी अंती पुरवठादार भवानी इंटरप्रायझेस यांनी रुपये 480/- (457.15/- + VAT 22.85/-= 480/-) हा दर दिनांक 30/03/2016 रोजी मान्य केला. मात्र, शिक्षण विभाग (प्राथमिक), जिल्हा परिषद, पालघर यांनी सदर पुरवठादार यांना जावक क्रमांक जीपपा/शिक्षण/आस्था/141ब/2016, दिनांक 29/03/2016 अन्वये पुरवठा आदेश देण्यात आला आहे.

7) पुरवठादाराने सादर केलेल्या देयकाचे लेखापरीक्षण केले असता देयकामध्ये मूल्यवर्धित कराची कोणतीही नोंद नाही. त्यामुळे मूल्यवर्धित कर रक्कम रुपये 1,90,089/- (8319 X 22.85/- प्रती दप्तर नुसार) भरणा केल्याचे दिसून येत नाही.

**3.66 प्राथमिक शाळाग्रह देखभाल व दुरस्तीबाबत.**

**जिल्हा परिषद रायगड, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 3) -** 10 प्राथमिक शाळागृह देखभाल व दुरुस्तीवर रक्कम रुपये 1,79,56,438/- एवढा खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) प्रशासकीय मान्यतेमधील अट क्रमांक 15 प्रमाणे प्रत्येक महिन्याच्या 5 तारखेपर्यंत संबंधीत गटविकास अधिकारी यांनी मासिक खर्चाचा कामनिहाय प्रगती अहवाल व पूर्ण झालेल्या कामांचे काम पूर्णत्वाचे दाखले सादर करणे आवश्यक असताना तशी कार्यवाही केली नाही.

2) सदर मंजूर बांधकामाचे देयक, काम पूर्ण दाखला, उपयोगिता प्रमाणपत्र, कामाची मुदत, काम पूर्ण दिनांक इत्यादी माहिती / लेखे लेखापरीक्षणासाठी उपलब्ध न झाल्यामुळे कामांची सध्यस्थिती काय आहे? याची तपासणी करता आली नाही.

2) रायगड जिल्हा परिषद शाळा, भोराई नवघर शाळागृह दुरुस्ती करणेसाठी रुपये 2,27,278/- ला प्रशासकीय मंजुरी क्रमांक 6363, दिनांक 11/09/2015 अन्वये मंजुरी देण्यात आली होती. तथापि, सदर कामामध्ये बदल करुन रायगड जिल्हा परिषद शाळा, वाकणवाडी शाळा दुरुस्ती करणे कामासाठी प्रशाकीय मंजुरी क्रमांक 701, दिनांक 04/02/2016 ने देण्यात आली आहे. सदर बदलास शिक्षण समितीची मंजुरी घेतलेली नाही. सदर वाकणवाडी शाळा दुरुस्ती करणे कामाचे अंदाजपत्रक हे रुपये 1,82,911/- असताना प्रशासकीय मंजुरी रुपये 2,27,278/- देण्यात आली आहे. सदर अंदाजपत्रक कोणी तयार केले, त्यांचे पदनाम नमूद नाही.

4) एकूण 10 शाळाग्रह दुरुस्तीच्या अंदाजपत्रकामध्ये त्रुटी आढळून आल्या आहेत. सदरबाबत खुलासासह पूर्तता करणे आवश्यक आहे.

5) एकूण 2 शाळांना प्रशाकीय मान्यता देण्यात आल्यानंतर सदर कामामध्ये बदल करण्यात आला आहे. मात्र सदर बदलास शिक्षण समितीची मंजुरी घेतलेली नाही.

**3.67 प्राथमिक शाळेत विद्यार्थासाठी दृक्श्राव्य (Audio visual) प्रणाली राबविणेबाबत.**

**जिल्हा परिषद रायगड, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 4) -** सदरबाबत रक्कम रुपये 5,91,345/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत,

1) निविदा अट क्रमांक 8 प्रमाणे जिल्हा परिषदेच्या किमान 200 शाळांमध्ये या प्रकारचा प्रोजेक्ट राबविण्याचा अनुभव असणाऱ्या कंपनीस प्राधान्य दिले जाईल व त्याप्रमाणे दाखला जोडणे आवश्यक आहे. तसेच अट क्रमांक 10 प्रमाणे सदर संस्थेला 1 ली ते 7 वी शालेय पाठ्यपुस्तकावर आधारित ऑडीओ व्हिज्युअल प्लयेर बेस कन्टेंट प्रोडक्ट विकण्याचा किमान दोन वर्षाचा अनुभव असावा. तसेच अट क्रमांक 12 प्रमाणे सदर ठेकेदाराचे संस्था आ.एस.ओ 9001:2008 प्रमाणित असावी. असे असतांना प्राप्त तिन्ही निविदाधारकांनी वरील अटींची पूर्तता केलेबाबत लेखे / कागदपत्रे निविदेसोबत जोडलेले नसताना निविदा कशी मंजूर केली?

2) शाळेत दृक्श्राव्य (Audio visual) प्रणाली राबविणेबाबत शाळांची मागणीपत्र / प्रस्ताव उपलब्ध झाले नाहीत. तसेच शाळा निवडीचे निकष काय होते? याबाबत माहिती उपलब्ध झाली नाही. त्यामुळे प्राप्त प्रस्ताव किती होते? त्यापैकी निवड केलेल्या शाळांची निवड योग्य असल्याची तपसणी करता आली नाही. उपयोगिता प्रमाणपत्र उपलब्ध झालेले नाही.

**3.68 शालेय पोषण आहारातील अनियमितता.**

**जिल्हा परिषद रत्नागिरी, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 6) -** सदरबाबत रक्कम रुपये 18,83,18,322/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) गटशिक्षणाधिकारी यांनी धान्य पुरवठाबाबत धान्यादी मालाची पोहोच दिलेली आहे. परंतु, करारनाम्यानुसार मुख्याध्यापक व शालेय व्यवस्थापन समिती / पालक यांचे समोर धान्यादी मालाची पोहोच आवश्यक आहे. अशी पोहोच लेखापरीक्षणात उपलब्ध झाली नाही. त्यामुळे माल सुस्थितीत व वजनाइतका पोहोच झालेबाबत पडताळणी करता आली नाही.

2) मुळ लेखापरिक्षण अहवालातील परिशिष्ट क्रमांक 1 नुसार इयत्ता 6 वी ते 8 वी या वर्गांना माहे एप्रिल 2015 ते मार्च 2016 या कालावधीत ठेकेदाराने उशिराने माल पोहोच केलेला आहे. त्यांची दंडाची रक्कम रुपये 4,00,907/- संबधीतांकडुन वसुल करावी व मुळ लेखापरिक्षण अहवालातील परिशिष्ट क्रमांक 2 नुसार इयत्ता 1 ली ते 5 वी वर्गांना धान्यादी माल पोहोच केलेला आहे. तो उशिराने पोहोच केल्यामुळे दंडाची रक्कम रुपये 3,81,242/- संबधीताकडून वसुल करावी.

**3.69 जिल्हा परिषद प्राथमिक शाळा दुरुस्ती व कंम्पाऊंड वॉल बांधणे.**

**जिल्हा परिषद रत्नागिरी, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 7) -** सदरबाबत रक्कम रुपये 1,58,92,264/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक झेडपीए-2012/प्र.क्र.680/ वित्त-9, दिनांक 31/01/2013 नुसार रुपये 50 लाखांवरील कामाची मंजूरी जिल्हा परिषदेच्या सर्वसाधारण सभेची प्रशासकीय मंजूरी घेणेची आहे. तथापि, विगतवारी करुन 10 लाखांच्या आतील कामे असल्याने कामनिहाय खाते प्रमुखांचे नियमबाह्यपणे प्रशासकीय मंजूरी घेण्यात आली आहे. यास जिल्हा परिषदेच्या सर्वसाधारण सभेची प्रशासकीय मंजूरी घेण्यात आली नाही.

2) तांत्रिक मंजूरी घेतलेबाबत काही कामाची अंदाजपत्रके लेखा परिक्षणात उपलब्ध झाली नाहीत. याबाबत अर्धसमास पत्र क्रमांक 01, दिनांक 17/06/2017 रोजी देण्यात आले आहे. तरी या कामाची अंदाजपत्रके उपलब्ध झाली नाहीत.

3) कामे पूर्ण झालेबाबत मूल्यांकन प्रमाणपत्रासह उपयोगिता प्रमाणपत्र लेखापरिक्षणात उपलब्ध झाले नाहीत. याबाबत अर्धसमास पत्र क्रमांक 01, दिनांक 17/06/2017 रोजी देण्यात आले आहे. तरी सर्व लेखे उपलब्ध करुन पूर्तता करावी.

4) रक्कम रुपये 1,00,00,000/- सुधारित अर्थसंकल्पात तरतूद मंजूर असतांना रक्कम रुपये 1,58,74,000/- चे कामांना कोणत्या नियमाने मंजूरी देण्यात आली आहे. याबाबत खुलासा करावा.

**3.70 जिल्हा परिषद वाढीव उपकरातील योजना.**

**जिल्हा परिषद सिंधुदुर्ग, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 2) -** सदरबाबत प्रमाणक क्रमांक 598, दिनांक 31/03/2016 अन्वये रक्कम रुपये 1,80,000/- खर्च करण्यात आला आहे. विज्ञान प्रदर्शनाची नस्ती तपासली असता खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) शिक्षण विभागाकडील पत्र क्रमांक सिंजिप/शिक्षण/बी-3/15, दिनांक 07/09/2015 च्या दरपत्रक सूचनेनुसार 41 वे जिल्हास्तरीय विज्ञान प्रदर्शनासाठी दरपत्रके मागविणेत आलेली आहेत. त्यातील अट क्रमांक 6 नुसार लिफाप्यावर कोणत्या बाबीसाठी दरपत्रक याचा उल्लेख करणे गरजेचे होते. परंतु, लिफाप्यावर तसे नोंदविलेले नसताना लिफाफा कोणत्या आधारे स्विकारण्यात आला व उघडण्यात आला? याचा खुलासा करावा.

2) प्रशासकिय व तांत्रिक मंजुरी देताना दिलेले नामकरण तालुकास्तरीय व जिल्हास्तरीय असे दोन भाग असलेने तसा स्वतंत्र उल्लेख करणे उचित होते. परंतु, तसे केलेले नाही याबाबत खुलासा करावा.

3) दरपत्रके मागविणेचे माध्यम स्पष्ट होत नाही.

4) प्राप्त दरपत्रकातील कमीत कमी दराची निविदा स्विकारली आहे. परंतु, निवड झालेल्या दरपत्र धारकास ज्या पत्राने कळविले आहे, त्या पत्रावर जावक क्रमांक व दिनांक याची नोंद नाही. सदरचे दरपत्रक पाठविले किंवा कसे? पाठविलेबाबत तपशिल द्यावा व रित न पाळल्याबाबत खुलासा व्हावा.

5) दरपत्रक कोरे असूनही त्याची निवड होते. उदा. आदित्य मंगल कार्यालय इन्सुली तालुका सावंतवाडी.

6) दरपत्रके लिफाप्यातून प्राप्त झालेली आहेत असे वाटते. परंतु, त्यातील दरपत्रकातील नोंदविलेली तारीख 14/09/2015 ही एकाच हस्ताक्षरातील व एकाच पेनाने लिहिलेली वाटते. गुप्तता होती किंवा कसे? याबाबत सुस्पष्ट खुलासा करावा.

7) साहित्य खरेदीच्या नोंदी साठा नोंदवहीत घेतलेल्या आहेत. परंतु, शिक्षणाधिकारी यांच्या स्वाक्ष-या नाहीत. तरी त्या त्वरीत घेऊन दाखवाव्यात.

**3.71 दुर्बल घटकातील मुलींना उपस्थिती भत्ता.**

**जिल्हा परिषद सिंधुदुर्ग, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 4) -** सदरबाबत रक्कम रूपये 1,07,000/- प्रदान करण्यात आले आहेत. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) शिक्षण व सेवा नियोजन विभाग शासन निर्णय क्रमांक पीआरई-1091(9614) प्राशि-1, दिनांक 10/01/1992 नुसार दारिद्रयरेषेखालील अनुसूचित जाती-अनुसूचित जमाती, भटक्या जाती व विमुक्त जमातीतील इयत्ता 1 ली ते 4 थी मध्ये शिकत असलेल्या मुलींची उपस्थिती वाढविणेसाठी उपस्थिती भत्ता प्रतिदिन रूपये 1/- नुसार शैक्षणिक वर्षासाठी रूपये 220/- प्रदान करावयाचे आहे. परंतु, कुडाळ, कणकवली, मालवण, देवगड, वैभववाडी गटाकडील काही मुलींच्या नावासमोर दारिद्रय रेषेखालील क्रमांकाची दारिद्रय रेषेखालील यादीत नोंद नाही. सबब ती मुले किंवा कुटुंबे दारिद्रय रेषेखालील आहेत हे मान्य करता येत नाही.

तरी वरील मुले दारिद्रय रेषेखालील कुटुंबातील आहेत व संबंधित क्रमांक अधिकृत कागदपत्रासहीत दाखवावीत. अन्यथा प्रदान करण्यात आलेली रक्कम रूपये 11,460/- वसुल करुन शासन सदरी भरणा करुन पुर्तता दाखवावी.

**3.72 शालेय पोषण आहार या योजनेवरील खर्चाबाबत.**

**जिल्हा परिषद नाशिक, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 1) -** जिल्हा परिषद, नाशिक अंतर्गत शिक्षण विभागाच्या सन 2015-2016 च्या लेखापरीक्षणामध्ये, शालेय पोषण आहार देणे या योजनेवर (केंद्र हिस्सा रक्कम रुपये 50,09,14,489/- व राज्य हिस्सा रक्कम रुपये 31,68,37,236/-) अशी एकुण रक्कम रुपये 81,77,51,725 /- अन्न शिजविणे कामी, स्वयंपाक मदतनीस, व्यवस्थापन मुल्यमापन मानधन शिक्षक, मुख्याध्यापक मानधन, एल पी गॅस असे राज्य व केंद्रांचा हिस्सा अनुदान स्वरुपात प्राप्त झालेला असुन दिनांक 31/03/2016 अखेर (केंद्र हिस्सा रक्कम रुपये 42,14,59,511/- व राज्य हिस्सा रक्कम रुपये 16,45,54,484/-) अशी एकुण रक्कम रुपये 58,60,13,995 /- खर्च केल्याचे आढळुन आले असुन सदर खर्चाबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) प्रत्येक शाळेत शालेय पोषण आहाराचे मालाचा पुरवठा करण्यापुर्वी जिल्हा सार्वजनिक आरोग्य प्रयोगशाळा, नाशिक यांचेकडुन वस्तुंचा दर्जा तपासणी अहवाल प्राप्त करुन नंतर पुरवठा करणे आवश्यक आहे. तसेच सदर तपासणी अहवालामध्ये केवळ वस्तुंची नावे अनुक्रमांक 1 ते 10 अशी दर्शवुन त्या त्या वस्तुसमोर वस्तुचा दर्जा चांगला असल्याचा शेरा नमुद केला आहे. मात्र त्यात प्रतवारी, घटकप्रमाण, दर्जा हया बाबी नमुद केलेल्या नाही.

2) शालेय पोषण आहार योजने संदर्भातील अपहार तक्रारींची प्रकरणे गटस्तरावरुन जिल्हा परीषद शिक्षण विभागाकडे सादर करणे आवश्यक असतांना ती नस्ती उपलब्ध करुन देण्यात आली नाही.

3) शाळा स्तरावर स्थापन करण्यात आलेल्या शिक्षण समितीचे अहवाल सादर करणे आवश्यक असतांना ते सादर केल्याचे आढळून आले नाही.

4) शालेय पोषण आहार योजनेतंर्गत इंधन व मजुरी यावरील खर्च प्रमाण 75 व 25 टक्के प्रमाणे प्रमाणित खर्चाची नोंदवही ठेवलेली नसल्याने किंवा तालुका निहाय तसा अहवाल जिल्हा परीषदेकडे सादर केल्याचे तपासणीत आढळून नाही.

5) ग्रामविकास व जलसंधारण विभाग यांचे पत्र क्रमांक झेडपीए-2000/प्र.क्र.4023, दिनांक 12/01/2001 व महाराष्ट्र जिल्हा परिषद पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 4 परिशिष्ठि 2 भाग 1 नुसार खर्चास प्रशासकीय मंजुरी जिल्हा परिषदेने देणे आवश्यक असतांना त्याप्रमाणे आदेश संचिकेत आढळून आले नाही.

6) महाराष्ट्र शासन, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, शासन निर्णय क्रमांक शापोआ-2009/प्रक.383/ प्राशि.04, दिनांक 26/02/2010 नुसार देयकासोबत पिवळया रंगाच्या पावत्या जोडणे आवश्यक असतांना त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही. त्यामुळे आवश्यक त्या बाबींची पडताळणी करता आली नाही. (उदा.पुरवठा दिनांक, वेळ, वाहन क्रंमाक, माल वाहतुक करणा-याचे नाव, वजन, दर्जा, स्थिती, साठा नोंदवही पृष्ठ क्रमांक इत्यादी.)

7) महाराष्ट्र शासन, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, शासन निर्णय क्रमांक शापोआ-2009/प्रक.383/ प्राशि.04, दिनांक 26/02/2010 मधील अट क्रमांक ड-1 नुसार मालाचा पुरवठा झाल्यानंतर त्याचे प्रत्येकी 250 ग्रॅम नमुने गट शिक्षणाधिकारी / अधिक्षक शालेय पोषण आहार यांनी त्यांचे पत्रासोबत शासकीय प्रयोग शाळेत पाठवावे व त्याचा खर्च पुरवठादाराने करावा. असे असतांना देयकासोबत प्रयोग शाळेतील तपासणी अहवाल जोडण्यात आलेला आहे. तथापि, प्रत्येक तालुक्याचा वेगवेगळा अहवाल असणे आवश्यक असतांना एकाच तपासणी अहवालाची छायांकित प्रत काढुन प्रत्येक तालुक्याच्या देयकांच्या सोबत जोडण्यात आलेली आहे. सदर बाब अनियमीत आहे.

8) महाराष्ट्र शासन, शालेय क्रिडा व शिक्षण विभाग, शासन निर्णय क्रमांक शापोआ-2009/प्र.क्र.207/ प्राशि-4, दिनांक 01/06/2009 नुसार दक्षता पथके स्थापन केलेचे दस्तऐवज उपलब्ध करुन देण्यात आले नाही.

9) महाराष्ट्र शासन, शालेय क्रिडा व शिक्षण विभाग, शासन निर्णय क्रमांक शापोआ/2004प्राशि-4 दिनांक 31/03/2005 च्या आदेशानुसार शाळांना अनुदान वितरीत करण्यासाठी दिलेल्या सुत्राप्रमाणे केलेले नाही. इयत्ता 1

ली ते 5 वी व इयत्ता 6 वी ते 8 वी राज्य शासन हिस्सा रक्कम रुपये 15,22,82,752/- व केंद्र शासन हिस्सा रक्कम रुपये 7,94,54,978 /- असे एकुण रक्कम रुपये 23,17,37,730/- अखर्चीत अनुदान असल्याचे दिसुन येते. यावरुन योजनेवर नियंत्रण दिसुन येत नाही.

**3.73 नगरपरिषदांकडील प्रलंबित शिक्षण वर्गणीबाबत**.

**जिल्हा परिषद नाशिक, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 8) -** मुंबई प्राथमिक शिक्षण अधिनियम 1947 मधील कलम 42 व त्याखालील नियम क्रमांक 142 मधील तरतुदींनुसार जिल्हा परिषदेने नगरपरिषदांच्या हद्दीत प्राथमिक शिक्षण सुविधा पुरविली असल्यास प्राथमिक शिक्षण वर्गणी जिल्हा परिषदेने वसूल करावयाची आहे. नगरपालिकेने त्यांच्या हददीतील मालमत्तांच्या वार्षिक करयोग्य मुल्याच्या 10 टक्के वजा करुन उर्वरीत रकमेच्या 5 टक्के इतकी प्राथमिक शिक्षण वर्गणी निश्चित करुन ती जिल्हा परिषदेकडे भरणा करणे आवश्यक आहे.

जिल्हा परिषदेने दिलेल्या माहितीनुसार दिनांक 31/03/2016 अखेर नगरपरिषद प्राथमिक शिक्षण वर्गणी रक्कम रूपये 4,32,79,971/- प्रलंबित आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) दिनांक 31/03/2016 अखेर रुपये 4,32,79,971/- इतकी प्राथमिक शिक्षण वर्गणी जिल्हा परिषदेस येणे बाकी आहे. शासन नगरविकास विभाग परिपत्रक क्रमांक जीएनटी-1083/224/(45/83)/नावि-10 दिनांक 18/03/1983 नुसार नगरपालिकेकडून जिल्हा परिषदेला देय शिक्षण वर्गणीची रक्कम जिल्हाधिकारी यांनी नगरपालिकांना देय रकमेतून वसूल करून ती जिल्हा परिषदेस देण्यात यावी, असे आदेशित केलेले आहे. तथापि, तशी कार्यवाही झालेली नाही. तसेच जिल्हा परिषदेने या संदर्भात जिल्हाधिकारी कार्यालयास पत्रव्यवहार करुन त्यांचेकडून सदर येणे रक्कम प्राप्त करुन घेण्यासाठी प्रयत्न केलेले नाहीत.

2) सन 2015-2016 या वित्तीय वर्षात थकबाकी किंवा चालू मागणी वसूलीबाबत ठोस कार्यवाही नसल्याने काहीही रक्कम जिल्हा परिषदेला मिळालेली नाही.

**3.74 शालेय पोषण आहार योजनेतील अनियमितता.**

**जिल्हा परिषद धुळे, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 1) -** सन 2015-2016 या वर्षात शालेय पोषण आहार योजनेअंतर्गत 2 प्रमाणकान्वये रक्कम रुपये 97,43,049/- खर्च करण्यात आलेला आहे. याबाबत खालील अभिप्राय नमुद करण्यात येत आहेत.

1) करारनामा दिनांक 10/06/2014 मधील अट क्रमांक 3 नुसार धान्यादी मालाची मागणी मान्य पाककृतीनुसार केंद्रप्रमुख, गटशिक्षण अधिकारी, अधिक्षक शालेय पोषण आहार, या चढत्या क्रमाने शिक्षणाधिकारी (प्राथमिक) संबंधित पुरवठादार यांचेकडे करतील. तथापि, याबाबतची कार्यवाही विभागाने केलेली नाही. पर्यायाने पुरवठा विहित मुदतीत प्राप्त झाल्याची खात्री लेखापरीक्षणास करता आलेली नाही.

2) पंचायत समिती, शिंदखेडा यांचेकडील माहे जून, जुलै, 2015 धान्यदी माल व तांदुळ पुरवठाबाबतचे मागणीपत्राची पडताळणी केली असता शाळानिहाय विदयार्थी पटसंख्येत तफावत आढळुन येते.

शिंदखेडा तालुका शा.पो.आ./मागणी 29/दिनांक 05/05/20215 (धान्यादी माल) इयत्ता 1ली ते 5 वी

शिंदखेडा तालुका शा.पो.आ./मागणी 29/दिनांक 05/05/20215 (तांदुळ) इयत्ता 1ली ते 5 वी

एकाच महिन्यात दिलेल्या पुरवठा आदेशातील विदयार्थी व लाभार्थी संख्येत तफावत आढळुन येते. त्यामुळे शालेय स्तरावरील योजनेअंतर्गत निश्चित लाभार्थी संख्या व पुरवठा याबाबत लेखापरीक्षणास परिपुर्ण खात्री करता आली नाही. तफावतीन्वये संचालनालय स्तरावरुन प्रदान होणा-या तांदुळ या घटकावर जादा प्रदान करण्यात होत असल्याचे निर्दशनास येते. याबाबत योग्य कार्यवाही दर्शवावी.

**3.75 30 सप्टेंबर पट संख्येवर शिक्षक पदे निश्चित करणे व मंजूर पदापेक्षा कमी अधिक शिक्षकांचे समायोजन करणेबाबत.**

**जिल्हा परिषद धुळे, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 7) -** शिक्षण विभागाकडील शासन निर्णय क्रमांक पीआरई-1078/2382/7, दिनांक 28/08/1980 व शासन निर्णय क्रमांक पीआरई-1092/221/प्रशि/1, दिनांक 30/01/1996 आणि शासन परिपत्रक क्रमांक जिप/908/प्र.क्र.36/आस्था-14, दिनांक 06/10/2008 अन्वये दिनांक 30 सप्टेंबर च्या पट संख्येवर व उपस्थितीनुसार शाळानिहाय शिक्षक संख्या निश्चित करणे आवश्यक आहे. तसेच शासन निर्णय क्रमांक जिपब/511/प्र.क्र.54/आ-14, दिनांक 18/05/2011 अन्वये दिनांक 30/09/2015 च्या पट संख्येवर शिक्षक निर्धारण करणे आवश्यक आहे. शिक्षण विभागाने सन 2015-2016 या वर्षासाठी शिक्षक समायोजन करतांना पट संख्या निश्चित करण्यात आलेली आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) दिनांक 18/05/2011 च्या शासन निर्णयानुसार शिक्षक समायोजन हे दिनांक 31/10/2015 पर्यंत होणे आवश्यक असतांना सदर समायोजन दिनांक 31/10/2015 पर्यंत झालेले नाही. अतिरिक्त ठरलेल्या 27 शिक्षकांचे समायोजन मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, धुळे यांचे आदेश क्रमांक निरंक दिनांक 02/04/2016 अन्वये करण्यात आलेले आहे. सदर समायोजनाची कार्यवाही ऑक्टोबर 2015 पर्यंत न झाल्याने शिक्षकांना माहे ऑक्टोबर 2015 ते मार्च 2016 पर्यंत 6 महिने कामाशिवाय वेतन व भत्ते अदा झाल्याचे दिसून येत आहे. तसेच समायोजित शिक्षक नमुद केलेल्या शाळेवर हजर झाले किंवा कसे? याबाबत तालुकानिहाय अहवाल प्राप्त करुन घेतलेला नाही. त्यामुळे समायोजनाचे आदेशाचे पालन गट स्तरांवरुन होऊन त्यात कोणताही फेरबदल झाला किंवा कसे? याची अचुकता करता येत नाही.

2) दिनांक 18/05/2011 या शासन निर्णयानुसार दिनांक 30 सप्टेंबर च्या पटसंख्येवर अतिरिक्त शिक्षकांचे समायोजन 31 ऑक्टोंबर पर्यंत करणे आवश्यक असतांना त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात आलेली नाही. याबाबत सन 2014-2015 च्या लेखापरीक्षण अहवालात परिच्छेद क्रमांक 4 शिक्षक समायोजनाबाबत नोंदविण्यात आलेला असून देखील सन 2015-2016 या वर्षात जिल्हा परिषदेने गांभीर्याने प्रशासकीय कार्यवाही केलेली नाही व उपाययोजना केलेली नाही. सदर अनियमिततेमुळे शासनाच्या मुळ उदिष्टांचे उल्लंघन झाले आहे. सबब शिक्षण विभागाने समायोजनाची प्रक्रिया विहित कालावधीत न राबविल्यामुळे शिक्षक शाळेवर अतिरिक्त असतांना वेतन व भत्ते अदा करण्यात आलेले आहे. तरी याबाबत संबंधितांवर जबाबदारी निश्चित करावी.

3) शिक्षण विभागाने पुरविलेल्या माहितीनुसार शिक्षक संवर्गाची एकुण मंजूर पदे 3649 आहेत. त्यापैकी कार्यरत पदांची संख्या 3378 दर्शविलेली आहे. एकुण कमी शिक्षक संख्या किंवा रिक्त पदांची संख्या 271 येणे आवश्यक असताना ती 292 दर्शविलेली आहे. या विसंगतीबाबत खुलासा करणेत यावा. तसेच एकुण जादा शिक्षकांची संख्या 27 ही कशाच्या आधारावर दर्शविलेली आहे? याचा बोध होत नाही.

**3.76 शालेय पोषण आहार योजनेची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी भरारी पथक आणि दक्षता पथक स्थापन न करणे बाबतची अनियमितता.**

**जिल्हा परिषद नंदुरबार, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 8) -** शिक्षण विभाग, जिल्हा परिषद नंदुरबार यांचे सन 2015-2016 या वित्तीय वर्षाचे निवडक महिन्याचे लेखापरिक्षणा दरम्यांन शिक्षण विभाग जिल्हा परिषद, नंदुरबार यांचेकडील योजनेच्या खर्चाच्या नस्त्यांची तपासणी केली असता, सन 2015-2016 या वित्तीय वर्षामध्ये नंदुरबार जिल्हयामध्ये जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शिक्षण विभागामार्फत शालेय पोषण आहार योजना राबविण्यांत आलेली असून सदर योजनेची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यासाठी शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन निर्णय क्रमांक शालेय पोषण आहार 2009 / प्रं क्रं-207/ प्रा शि-4 दिनांक 01/06/2009 मध्ये नमूद केल्याप्रमाणे प्राथमिक शिक्षण विभाग, जिल्हा परिषद, नंदुरबार यांचे मार्फत भरारी पथक आणि दक्षता पथकाची स्थापना करणे आवश्यक आहे. परंतु, तशी कार्यवाही प्राथमिक शिक्षण विभाग, जिल्हा परिषद, नंदुरबार यांचेकडून करण्यांत आलेली नाही. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन निर्णय क्रमांक शालेय पोषण आहार 2009 / प्रं क्रं-207/ प्रा शि-4, दिनांक 01/06/2009 मध्ये नमूद केल्याप्रमाणे शालेय पोषण आहार योजना राबवित असतांना विद्यार्थ्यांना आहाराचे वाटप कमी करणे, निकृष्ट प्रतिचा आहार मुलांना देणे तसेच आहाराचे वाटपच न करणे अशा स्वरुपाच्या तक्रारी शासनाकडे वारंवार येत असल्याने सदर योजनेची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यासाठी भरारी पथक आणि दक्षता पथकांमार्फत शाळांमध्ये अचानक तपासण्या करणे आवश्यक आहे. सदर तपासणीमध्ये भरारी पथकाचे निदर्शनास आलेल्या उणीवाबाबतचा सविस्तर अहवाल तीन दिवसांच्या आंत मुख्यं कार्यकारी अधिकारी आणि शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांचे निदर्शनास आणणे आवश्यक आहे, असे असतांना प्राथमिक शिक्षण विभाग जिल्हा परिषद नंदुरबार यांनी भरारी पथक आणि दक्षता पथकच जिल्हयांत निर्माण केलेले नाही.

2) शासन निर्णयामध्ये नमूद केल्याप्रमाणे शालेय पोषण आहार योजनेची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यासाठी भरारी पथक आणि दक्षता पथक स्थापन केले नसतांना दरमहा 10 शाळांची अचानक तपासणी कोणी केली आणि सदर योजनेमधील तपासणीमध्ये कोणत्या उणीवा आढळून आल्या? याबाबतचा अहवाल व त्यासंबंधीची कागदपत्रेदेखील नस्तीसोबत आढळून आलेली नाहीत. त्यामुळे सदर योजनेमध्ये मोठया प्रमाणावर अनियमितता होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

**3.77 शालेय पोषण आहार योजनेमधील धान्यसाठा प्रयोगशाळेकडून प्रमाणीत करणेबाबत आणि इतर उणीवांबाबत.**

**जिल्हा परिषद नंदुरबार, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 9 व 13) -** सदरबाबत धान्य खरेदीसाठी एकूण रक्कम रुपये 5,44,56,087/- एवढा खर्च करण्यांत आलेला असून याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) धान्यादिमालाची गटस्तरावर पुरवठा झाल्यानंतर गटशिक्षण अधिकारी / शालेय पोषण आहार अधिक्षक यांनी प्रत्येक मालाचे 250 ग्रॅम प्रमाणे नमुने प्रयोग शाळेत पाठवावेत. प्रयोगशाळेचा समाधानकारक अहवाल प्राप्तं झाल्यानंतर मालाच्या बिलासोबत तपासणी अहवाल पुरवठादार यांनी गटशिक्षण अधिकारी / शालेय पोषण आहार अधिक्षक यांचेकडे सादर करतील पुरवठादाकडील बीले व अहवाल तसेच प्रयोगशाळेचा अहवाल याची एकत्रित तपासणी शालेय पोषण आहार अधिक्षक करतील गटस्तरावर प्राप्त झालेला धान्यसाठा योग्य दर्जाचा व वजनाचा असल्याचे प्रमाणपत्र नोंदवून पुरवठादाकडील बीले व प्रयोगशाळेच्या अहवालासोबतची सर्व कागदपत्रे गटशिक्षण अधिकारी / शालेय पोषण आहार अधिक्षक यांनी शिक्षण अधिकारी ( प्राथमिक ) यांचेकडे 10 दिवसांच्या आंत सादर करणे आवश्यक आहे. याबाबत पुरवठादाराने धान्याचे नमुने प्रयोगशाळेत कधी पाठविले? तसेच प्रयोग शाळेकडून नमुन्यांबाबतचा अहवाल कधी प्राप्त झाला? तसेच विहित मुदतीत बिले आणि तपासणी अहवाल व इतर कागदपत्रे विहित मुदतीत मंजूरीसाठी शिक्षण अधिकारी ( प्राथमिक ) यांचेकडे प्राप्तं झाली किंवा कसे? याबाबतची कागदपत्रे नस्तीसोबत आढळून आली नाही. त्यामुळे शासन निर्णयांत नमूद केलेल्या पध्दतीनुसार कार्यवाही झालेली आहे किंवा कसे? याबाबतची खात्री लेखापरिक्षणांस करता आली नाही. तरी याबाबत विभागाने खात्री पटवावी.

2) तसेच महाराष्ट्र शासन, परिपत्रक दिनांक 26/02/2010 मधील क्रमांक-4 मध्ये नमूद केल्याप्रमाणे गटशिक्षण अधिकारी पंचायत समिती सर्व यांनी धान्याची एकत्रित मागणी जिल्हा स्तरावर शिक्षण अधिकारी (प्राथमिक) यांचेकडून विहित मुदतीत सादर करुन जिल्हास्तरावरुन पुरवठादाराकडे जिल्हयाची एकत्रित धान्यपुरवठा आदेश पुरवठादाकडे सादर केल्यानंतर पुरवठादाराने 15 दिवसांच्या आंत प्रत्येक शाळेवर धान्य पुरवठा करणे आवश्यक आहे. याबाबतची देखील गटस्तरावरिल धान्याची मागणीपत्रे जिल्हास्तरावर कधी प्राप्त झाली. तसेच जिल्हास्तरावर शालेय पोषण आहार, अधिक्षक यांनी तालुक्यांवरुन प्राप्त झालेल्या मागणीवरुन एकत्रित धान्यं पुरवठा आदेश वेळेवरच दिलेले आहेत किंवा कसे? आणि पुरवठादाराने शासन परिपत्रकांत नमूद केल्याप्रमाणे विहित मुदतीमध्येच धान्याचा पुरवठा केलेला आहे किंवा नाही, याबाबतची देखील नस्तीसोबत कागदपत्रे नसल्यामुळे लेखा परिक्षणास खात्री करता आली नाही.

3) तसेच विद्यार्थ्यांना दर्जेदार आहार मिळावा म्हणून ग्राम शिक्षण समितीने स्थानिक पातळीवर लोकसहभागातून सहभाग घेण्यांत येवून अन्नधान्यं व आहाराच्या दर्जाबाबत वेळोवेळी तपासणी करणे आवश्यक असतांना तशी देखील कार्यवाही झाल्याबाबतची कागदपत्रे नस्तीसोबत आढळून आली नाही. त्यामुळे सदर प्रकरणी

ग्रामशिक्षण समितीकडून अन्नधान्य व आहाराच्या दर्जाबाबत वेळोवेळी तपासणी होत आहे किंवा कसे? याबाबतची देखील सत्यता लेखापरिक्षणांस पडताळता आली नाही.

4) महाराष्ट्र शासन परिपत्रक दिनांक 26/10/2010 मध्ये नमूद केल्याप्रमाणे धान्य पुरवठा आणि त्याबाबतची एकत्रित रक्कम याबाबतचा मासिक खर्चाचा अहवाल आणी मासिक प्रगती अहवाल शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांनी शिक्षण संचालनालयाकडे मुदतीत सादर करणे आवश्यक असतांना तशी देखील कार्यवाही झाल्याबाबतची कागदपत्रे नस्तीसोबत आढळून आली नाही.

5) तालुका स्तरावरिल आणि जिल्हास्तरावरिल धान्यसाठा नोंदवही नमुना नंबर-33 मधील संपुर्ण रकाने पूर्ण भरल्याचे दिसून आलेले नाही. तसेच प्रत्येक रकान्यामध्ये संपुर्ण् माहिती भरुन साठा नोंदवही परिपुर्ण नाही तरी गटस्तरावरील साठा नोंदवहीमधील धान्यसाठा आणि जिल्हा स्तरावरील धान्यसाठा याची तंतोतंत जुळवणी करुन साठा नोंदवहया दाखविणेत याव्यात.

6) तसेच धान्यसाठा आणि अन्न शिजवून देणा-या स्वयंपाकी / मदतनीस यांची आरोग्य तपासणी बाबतचे अहवाल आणि भरारी पथक / दक्षता पथक यांनी वेळोवेळी तपासणी केल्याबाबतची कागदपत्रे नस्तीसोबत आढळून आलेली नाही. त्यामुळे सदर प्रकरणी देखील वेळोवेळी कार्यवाही करण्यांत आलेली आहे किंवा नाही, याबाबतची देखील खात्री लेखापरिक्षणास पटवावी.

7) शिक्षण विभाग, जिल्हा परिषद, नंदुरबार यांचे सन 2015-2016 या वित्तीय वर्षाचे लेखापरिक्षणा दरम्यांन महाराष्ट्र शासन, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन परिपत्रक क्रमांक शालेय पोषण आहार-2009/प्रं.क्रं-383/प्राशि-4, दिनांक 26/02/2010 च्या परिपत्रकातील परिच्छेद क्रमांक 5 (ड-1) मध्ये नमूद केल्याप्रमाणे धान्यादिमालाचा पुरवठा करणेबाबत शासनाकडून निश्चित केलेल्या दि महाराष्ट स्टेट को ऑप. मार्केटींग फेडरेशन लि. मुंबई यांनी संबंधित जिल्हा परिषदेतील पंचायत समिती स्तरावर करावयाचा असून याबाबत शासनामार्फत शिक्षण संचालक ( प्राथमिक ) महाराष्ट्र राज्य, पुणे-1 यांचेशी रुपये 100/- च्या स्टॅम्प पेपरवर दिनांक 11/06/2014 रोजी करार झालेला असून सदर करारनाम्यांतील अट क्रमांक-24 मध्ये नमूद केल्याप्रमाणे धान्याच्या मालाचा गटस्तरावर प्रत्यंक्ष पुरवठा केल्यानंतर धान्यादि मालाच्या देयकांची तपासणी गटस्तरावर गटशिक्षण अधिकारी व जिल्हास्तरावर अधिक्षक शालेय पोषण आहार यांनी तपासावयाची असून रक्कमेच्या प्रदानाबाबत शिक्षण अधिकारी (प्राथमिक) यांचेकडे सादर करावयाची आहेत. अशा देयकांचे प्रदान करतांना करारातील अटीनुसार देयके प्राप्त झाल्यानंतर 90 टक्के रक्कम प्रथम दयावयाची असून उर्वरित 10 टक्के रक्कम संबंधित पुरवठाराकडून धान्यादि मालाचा प्रयोग शाळेकडील समाधानकारक तपासणी अहवाल प्राप्तं झाल्यानंतर प्रदान करावयाची आहे. असे असतांना शिक्षण विभाग प्राथमिक जिल्हा परिषद नंदुरबार यांनी मात्र करारातील अटीचे पालन न करता म्हणजेच धान्यादि मालाचा शासकिय प्रयोग शाळेकडील अहवाल प्राप्त न करतांच एकाच वेळी 100 टक्के रक्कम संबंधित पुरवठादास प्रदान केलेली आहे. करारनाम्यातील अटी नुसार प्रथम देयकाची 90 टक्के रक्कम आणि धान्यादि मालाचा शासकिय तपासणी अहवाल पुरवठादाराने प्राथमिक शिक्षण विभागाकडे सादर केल्यानंतर उर्वरित 10 टक्के रक्कम का अदा केली नाही? याबाबत खुलासा सादर करावा.

**3.78 शालेय पोषण आहार योजनेबाबत.**

**जिल्हा परिषद जळगांव, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 10) -** शिक्षण विभाग, जिल्हा परिषद जळगाव कडील शालेय पोषण आहार सन 2015-2016 ची नस्ती तपासणी केली असता आर्थिक वर्षामध्ये तालुकास्तर व जिल्हास्तरावर इयत्ता पहिली ते पाचवी व इयत्ता सहावी ते आठवी केंद्र हिस्सा 75 टक्के रक्कम रूपये 33,37,85,755/- व राज्यहिस्सा 25 टक्के रक्कम रूपये 23,53,29,000/- असा एकूण रक्कम रुपये 56,91,14,755/- खर्च झालेला आहे. त्यात तालुकास्तरावर रक्कम रूपये 30,16,43,850/- व जिल्हास्तरावर रक्कम रूपये 26,74,70,905/- धान्यादी माल व इतर मानधन वगैरे साठी खर्च करणेत आलेला आहे. धान्यादी माल खरेदीसाठी महाराष्ट्र स्टेट को आप्रेटिव्ह कन्झ्युमर्स फेडरेशन लि.मुंबई यांचे दर मंजुर आहेत. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) शालेय पोषण आहार योजनेची अमलबजावणी करण्या संदर्भात, महाराष्ट्र शासन, शासन निर्णय क्रमांक शापोआ-2009/प्र.क्र.136/प्राशि-04, दिनांक 15/07/2009 अन्वये धान्यादी मालाचा पुरवठा करणेसाठी मागविण्यात आलेल्या जाहीर निविदेतून महाराष्ट्र स्टेट को आप्रेटिव्ह कन्झ्युमर्स फेडरेशन लि.मुंबई यांची कमी दराची निविदा मंजूर करणेत आलेली आहे व दिनांक 11/06/2014 रोजी शिक्षण संचालक, प्राथमिक महाराष्ट्र राज्य, पुणे-1 यांनी रुपये 100/- च्या स्टॅम्पपेपरवर धान्यादी मालाचा पुरवठा करणे कामी करारनामा केलेला आहे. सदर दर हे सन 2014-2015 साठी होते. परंतु, त्यास वेळोवेळी मुदतवाढ देऊन सन-2015-2016 मध्ये त्याच दराने खरेदी करणेत आली आहे व जिल्हयातील सर्व शाळांना पुरवठा केला जातो.

2) महाराष्ट्र शासन, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन परिपत्रक क्रमांक शापोआ-2009/प्र.क्र.383/प्राशि-04, दिनांक 26/02/2010 मधील अट क्रमांक (क-4) नुसार पुरवठा आदेशानंतर पुरवठाधारकाने 15 दिवसांच्या आंत मालाचा पुरवठा प्रत्येक शाळेत करणे आवश्यक आहे. तसेच अट क्रमांक (क-5) नुसार पुरवठादार गुलाबी, पिवळी व पांढरी अशा तीन रंगाच्या पावत्या छापिलपैकी गुलाबी पावती संबधीत शाळा, पिवळी पावती पुरवठाधारक देयकासोबत जोडुन गटस्तरावर सादर करतील व पांढरी पावती स्वत: पुरवठादार ठेवील. देयकासोबतच्या पिवळ्या पावत्यांची निवडक महीन्यांची तपासणी केली असता करारातील अटी, शर्ती व शासन निर्णयाप्रमाणे पावतीवर पुरवठ्याचा दिनांक, वाहनक्रमांक, मालवहातुक करणाऱ्याचे नांव, तीनही पावत्यावर वजनाचा दर्ज्याचा व सुस्थितीत प्राप्त झाल्याची पोहच मुख्याध्यापक देतील. परंतु, पावतीवर फक्त मुख्याध्यापकाची सही आहे. त्यामुळे माल योग्य सुस्थितीत वजन योग्य असलेबाबत व मालपोहच करण्याचा टाईम नमुद नाही.

3) करारातील अटी शर्ती नुसार मालाचा पुरवठा आदेश दिल्यापासून 15 दिवसांच्या आत मालाचा पुरवठा करणे बंधनकारक आहे. तथापि लेखापरिक्षणास उपलब्ध केलेल्या नस्तीस पुरवठा आदेश आढळुन न आल्याने माल मुदतीत व मागणी केलेनुसारच प्राप्त झाले बाबत खात्री करता आली नाही.

4) अधिक्षक (वर्ग2) शालेय पोषण आहार पंचायत समिती रावेर कडील दिनांक 27/01/2016 अन्वये तांदूळ व धान्यादी मालाचा पुरवठा होत नाही. डिसेंबर व जानेवारी 2016 साठी दिनांक 15/11/2015 रोजी मागणी करूनही मागणी प्रमाणे पुरवठा होत नसलेबाबत कळविले आहे. करारनाम्यातील अट क्रमांक 14 नुसार धान्यादी मालाचा शाळेमध्ये 20 दिवस पुरेल इतका साठा शिल्लक असतांना पुरवठा आदेश देण्यात येतील, हे पुरवठादारास मान्य असतांना उपरोक्त बाबत पुरवठा आदेश वेळेवर दिला नाही किंवा पुरवठा वेळेवर केला नाही. पुरवठा वेळेवर केला नसेल तर पुरवठादारावर दंडात्मक कार्यवाही केलेली दिसून येत नाही.

5) अधिक्षक (वर्ग2) शालेय पोषण आहार, पंचायत समिती, भुसावळ कडील दिनांक 04/02/2016 अन्वये जिल्हा परिषद, प्राथमिक शाळा फुलगाव, तालुका भुसावळ येथील चवळी 50 किलो व वाटणा 62 किलो तसेच महर्षी व्यास माध्यमिक विद्‌यालय बेल्याळे तालुका भुसावळ येथील चवळी 30 किलो निकृष्ट कीड लागलेली आहे, ती बदलून देणे बाबत कळविले आहे. याबाबत शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांनी दर तीन महिन्यातून एकदा पुरवठादारांच्या गोदामाची तपासणी करावी. परंतु, तपासणी केलेबाबत नस्ती सोबत तपासणी अहवाल आढळून आला नाही.

6) उपरोक्त शासन परिपत्रक क्रमांक दिनांक 26/02/2010 मधील अट क्रमांक (इ-1) चा IV सर्व क्षेत्रिय अधिकारी, जिल्हा भरारी पथके, राज्यस्तरावरील दक्षता पथके यांचेमार्फत आहाराचा दर्जा तपासण्यात येईल. परंतु, नस्तीसोबत तसा कुठलाही अहवाल प्राप्त झाला नाही.

7) गटशिक्षणाधिकारी पंचायत समिती, भडगाव कडील पत्र दिनांक 11/02/2016 अन्वये सभापती यांनी दिनांक 08/02/2016 रोजी जिल्हा परिषद शाळा, वडगाव बुद्रक येथे शाळेला भेट दिली असता पोषण आहार साठा मागणीपेक्षा जास्त माल बळजबरीने उतरविणे व कालबाहय माल आढळून आलेने प्रत्यक्ष शाळेवर पंचनामा सभापती, सरपंच, केंद्रप्रमुख, ग्रामस्थ यांच्या समक्ष दिनांक 08/02/2016 रोजी केला असता त्यात तांदुळ, मसुरदाळ, मुंगदाळ, चवळी, वाटणा इत्यादी वस्तू निकृष्ट दर्जाचे आढळून आले. तसेच कांदा लसून मसाला मुदत संपलेली पाकिटे आढळून आले.

8) तांदूळ व इतर धान्यादी मालाच्या पुरवठ्या संदर्भात सर्व यंत्रणामध्ये समन्वय राखण्यासाठी शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांनी दरमहा जिल्ह्यातील गटशिक्षणाधिकारी, अधिक्षक (वर्ग 2) शालेय पोषण आहार पुरवठाधारकाचा जिल्हा व्यवस्थापक यांची मिटिंग घेऊन शालेय पोषण आहार संदर्भात माल योग्य व नियमित पुरवठा होतो याबाबत खात्री करावी. तशी कार्यवाही केलेचे दिसत नाही.

9) तालुका स्तरावर गटशिक्षणाधिकारी, अधिक्षक (वर्ग 2) यांनी शाळेला भेटी देऊन पटसंख्या योग्य असलेबाबत तसेच मागणी केलेल्या धान्यादी मालाचे प्रमाण योग्य असलेबाबत खात्री करणे आवश्यक आहे. नस्तीसोबत तपासणी अहवाल आढळून आले नाही.

**3.79 माध्यमिक शाळांना ग्रीन बोर्ड पुरविणेबाबत**

**जिल्हा परिषद जळगांव, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 11) -** प्रमाणक क्रमांक 421, दिनांक 31/03/2016 रक्कम रूपये 86,75,306 एस.आर.के.फर्निचर जयपूर यांना माध्यमिक शाळांना ग्रीन बोर्ड पुरविणेबाबत प्रदान केलेले आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) प्राचार्य औद्‌यागिक प्रशिक्षण संस्था दिनांक 30/10/2015 चे शासन निर्णयाप्रमाणे सक्षम प्राधिकाऱ्याकडून तपासणी अहवाल प्राप्त झाल्याशिवाय देयके अदा करू नये, असे असतांना तपासणी अहवाल उपलब्ध नसतांना देयके पारित केल्याने अनियमितता झालेली आहे.

2) बोर्ड शाळेत बसविल्यानंतर शाळेच्या मुख्याध्यापकांचा अहवाल लेखापरिक्षणास उपलब्ध झाला नाही.

3) पुरवठा करावयाच्या साहित्याच्या एकूण रक्कमेच्या 2 टक्के सुरक्षा अनामत म्हणून एक महिन्याच्या कालावधीसाठी राखून ठेवण्याचे असतांना तशी कार्यवाही केलेली नाही.

**3.80 मंजुर आकृतीबंधाबाबत.**

**जिल्हा परिषद जळगांव, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 12) -** याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत. प्राथमिक शिक्षण विभाग, जिल्हा परिषद जळगांव सन 2015-2016 लेखा परीक्षण केले असता सोबतच्या परिशिष्टानुसार पदे कार्यरत आहेत. परिशिष्टात नमूद केले प्रमाणे वेगवेगळया शासन निर्णयान्वये कक्ष अधिकारी कार्यालयीन अधिक्षक, कनिष्ठ लेखाधिकारी, लघुलेखक, वरिष्ठ सहाय्यक, कनिष्ठ सहाय्यक, परिचर असे एकूण 154 पदे मंजूर आहेत. अर्धसमासपत्र क्रमांक 2 दिनांक 31/08/2016 देऊन मंजूर आराखडा मागणी केली असता सदर आराखडा लेखापरीक्षणास उपलब्ध झाला नाही. केवळ शासन निर्णय उपलब्ध करुन देण्यात आले आहेत. अर्धसमासपत्रास दिलेल्या उत्तरानुसार प्राथमिक शिक्षण विभागाकडून माध्यमिक शिक्षण विभागाकडे कक्ष अधिकारी वरिष्ठ सहाय्यक, कनिष्ठ सहाय्यक यांच्या प्रतिनियुक्त्या केलेल्या आहेत. उपलब्ध शासन निर्णयानुसार सदरची पदे ही प्राथमिक शिक्षण विभागाकडे मंजूर असून माध्यमिक शिक्षण विभाग हा जिल्हा परिषद अंतर्गत नाही. त्यामुळे सदर विभागाकडे प्रतिनियुक्ती देतांना महाशय विभागीय आयुक्त नाशिक विभाग, नाशिक यांची मंजूरी असणे आवश्यक आहे. असे असतांना तशी मंजूरी लेखापरीक्षणास उपलब्ध झाली नाही. प्रतिनियुक्ती ही शिक्षण अधिकारी प्राथमिक यांच्या आदेशान्वये करण्यात आलेली आहे. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, जळगांव यांचे आदेश नाहीत. माध्यमिक शिक्षण विभागाकडील मंजूर पदे व प्राथमिक शिक्षणविभागाकडील प्रतिनियुक्ती पदांचा मेळ घेतलेला नाही.

**3.81 जिल्हा परिषद प्राथमिक शाळांना पुस्तक खरेदीसाठी रक्कम वितरणाबाबत.**

**जिल्हा परिषद अहमदनगर, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 14) -** जिल्हा परीषद प्राथमिक शाळांना लोकसहभागातुन संगणक घेणा-या शाळांसाठी आज्ञावली / सॉप्टवेअर पुरवठा या योजनेअंतर्गत विज्ञान पुस्तके खरेदी करणेसाठी मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे पत्र क्रमांक कार्या-5/अंदाज-2/78/2016, दिनांक 09/02/2016 ने प्रशासकीय मान्यता दिली आहे व मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे पत्र क्रमांक कार्या-5/अंदाज-2/79/2016, दिनांक

09/02/2016 अन्वये तांत्रिक मान्यता देण्यांत आली आहे. सदर खर्चास स्थायी सभा ठराव क्रमांक 443, दिनांक 16/05/2015 ने मंजूरी दिलेली आहे, तसेच रक्कम रुपये 20,00,000/- तरतुद करण्यांत आली होती.

पुस्तके खरेदी करणेसाठी मुख्यकार्यकारी अधिकारी यांचे अनुदान वितरण आदेश क्रमांक कार्या-5/अंदाज-1/ 80/2016, दिनांक 30/03/2016 ने एकूण 14 तालुक्यांना रक्कम रुपये 19,99,690/- तरतूद वितरीत करण्यात आली आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सदर योजनेसाठी पुसतके कमी दरात खरेदी होणेसाठी जिल्हा परिषद स्तरावर ई-टेंडरिंग प्रक्रिया राबविणे अपेक्षित असतांना अनुदान तालुका स्तरावर वितरीत करण्यात आले आहे. त्यामुळे जिल्हा परिषदेस स्पर्धात्मक दराचा लाभ झाला नाही.

2) अंदापत्रकात तरतूद केली आहे व तरतूद व्यपगत होऊ नये या उद्देशाने अनुदान दिनांक 30/03/2016 रोजी तालुका स्तरावर वितरीत केल्याचे दिसते.

3) सदर योजना ही लोकसहभागातुन संगणक पुरविलेल्या शाळांअंतर्गत ग्रंथालयासाठी अवांतर पुस्तके खरेदीसाठी असुन 583 शाळांसाठी एकूण रुपये 19,99,690/- अनुदान वितरीत केले असून तालुक्यांना अनुदान वितरण करतांना संबंधीत शाळेत ग्रंथालय तसेच अनुषंगिक बाबी उपलब्ध आहेत किंवा नाही याची पडताळणी केल्याचे आढळून येत नाही.

4) पुस्तके खरेदी करणेसाठी मार्गदर्शक सूचना निर्गमित केलेल्या नाहीत.

5) या योजनेमुळे पुस्तके पुरविलेल्या ग्रंथालयातील लाभार्थ्यांच्या गुणवत्तेत वाढ झाली किंवा नाही? याबाबत फलनिष्फती अहवाल प्राप्त करुन योजना सफल झालेबाबत अहवाल सादर करावा.

**3.82 सांस्कृतिक कार्यक्रम गुणवत्ता मिशन स्पर्धा व विविध शैक्षणिक स्पर्धा आयोजित करणे खर्चाबाबत.**

**जिल्हा परिषद अहमदनगर, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 15) -** जिल्हा परिषद स्वनिधी अंतर्गत सांस्कृतिक गुणवत्ता मिशन स्पर्धा व विवीध शैक्षणिक स्पर्धा बक्षिस समारंभ योजना अंतर्गत खर्च करणेत आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सदर योजनेसाठी तालुकास्तरावर वित्तप्रेषणाव्दारे रक्कम रूपये 2,80,000/- अदा केलेली आहे. मात्र तालुक्यांनी उपयोगिता प्रमाणपत्र न दिल्यामुळे तालुक्यांनी रक्कमा खर्च केल्या किंवा कसे याची तपासणी करता आली नाही.

2) जिल्हा स्तरावर स्पर्धा आयोजन करणेसाठी विभाग प्रमुखांनी रुपये 1,95,000/- अग्रीम घेतलेला असून लेखापरिक्षण कालावधी अखेरपर्यंत खर्चाबाबत अभिलेखे सादर करणेत आलेले नाही.

3) जिल्हा स्तरावर रुपये 25,000/- खर्च सन 2014-2015 मध्ये करणेत आला असल्याचे नस्ती मधील नोंदीत नमूद असून त्याबाबत सविस्तर अभिलेखे पडताळणीस उपलब्ध झाले नाहीत.

**3.83 शालेय पोषण आहार योजनेबाबत.**

**जिल्हा परिषद अहमदनगर, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 19) -** सदरबाबत रूपये 36,09,10,350/- इतका खर्च झालेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) शालेय पोषण आहार योजनेची अमलबजावणी करण्यासंदर्भात महाराष्ट्र शासन, शासन निर्णय क्रमांक शापोआ-2009/प्र.क्र.136/प्राशि-04, दिनांक 15/07/2009 अन्वये धान्यादी मालाचा पुरवठा करणेसाठी मागविण्यात आलेल्या जाहीर निविदेतून महाराष्ट्र स्टेट को आप्रेटिव्ह कन्झ्युमर्स फेडरेशन लि.मुंबई यांची कमी दराची निविदा मंजूर करणेत आलेली आहे व त्यानुसार धान्यादी मालाचा पुरवठा जिल्हयातील सर्व शाळांना पुरवठा केला जातो.

2) महाराष्ट्र शासन, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन परिपत्रक क्रमांक शापोआ-2009/प्र.क्रमांक383/ प्राशि-04, दिनांक 26/02/2010 मधील अट क्रमांक (क्र.-4) नुसार पुरवठा आदेशानंतर पुरवठाधारकाने 15 दिवसांच्या आंत मालाचा पुरवठा प्रत्येक शाळेत करणे आवश्यक आहे. तसेच अट क्रमांक (क-5) नुसार पुरवठादार गुलाबी, पिवळी व पांढरी अशा तीन रंगाच्या पावत्या छापिलपैकी गुलाबी पावती संबधीत शाळा, पिवळी पावती पुरवठाधारक

देयकासोबत जोडुन गटस्तरावर सादर करतील व पांढरी पावती स्वत: पुरवठादार ठेवील. देयकासोबतच्या पिवळ्या पावत्यांची निवडक महिन्यांची तपासणी केली असता करारातील अटी शर्ती व शासन निर्णयाप्रमाणे पावतीवर पुरवठ्याचा दिनांक, वाहन क्रमांक, मालवाहतुक करणाऱ्याचे नांव, तीनही पावत्यावर वजनाचा दर्ज्याचा व सुस्थितीत प्राप्त झाल्याची पोहच मुख्याध्यापक देतील. परंतु, पावतीवर फक्त मुख्याध्यापकाची सही आहे. त्यामुळे माल योग्य सुस्थितीत वजन योग्य असलेबाबत खात्री होत नाही.

3) उपरोक्त शासन परिपत्रक क्रमांक दिनांक 26/02/2010 मधील अट क्रमांक (ड-1)नुसार मालाचा पुरवठा झाल्यानंतर त्यांचे प्रत्येकी 250 ग्रॅम नमुने गट शिक्षणाधिकारी / अधिक्षक शालेय पोषण आहार यांनी त्यांचे पत्रासोबत शासकीय प्रयोगशाळेत पाठवावे व त्याचा खर्च पुरवठादाराने करावा असे असतांना देयकासोबत प्रयोगशाळेतील तपासणी अहवाल जोडण्यात आलेला आहे. प्रत्येक तालुक्याचा वेगवेगळा अहवाल असणे आवश्यक असतांना एकाच तपासणी अहवालाची झेरॉक्स काढुन प्रत्येक तालुक्याच्या देयकाच्या सोबत जोडण्यात आल्याने पुरवठादाराचे आर्थिक हित जोपासले आहे व माल तपासणीबाबत हलगर्जीपणा केलेला दिसतो. प्रयोगशाळा तपासणी अहवालाचे अवलोकन केले असता मालाच्या नमुन्याचा पुरवठा दिनांक 16/10/2015 रोजी करण्यात आला व रिपोर्ट No-6657- Government of Maharashtra District Public Health Laboratory Ahmednagar दिनांक 07/12/2015 रोजी जिल्हा परिषदेस प्राप्त झालेला आहे. पुरवठा आदेश जर दिनांक 16/10/2015 ला देण्यात आला व मालाचा पुरवठा ऑक्टोबर 2015 मध्ये झालेला आहे. तर तपासणी डिसेंबर 2015 झालेली असल्याचे दिसून येते. तपासणीकरीता कोणत्या धान्याच्या मालाचे नमुने दिले व पुरवठा न होताच तपासणी अहवाल पुरवठादाराने कोणत्या नमुनेच्या आधारावर सादर केला? सदर बाब गंभीर स्वरुपाची आहे. त्यामुळे पुरवठा झालेला माल योग्य असलेबाबत खात्री होत नाही.

**3.84 30 सप्टेंबरच्या विदयार्थी पटसंख्येरनुसार शिक्षक निश्चितीबाबत नस्ती लेखापरीक्षणास उपलब्ध न केलेबाबत.**

**जिल्हा परिषद पुणे, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 3) -** सन 2015-2016 या वित्तीय वर्षाचे लेखापरिक्षणात शिक्षण विभागाकडील 30 सप्टेंबर चे अनुषंगाने शिक्षक निश्चितीबाबतची नस्ती तपासता नस्तीसोबत 30 सप्टेंबर च्या विदयार्थी पटसंख्येनुसार शिक्षक निश्चितीबाबतचे उपसंचालक, शिक्षण विभाग, पुणे यांचे मंजूरी आदेशाची प्रत त्या अनुषंगाने समायोजन नस्ती, इ. लेखापरीक्षणास उपलब्ध झाले नाही. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) शासन निर्णय, शालेय शिक्षण विभाग क्रमांक पी.आर 1093/211शिक्षण/1, दिनांक 30/01/1996 अन्वये व शासन निर्णय दिनांक 06/10/2008 अन्वये सप्टेंबर अखेरची पटसंख्या विचारात घेऊन त्याअनुषंगाने मंजुर असलेले शिक्षक पदांची संख्या निश्चित करुन कमी / जादा शिक्षकांचे समायोजन जेथे कमी संख्या असेल त्या ठिकाणी दिनांक 30 ऑक्टोंबर पूवी करावयाचे आहे, असे असताना सन 2015-2016 मध्ये याप्रमाणे कार्यवाही केल्याचे दिसून आले नाही. त्यामुळे अतिरिक्त शिक्षकांचे वेतनावर नाहक खर्च झालेला आहे. तसेच जेथे शिक्षकांची कमी संख्या आहे. त्याठिकाणचे विदयार्थ्यांचे एक प्रकारे शैक्षणिक नुकसानच झाले आहे.

2) याबाबत दिलेल्या ऑनलाईन अहवालातील प्रतीनुसार तालुकानिहाय मंजुर व कार्यरत पदे असल्याचे दिसुन येते. सबब सदर प्रतीवर शिक्षण अधिकारी यांची स्वाक्षरी नाही.

3) उपरोक्तप्रमाणे तालुकानिहाय ज्या ठिकाणी पटसंख्येपेक्षा जादा शिक्षक आहेत. त्यांचे समायोजन हे ज्या ठिकाणी कमी शिक्षक आहेत. त्यांचे जागी करणे आवश्यक आहे. उपरोक्त तक्त्यात नमूद केलेप्रमाणे तालुकानिहाय मुख्याध्यापकांची 71 पदे कमी असुन इतर तालुक्यात 8 पदे जास्त आहेत. उपशिक्षकांची 665 पदे कमी असुन इतर तालुक्यात 137 पदे जास्त आहेत. पदवीधर ची 205 पदे कमी असुन इतर तालुक्यात 10 पदे जास्त आहेत. या सर्व पदांचे समायोजन हे ज्या ठिकाणी कमी संख्या आहेत त्यांचे जागी करणे आवश्यक आहे.

4) उपरोक्त तक्त्याप्रमाणे अतिरिक्त झालेल्या शिक्षकांचे वेतन व भत्ते रककमांची परिगणना करुन रक्कम वसुलात आणुन शासन निधीत भरणा करण्यात यावी.

**3.85 एलपीजी अनुदान वाटपातील अनियमिततेबाबत.**

**जिल्हा परिषद पुणे, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 11) -** शालेय पोषण आहार विषयक प्राप्त व वितरीत अनुदानाची माहिती मागवली असता ती अप्राप्त असल्याने खालील बाबींचा खुलासा होणे आवश्यक आहे.

1) अनुदान वितरण आदेश जावक क्रमांक शिक्षण/प्राथ/शापोआ/4/2016 पुणे, दिनांक 07/01/2016 व जावक क्रमांक शिक्षण/प्राथ/शापोआ/3/2016 पुणे, दिनांक 07/01/2016 ने जिल्हा परिषद पुणे अंतर्गत पंचायत समित्या / कटक मंडळे / महानगरपालिका शिक्षण मंडळातील शाळांना दिनांक 18/09/2012 ते दिनांक 31/03/2013 या कालावधीतील एल.पी.जी.वाढीव अनुदान अनुक्रमे राज्य व केंद्र हिस्सा रक्कम रूपये 3,63,54,750/- व रक्कम रूपये 10,90,64,250/- अशी एकूण रक्कम रूपये 14,54,19,000/- अनुदान वितरीत करण्यात आलेले आहे. तथापि, सदर अनुदान त्याच बाबीसाठी वापरले आहे. याबाबतचे विनियोग दाखले घेण्यात आलेले नाहीत.

2) महाराष्ट्र शासन, शासन निर्णय क्रमांक शापोआ-2113/प्र.क्र.199/वि.वि.-3, दिनांक 17/03/2015 नुसार दिनांक 18/09/2012 ते दिनांक 31/03/2013 या कालावधीत शालेय पोषण आहार एल.पी.जी.सिलींडरचा वापर करून शिजवणाऱ्या शाळामार्फत अन्न शिजवणाऱ्या यंत्रणांनाच अदा करणेचे आहे. सदर शासन निर्णय दिनांक 18/09/2012 ते दिनांक 31/03/2013 या कालावधीच्या नंतर निर्गमित झालेला असल्याने सदर यंत्रणांनी त्या कालावधीत प्रत्यक्ष गॅस पुरवठा नोंदवही व वितरकाकडील पुरवठा चलने तपासणी / खातरजमा करून योग्य ती अनुदानाची रक्कम वितरीत करणे आवश्यक होते. तथापि, शिक्षण विभागाने प्रती 600 लाभार्थी 1 सिलेंडर याप्रमाणे अनुदान वितरीत केलेले आहे. प्रत्यक्ष व्यक्त केलेल्या अंदाजाप्रमाणे उपरोक्त कालावधीच्या अगोदर अंदाजित रक्कम आदा करणे उचित होते. मात्र व्यक्त केलेले अंदाज कमी जास्त होऊ शकतात. याच सामान्य वित्तीय तत्वानुसार अन्न शिजवण्यासाठी अन्न शिजवणाऱ्या यंत्रणांना दिनांक 18/09/2012 ते दिनांक 31/03/2013 या कालावधीत गॅस पुरवठा नोंदवही व वितरकाकडील पुरवठा चलने न तपासता लाभार्थी संख्येनुसार अनुदान वितरीत केलेले असल्याने संबंधीताना जादा रक्कम अदा होऊन शासनाचे नुकसान झाल्याची शक्यता नाकारता येत नाही. ही बाब गंभीर असून सिलेंडरच्या प्रत्यक्ष पुरवठा व वापर न तपासता अनुदान वितरीत करण्याचे प्रयोजन काय? याबाबत खुलासा करावा.

3) शाळांकडून घेण्यात आलेल्या हमीपत्रानुसार उपरोक्त कालावधीतील लाभार्थी संख्या पडताळणी केल्याबाबत उपलब्ध अभिलेख्यावरून दिसून येत नाही.

तरी शाळांकडील / अन्न शिजवणाऱ्या यंत्रणांकडील गॅस पुरवठा नोंदवही व वितरकाकडील पुरवठा चलने यांची प्रत्यक्ष पडताळणी करून जादा दिलेले अनुदान संबंधीतांकडून वसूल करून शासन निधीत भरणा करणे आवश्यक आहे.

**3.86 इयत्ता 1 ते 4 थी मधील दुर्बल घटकातील अ.जा. व अ.ज.च्या विद्यार्थीनींना शाळेत नियमित येणेसाठी उपस्थिती भत्ता अनुदान वाटपातील अनियमिततेबाबत.**

**जिल्हा परिषद पुणे, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 20) -** शिक्षण व सेवायोजन विभाग, शासन निर्णय क्रमांक पीआरई-1091/(9614)/प्राशी-1, दिनांक 10/01/1992 अन्वये प्राथमिक शाळेत जाणा-या मुलींचे गळतीचे प्रमाण कमी करण्यासाठी व नियमित उपस्थितीचे प्रमाण वाढविण्यासाठी इयत्ता 1 ली ते 4 थी चे विद्यार्थीनींना उपस्थिती भत्ता अनुदान वाटप करण्यात येते. त्याअनुषंगाने सन 2015-2016 मधील दुर्बल घटकातील अ.जा. व अ.ज.च्या विद्यार्थीनींना शाळेत नियमित येणेसाठी उपस्थिती भत्ता अनुदान वाटपाची नस्ती तपासता याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) उपरोक्तप्रमाणे अनुदान वाटप नस्ती तपासता व त्यात नमूद कोषागारातुन आहरित रक्कमेबाबत प्रमाणक क्रमांक 219, दिनांक 28/12/2016 अन्वये रक्कम रुपये 7,84,000/- आहरित केली असुन रक्कम रूपये 7,84,000/- हे तालुकास्तरावर विलंबाने शैक्षणिक वर्ष संपलेचे वेळेस व वित्तीय वर्षाचे शेवटी माहे मार्च 2016 मध्ये वाटप करण्यात आले आहे. अनुदान वाटप आदेश व नस्ती तपासता सदरची योजना ही मुलींची शाळेतील उपस्थिती वाढविण्यासाठी राबविण्यात येते. तथापि, अनुदान हे विहीत मुदतीत वाटप न केलेने योजनेचा मूळ उद्देश

प्राथमिक शाळेत जाणा-या मुलींचे गळतीचे प्रमाण कमी करणे व नियमित उपस्थितीचे प्रमाण वाढविणे हे सफल होत नाही.

2) तसेच माहे मार्च मध्ये तालुक्यांना अदा केलेले अनुदान वाटप हे शाळांपर्यत वर्षाचे शेवटी जमा झालेने इयत्ता 4 थी तील मुली ह्या इयत्ता 5 वीत गेल्याने सदरचे अनुदान हे मुलींना अदा केले किंवा कसे? याबाबतचा अहवाल, विनियोग अहवाल अथवा लाभार्थी पोहोच उपलब्ध नसल्याने खात्री करता आली नाही.

3) सदरचे अनुदान अदा करताना ते विदयार्थ्यांच्या खात्यावर जमा करावयाचे आहे. याबाबत तालुकास्तरावरील अहवाल उपलब्ध नसल्याने खात्री करता आली नाही.

4) सदर याजनेतून सन 2015-2016 मध्ये तालुका स्तरावर एकूण रूपये 6,56,230/- इतके अनुदान वाटप केले असून रूपये 1,27,770/- अनुदान अखर्चित राहिल्याने रक्कम रूपये 127770/- शासन खाती भरणा करून पूर्तता करावी.

**3.87 प्राथमिक शाळांसाठी सौर अभ्यासिका खरेदी / स्थापन करणे याबाबीवरील खर्चातील अनियमिततेबाबत.**

**जिल्हा परिषद पुणे, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 24) -** जिल्हा परिषद प्राथमिक शाळांसाठी सौर अभ्यासिका खरेदी / स्थापन करणे यासाठी जिल्हा परिषदेने स्वनिधीतून प्रमाणक क्रमांक 122, दिनांक 11/09/2015 अन्वये रक्कम रूपये 39,67,400/- इतकी रक्कम खर्च केली आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) पुरवठा आदेश क्रमांक जि.प./शिक्षण/प्राथ/2/122/15 पुणे, दिनांक 24/03/2015 मधील अटीनुसार पुरवठादाराने पुरवठा दिनांक 31/03/2015 पूर्वी करणेचा आहे. अन्यथा, पुरवठा आदेश रद्द समजण्यात येईल असे नमूद केले आहे. तथापि, काही प्राथमिक शाळांकडील डिलिव्हरी चलने पाहता पुरवठा विहित वेळेत केलेचे नमूद आहे.

तथापि, पुरवठादाराने सादर केलेली बिले 1) tax invoice no. 611, दिनांक 30/03/2015 रक्कम रूपये 39,67,400/- व tax invoice no. 625, दिनांक 31/07/2015 रक्कम रूपये 39,67,400/-, 239 नग X रूपये 16,600/- अशी दोन बिले सादर करणेचे प्रयोजन काय? तसेच दिनांक 31/07/2015 च्या बिलास/ खर्चास इतक्या विलंबाने मान्यता कशी दिली? व त्यापूर्वी पुरवठादाराने पुरवठा कसा केला? यावरून पुरवठादाराचे हित जोपासल्याचे दिसून येते.

2) भारतीय मुद्रांक शुल्क अधिनियम 1957 मधील तरतुदीनुसार पुरवठादाराकडून रक्कम रूपये 3,100/- इतक्या मुद्रांक रक्कमेवर करारनामा करून घेणे आवश्यक असताना रक्कम रूपये 100/- चे मुद्रांक कागदावर करारनामा करून घेतल्याने शासनाचे रक्कम रूपये 3,000/- इतक्या महसुलाचे नुकसान झाले आहे. तरी संबंधीतांकडून रक्कम रूपये 3,000/- वसूल करून शासनास भरणा केलेचे दाखववावे.

3) प्राथमिक शाळा मुख्याध्यापकांचेकडून विनियोग दाखले नस्तीसोबत न आढळल्याने, सदर विनियोग दाखले घेऊन पूर्तता दाखववावी.

4) पुरवठादाराने मालाचा पुरवठा करारनाम्यानुसार व पुरवठा आदेशातील अटी व शर्थीनुसार करताना डिलिव्हरी चलनावर दिनांक नमूद करणे आवश्यक होते. तथापि, काही डिलिव्हरी चलनावर पुरवठ्याची दिनांक नमूद न केलेने पुरवठा विहित वेळेत न केल्याचे दिसते. मुख्याध्यापक, प्राथमिक शाळा कासुर्डी, खे.बा.तालुका भोर यांचे दिनांक 15/04/23015 रोजी जयेश इंडस्ट्रीजला पत्र - जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचे बांधकाम चालू असून बांधकाम पूर्ण होण्यास 6-7 महिने लागतील. त्यामुळे सदर कीट बसवून घेऊ शकत नाही. मात्र ताब्यात घेत आहे. (बांधकाम झाल्यानंतर कीट कार्यान्वित केले बाबत दाखला नाही.) मात्र पत्रासोबत असलेल्या 100 टक्के तपासणी अहवालात सिरीयल नंबर 150215 बॅटरी सौर मौड्युल सिरीयल नंबर 10389, कार्यान्वित केलेबाबत मुख्याध्यापकांनी अहवाल दिला आहे. त्यात दिनांक व साठा नोंदवहीत नोंद घेतलेबाबत पृष्ठ क्रमांक नमूद नाही. यावरून प्रत्यक्ष सौर अभ्यासिकेचा पुरवठा नक्की केव्हा केला? याची पडताळणी करता येत नाही.

**3.88 जिल्हा परिषदेच्या शाळांना संगणक पुरविणे.**

**जिल्हा परिषद सातारा, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 6) -** सदरबाबत प्रमाणक क्रमांक 65, दिनांक 12/02/2016 अन्वये रक्कम रुपये 44,80,509/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) उद्योग, उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांक भांखस 2014/प्र.क्र.82/भाग III/उद्योग 4, दिनांक 30/10/2015 मधील 3.1.1.2 मध्ये नमूद केलेनुसार खरेदीवर प्रशासकीय विभागानी प्रशासकीय आदेशात खरेदीची आवश्यकता व खरेदी केलेल्या वस्तूंचा विनीयोग तातडीने केला जाणार आहे, असे नमूद करणे आवश्यक असतांना त्याप्रमाणे विभागाने कार्यवाही केलेली नाही.

2) उपरोक्त शासन निर्णयातील प्रकरण क्रमांक 3.2.3 नुसार रक्कम रुपये 3 लाखापेक्षा जास्त किंमत असलेल्या व केंद्र शासनाचा दरकरार उपलब्ध असलेल्या केवळ ब्रँडेड वस्तुंची खरेदी करता येईल. तथापि, 3 लाखापेक्षा जास्त किंमतीच्या खरेदीसाठी खुल्या बाजारातील किंमती तपासून DGS&D च्या पॅनलवरील दरकरार धारकासह इतर उत्पादन वितरक / पुरवठादार यांच्याशी वाटाघाटी कराव्यात असे नमूद आहे. वाटाघाटीमध्ये सदरची वस्तू DGS&D च्या दरकरारापेक्षा कमी दराने उपलब्ध होत असल्यास संबंधीतांकडून किमान 3 पेक्षा अधिक दरपत्रके मागवून रुपये 1 कोटीपर्यंतची खरेदी करता येईल. उपरोक्त नमूदप्रमाणे शिक्षण विभागाने कार्यवाही करणे आवश्यक असतांना तशी कार्यवाही न करता शासन निर्णयाचे उल्लंघन करुन खरेदी केल्याचे जिल्हा परिषदेचे निश्चितच आर्थिक नुकसान झालेले आहे. शासन निर्णयातील परिच्छेद क्रमांक 2 मध्ये दिनांक 01/11/2015 नंतर करण्यात येणारी कोणतीही खरेदी सदरच्या कार्यपध्दतीनुसार करण्यात यावी असे नमूद असतांनाही त्याप्रमाणे विभागाने कार्यवाही केलेली नाही.

3) पुरवठा आदेश दिनांक 22/12/2015 मधील अट क्रमांक 1 नुसार खेरदी केलेले सर्व संगणक पुरवठादाराने संबंधीत शाळेत कार्यान्वित करुन देणे आवश्यक आहे असे नमूद आहे. खरेदी केलेले सर्व 121 संगणक कार्यान्वित असल्याबाबत आवश्यक कागदपत्रे नस्तीसोबत नाहीत.

4) DGS&D दिल्ली यांचा दरकरार हा HCL Infosystem Ltd. Noida यांच्याशी झालेला आहे. शिक्षण विभागाने पुरवठा आदेश HCL Infosystem Ltd. Noida यांना दिलेला आहे. तथापि मालाचा पुरवठा, डिलीव्हरी चलन, टॅक्स इन्व्हाईस इत्यादी सर्व बाबी कॉम्प्युटर वर्ल्ड सातारा यांच्या आहेत. पुरवठा आदेश ज्यांना दिलेला आहे त्यांच्याकडून माल प्राप्त करुन घेणे व संबंधितांना धनादेश आदा करणे आवश्यक असतांना त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही.

5) विभागाने HCL Infosystem Ltd. Noida यांना दिनांक 22/12/2015 रोजी दिलेल्या पुरवठा आदेशान्वये साहित्य पुरवठयाची मुदत दिनांक 21/01/2016 अखेर होती Computer World सातारा यांनी दिनांक 22/01/2016 रोजी मुदतवाढीसाठी अर्ज दिलेला असून शिक्षणाधिकारी यांनी दिनांक 25/01/2016 च्या पत्रान्वये Computer World सातारा यांना दिनांक 15/02/2016 अखेर मुदतवाढ दिलेली आहे. मुदतवाढीसाठी दरकरारातील पुरवठादारांकडून अर्ज प्राप्त होणे आवश्यक असतांना विभागाने Computer World सातारा यांना काय आधारे मुदतवाढ दिली याबाबत पुर्तता लेखापरीक्षणास सादर करावी.

**3.89 4 टक्के सादिलमधून फर्निचरसाठी केलेल्या खर्चाबाबत.**

**जिल्हा परिषद सातारा, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 10) -** शिक्षण विभागाने 4 टक्के सादीलमधून शिक्षण विभागात फर्निचर तयार करणेकामी 3 प्रमाणकान्वये रक्कम रुपये 7,74,227/- खर्च केलेला आहे. उपरोक्त खर्चाबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत..

1) शालेय शिक्षण विभाग, शासन निर्णय क्रमांक पीआरई/1094/704/(दोन/प्रशि1), दिनांक 14/11/1994 च्या शासन निर्णयातील प्रपत्र “ब” 4 टक्के सादील मधुन कोणत्या बाबीवर खर्च करावयाचा त्या बाबी नमूद आहे. सदर बाबींमध्ये कार्यालयातील फर्निचर ही बाब नमूद नसतांनाही शिक्षण विभागाने उपरोक्त शासन निर्णयाचे उल्लंघन करुन नियमबाहयपणे केलेला खर्च वसुलपात्र ठरतो.

2) विस्तार अधिकारी (शिक्षण) यांचे कक्षामध्ये फर्निचर तयार करणे, उपशिक्षणाधिकारी यांचे कक्षामध्ये फर्निचर तयार करणे व शिक्षणाधिकारी यांचे कक्षामध्ये फर्निचर तयार करणे या तीनही कामांची प्रशासकीय मान्यता / तांत्रिक मान्यता एकाच दिवशीची असून ठेकेदारास दिनांक 29/03/2016 रोजी कार्यारंभ आदेश दिलेला आहे. वास्तविक तीनही कामांची एकत्रितरित्या निविदा प्रसिध्द करणे आवश्यक असतांना तसे न करता व ई-निविदा पध्दतीचा अवलंब करावा लागु नये, म्हणून तुकडे पध्दतीने काम वाटप केलेले आहे. शासन निर्णयानुसार कामाचे तुकडे न पाडता एकत्रित काम करणे आवश्यक असतांनाही विभागाने त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही. अनुदान खर्च होण्याच्या उद्देशानेच कामाचे तुकडे पाडून दिनांक 29/03/2016 रोजी म्हणजेच आर्थिक वर्ष संपण्याच्या अगोदर 2 दिवस ठेकेदारास कार्यारंभ आदेश दिलेले आहेत.

3) देयकासोबत जोडलेल्या काम पुर्णत्वाच्या दाखल्यावर (नमुना नंबर 65) काम पुर्ण दिनांक नमूद नाही. काम पुर्णत्वाची तारीख नमूद नसल्याने प्रत्यक्ष काम कधी पुर्ण झाले याबाबत खात्री करता आलेली नाही. मात्र ठेकेदारास दिनांक 31/03/2016 रोजी रक्कमा प्रदान केलेल्या आहेत.

4) शिक्षण विभागाने ठेकेदारास कार्यारंभ आदेश देण्यापूर्वी करारनामा करणे आवश्यक होते. परंतू, ठेकेदाराने मुद्रांक खरेदी दिनांक 01/04/2016 रोजी केलेली आहे. म्हणजेच काम पुर्ण झाल्यानंतर करारनामा केलेला आहे. सदर करारनामा विधीग्राह्य होत नाही.

5) प्राथमिक शिक्षण संचालनालयाच्या दिनांक 03/09/2015 व दिनांक 07/01/2016 च्या पत्रान्वये अनुदान प्राप्त झाले असतांनाही विभागाने सदर कामाच्या कार्यवाहीसंदर्भात विलंब केलेला आहे. विलंबाबाबतची कारणमिमांसा लेखापरीक्षणास सादर करावी.

**3.90 शालेय शिक्षण आहाराअंतर्गत धान्यादी खरेदी खर्चाबाबत.**

**जिल्हा परिषद सातारा, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 12) -** शिक्षण विभागाने शालेय पोषण आहार योजनेअंतर्गत इयत्ता 1 ली ते 5 वी व इयत्ता 6 वी ते 8 वी मधील विद्यार्थ्यांना मध्यान्ह भोजन देण्यासाठी तांदुळ व्यतिरिक्त डाळी, तेल, मीठ, हळद, मोहरी, कडधान्ये आदी खरेदीसाठी उपरोक्त प्रमाणकान्वये रक्कम रुपये 15,05,69,040/- महाराष्ट्र स्टेट को - ऑप मार्केटिंग फेडरेशन लि. मुंबई यांना अदा केलेली आहे. सदर धान्यादी मालाचा पुरवठा शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य व व्यवस्थापक (अन्न धान्य), महाराष्ट्र स्टेट को-ऑप मार्केटिंग फेडरेशन लि., मुंबई यांचेबरोबर झालेल्या दिनांक 11/06/2014 चे करारानुसार करण्यात आला असून सदर योजनेअंतर्गत तांदुळ पुरवठा करण्याची रक्कम शिक्षण संचालक कार्यालय, पुणे यांनी आदा करावयाची आहे व उर्वरीत कडधान्ये व डाळी तेल, मीठ याबाबत पुरवठा करण्यात आलेल्या पदार्थांची रक्कम शिक्षण अधिकारी (प्राथमिक) यांनी आदा करावयाची आहे. त्यानुसार सन 2015-2016 मध्ये धान्यादी मालासाठी 22 प्रमाणकान्वये रक्कम रुपये 15,04,69,040/- खर्च करण्यात आलेला आहे. सदर खर्चासंबंधीत कागदपत्रांचे खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) इयत्ता 1 ली ते 5 वी च्या विद्यार्थ्यांची संख्या 1,76,430 व इयत्ता 6 वी ते 8 वी च्या विद्यार्थ्यांची संख्या 1,22,967 एवढी मंजुर करण्यात आलेली आहे. तसेच समाजकल्याण विभागाकडून जी वसतिगृहे चालविली जात आहेत, त्यांना समाजकल्याण विभागाकडून दरमहा अनुदान प्राप्त होत आहे व त्यातून सकाळचा नाष्टा व दोनवेळचे जेवण दिले जाते. असे असतांना शालेय पोषण आहार योजनेमध्येदेखील इयत्ता 5 वी ते 8 वी च्या विद्यार्थ्यांची निश्चिती करुन त्यांनादेखील फायदा दिला जातो. इयत्ता 5 वी ते 8 वी वसतीगृहाकडील विद्यार्थी संख्या कमी केली नसल्याने त्यापोटी जादा खर्च झाला आहे.

2) सन 2015-2016 मध्ये सन 2014-2015 च्या प्रमाणक क्रमांक 91, दिनांक 30/05/2015 अन्वये रक्कम रुपये 98,33,343/- आदा केली आहे. सन 2014-2015 ची रक्कम अखर्चित असतांनाही त्यावर्षी प्रदान न करता सन 2015-2016 मध्ये रक्कम का खर्च केली आहे? याचा बोध होत नाही.

3) प्राथमिक शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे परिपत्रक क्रमांक शापोआ/सुघायो/प्रशिसं/307/ 2014-15/3288, दिनांक 11/06/2014 मधील सुचना क्रमांक 1 अनुसार व्यवस्थापक, महाराष्ट्र स्टेट को-ऑप मार्केटिंग फेडरेशन लि., मुंबई या पुरवठादार संस्थेबरोबर दिनांक 11/06/2014 रोजी करारनामा केला आहे. त्या

करारनाम्यातील अटी व शर्तीनुसार संबंधीतांशी संबंधीत सर्व बाबींची अंमलबजावणी होईल, याची दक्षता घेणे आवश्यक आहे. तथापि, सदर करारनाम्यातील अट क्रमांक 13 अनुसार पुरवठादार यांनी शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद यांच्या कार्यालयात पुरवठा करण्यात आलेल्या आहारासंबंधीत पावत्या प्राप्त करुन देणे आवश्यक आहे. यासाठी पिवळया रंगाची पावती पुरवठादाराने देयकासोबत जोडून गटशिक्षणाधिकारी / अधिक्षक (शालेय पोषण आहार) यांचेकडून तपासणी करुन देयके शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद यांचेकडे सादर करणे आवश्यक आहे. पावतीवर तालुका, जिल्हा, पुरवठा दिनांक, वाहन क्रमांक व मालाची वाहतुक करणाऱ्याचे नांव इत्यादी तपशिल असेल. इयत्ता 1 ली ते 5 वी व 6 वी ते 8 वी साठी स्वतंत्र पावत्या राहतील. अशी कार्यपध्दती अवलंबण्याबाबत आदेश आहेत. तथापि, पुरवठादार यांनी बिलासोबत अशा प्रकारच्या पिवळया पावत्या सादर केलेल्या नाहीत. त्यामुळे मागणी केलेला तपशिल व रक्कम याचा प्रत्यक्ष पुरवठा केलेल्या मालाशी मेळ घेता आलेला नाही. त्यामुळे अदा केलेल्या रक्कमा योग्य असल्याबाबत सत्यता पडताळता येत नाही.

4) उपरोक्त प्रमाणकान्वये धान्यादी मालाच्या रक्कमा महाराष्ट्र स्टेट को-ऑप मार्केटिंग फेडरेशन, मुंबई यांना प्राप्त झाल्याबाबत पोहोच पावती घेणे आवश्यक होते. तथापि, तशा पावत्या घेण्यात आलेल्या नाहीत. त्यामुळे रक्कमा संबंधीतास प्राप्त झाल्याची सत्यता पडताळता आली नाही.

5) शिक्षण संचालक, प्राथमिक यांनी दिनांक 11/06/2014 रोजी केलेल्या करारामधील अट क्रमांक 3 अ नुसार ग्रामीण भागातील शाळांसाठी आवश्यक धान्यादी मालाचे पुरवठा आदेश शिक्षणाधिकारी यांनी द्यावयाचे आहेत. तथापि, त्याप्रमाणे आदेशाची कागदपत्रे नसल्याने तसेच करारनाम्यातील अट क्रमांक 19 नुसार विहीत मुदतीत पुरवठा झाला किंवा कसे? याबाबत पडताळणी करता आली नाही. त्यामुळे दंडाबाबत कार्यवाही झाल्याचे दिसून येत नाही.

6) उपरोक्त दिनांक 11/06/2014 चे करारनाम्यातील अट क्रमांक 9 नुसार पुरवठादार धान्यादी माल 10 किलो, तेल 1 लिटर, मसाल्याचे पदार्थ 100 ग्रॅम या पटीत पुरवठा करणे आवश्यक आहे. तथापि, बिलांमधील आकडेवारी पाहता त्याप्रमाणे कार्यवाही केल्याचे दिसून येत नाही.

7) करारनाम्यातील अट क्रमांक 22 नुसार पुरवठादार यांनी प्रत्यक्ष शाळांना धान्यादी मालाचा किती पुरवठा केला याचा तालुकानिहाय अहवाल शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांना सादर करणे पुरवठाधारकास बंधनकारक राहील. तथापि, तसे कोणतेही अहवाल पुरवठादार यांनी शिक्षण अधिकारी यांना दरमहा सादर केलेले नाहीत. त्यामुळे मागणी केलेल्या रक्कमेचा पुरवठ्याशी मेळ घेता आला नाही.

8) करारनाम्यातील अट क्रमांक 27 अनुसार देयकाची आदायगी करतांना उद्‌गम कपात (Tax Deduction at Source) करण्यात येईल. तथापि, तशा प्रकारे व्हॅट अथवा आयकर यांची वसुली न करता रक्कमा अदा केल्या आहेत.

शालेय पोषण आहार अन्नधान्यासाठी मार्केटिंग फेडरेशनला शिक्षणाधिकारी यांचेकडून रुपये 15,05,69,040/- इतकी रक्कम अदा झाली आहे. त्यावर शासन आदेशानुसार 5 टक्के प्रमाणे रक्कम रुपये 75,28,452/- इतकी रक्कम व्हॅट करापोटी कपात करणे आवश्यक आहे. व्हॅटबाबत विवरणपत्र सादर करण्यात यावे. अन्यथा, रक्कम वसुल करावी तसेच आयकर रक्कम रुपये 30,11,380/- वसुली करुन शासनास भरणा करणे आवश्यक आहे.

9) करारनामा दिनांक 11/06/2014 पाहता मिरची पावडर, हळद, सोयाबिन तेल या वस्तू ॲगमार्कच्या पुरवठा करणे आवश्यक होते. तथापि, प्रयोगशाळा चाचणी रिपोर्टमध्ये ॲगमार्कचा उल्लेख नाही. त्यामुळे अदा केलेली रक्कम ही नियमबाह्य आदा झालेली आहे.

10) सदर धान्यादी खर्चासाठी रक्कम रुपये 20,37,52,000/- अनुदान प्राप्त असून रक्कम रुपये 15,05,69,040/- एवढा खर्च झालेला आहे. शिल्लक रक्कम रुपये 5,31,82,960/- शासनास भरणा करुन पुर्तता दाखवावी.

**3.91 शैक्षणिक गुणवत्ता विकास कार्यक्रमाअंतर्गत झालेल्या खर्चाबाबत.**

**जिल्हा परिषद सातारा, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 16) -** सदरबाबत प्रमाणक क्रमांक 579, दिनांक 31/03/2016 अन्वये रक्कम रुपये 9,56,547/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) शिक्षण विभागाने सदर योजनेअंतर्गत करावयाच्या खर्चासाठी दिनांक 14/03/2016 ते दिनांक 21/03/2016 अखेर ई-निविदा प्रसिध्द केलेली होती. त्यामध्ये पुढील तीन संस्थांनी सहभाग घेतला होता. 1) सुश्रृषा साह्य मार्गदर्शन व प्रशिक्षण संस्था इस्लामपूर, 2) अंतरदिप फाऊंडेशन, आटके, 3) स्पंदन क्लिनिक, वाळवा उपरोक्त तीनही संस्थांनी Rehabilitation Council of India New Delhi यांचेकडे नोंदणीकृत प्रशिक्षण संस्था म्हणून नोंदणी केलेली आहे. तथापि, सदर संस्थांच्या नोंदणी प्रमाणपत्राची मुदत नोंदणीच्या दिनांकापासून 7 वर्षापर्यंत ग्राह्य असते. 7 वर्षानंतर पुर्ननोंदणी करणे आवश्यक असतांनाही संबंधीतांनी पुर्ननोंदणी केलेली नाही.

सुश्रृषा साह्य मार्गदर्शन व प्रशिक्षण संस्था इस्लामपूर, व स्पंदन या अधिकृत प्रशिक्षण संस्था नसून देखील त्यांनी निविदा प्रक्रियेत सहभाग घेतलेला आहे. उद्योग, उर्जा विभागाच्या दिनांक 30/12/2015 च्या शासन निर्णयान्वये 3 निविदाधारक पात्र नसलेने फेरनिविदा करणे आवश्यक असतांनाही त्याप्रमाणे विभागाने कार्यवाही न करता अपात्र निविदाधारक सुश्रृषा साहय मार्गदर्शन व प्रशिक्षण संस्था इस्लामपूर, यांना प्रशिक्षण देणेसंबंधी आदेश दिलेला आहे. नियमबाह्यपणे निविदा प्रक्रिया राबविलेली असलेने उपरोक्त सर्व खर्च रक्कम रुपये 9,56,547/- वसुलपात्र आहे.

2) शिक्षण विभागाने सदर योजना ही विद्यार्थ्यांचे आरोग्य नातेसंबंध व कार्यक्षमता वाढील लागेल व शैक्षणिक मागासलेपणा कमी होईल या उद्देशाने राबविलेली आहे. तथापि योजनेचा फलश्रृती अहवाल नस्तीसोबत नाही.

3) भारतीय आयकर कायदा कलम 194 (J) नुसार व्यवसायिक / तांत्रिक सेवांसाठी दिलेल्या प्रदानातून 10 टक्के आयकर कपात करणे आवश्यक असतांना देयकातून 2 टक्के प्रमाणे आयकर कपात केलेला आहे. (95,655 - 16,131) = रुपये 76,524/- आयकर वसुली आवश्यक आहे. सन 2013-2014 व 2014-2015 मध्ये जिल्हा परिषदेने सदर योजना राबविलेली असून त्याअंतर्गत प्रदान करण्यात आलेल्या रक्कमेतून 10 टक्के आयकर कपात करुन संबंधीतांकडून वसूल करुन शासनखाती भरल्याची पुर्तता लेखापरीक्षणास सादर करावी.

4) सदर योजना इयत्ता 5 वी मधील 14,000 विद्यार्थ्यांच्या बुध्दीमापनाच्या उद्देशाने तयार केलेली आहे. तथापि, विद्यार्थ्यांचे उपस्थिती प्रमाणपत्र, प्रशिक्षण कालावधी प्रशिक्षणाचे ठिकाण इत्यादी आवश्यक माहिती नस्तीसोबत नाही.

5) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक चिशा 2011/प्र.क्र.149/पंरा 9, दिनांक 07/01/2013 नुसार गुणवत्ता विकास कार्यक्रम राबविण्याच्या सुचना दिलेल्या आहेत. त्यामध्ये सदर प्रशिक्षण कार्यक्रमाचा समावेश नसतानाही जिल्हा परिषदेने सदर बाबींवर नियमबाह्यपणे केलेला खर्च रक्कम रुपये 9,56,547/- वसुलपात्र ठरतो.

**3.92 प्रोजेक्टर स्क्रीन खर्चाबाबत.**

**जिल्हा परिषद सांगली, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 3) -** शिक्षण विभागाचे सन 2015-2016 चे लेखापरीक्षण करताना जिल्हा परिषद स्विय निधीतून शाळाना साहित्य प्रमाणक क्रमांक 689, दिनांक 31/03/2016 अन्वये रक्कम रुपये 17,10,000/- खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सदर खरेदी प्रस्तावित निविदा मागविणे साठी 235 नग रूपये 18,00,000/- साठी मंजुरी दिली होती. परंतु, प्राप्त निविदेमध्ये संख्या नमूद न करता फक्त रक्कमा नमूद केल्या आहेत व 191 नग साहित्य पुरवले आहे. याबाबत खुलासा होणे आवश्यक आहे.

2) प्राप्त निविदेपैकी कोणाचेही ISO / ISI प्रमाणपत्र नाही. अनुभव प्रमाणपत्र नाही. असे असतानाही जास्तीजास्त स्पर्धात्मक दर प्राप्त होतील, असे नमूद करून सर्व निविदा पात्र ठरवून लखोटा क्रमांक 2 उघडणेस मान्यता दिली आहे. ही बाब नियमबाह्य आहे.

3) लखोटा क्रमांक 1, दिनांक 21/03/2016 उघडले नंतर त्यावर वित्त विभागाचे अभिप्राय न घेता वरील प्रमाणे कार्यवाही केली आहे. सदरबाब योग्य नाही.

4) लखोटा क्रमांक 2 उघडल्यानंतर मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडे मंजुरीसाठी टिपणी सादर केलेनंतर वित्त विभागाचा तांत्रिक अभिप्राय घेणेबाबत नमूद केल्याने वित्त विभागाकडे टिपणी सादर केल्यानंतर वित्त विभागाने लखोटा क्रमांक 1, दिनांक 21/03/2016 उघडले नंतर त्यावर वित्त विभागाचे अभिप्राय घेण्यात आले नसल्याचे नमूद करून निविदा समितीसमोर निविदा प्रक्रिया ठेवण्याबाबत शेरा नमूद केला असताना तशी कार्यवाही केल्याची कागदपत्रे व निविदा समितीचे प्रोसिडिंग नस्तीसोबत नाही. त्यामुळे त्याप्रमाणे कार्यवाही केली किंवा नाही? याची खात्री करता येत नाही.

5) पुरवठा आदेशानुसार पुरवठा 15 दिवसात म्हणजेच दिनांक 15/04/2016 ला करणे आवश्यक असताना त्यानंतर केला आहे. म्हणून रक्कम रुपये 2,32,775/- च्या 0.5 टक्के प्रती आठवडा रूपये 1,164/- प्रमाणे 1 आठवड्याचे व 4 दिवसाचा रुपये 1,829/- चा दंड वसूल करावा.

तसेच बाकीच्या 165 शाळाच्या डिलिव्हरी चलनावर दिनांक नमूद नाही. त्यामुळे त्यांना किती दिवसांनी साहित्य प्राप्त झाले? याची खात्री करता येत नाही. तथापि, वरील दिनांक नमूद पहाता किमान 1 आठवडा उशिरा साहित्य प्राप्त झाले असावे, असे समजून रूपये 14,41,413/- रक्कमेच्या साहित्यावर 0.5 टक्के प्रती आठवडा प्रमाणे रूपये 7,207/- असा एकूण दंड रक्कम रूपये 9,036/- वसूल करावी.

6) उशिरा साहित्य प्राप्त होवूनही म्हणजेच दिनांक 31/03/2016 रोजी साहित्य पुरवठा न करता Invoice दिनांक 31/03/2016 रोजी कसे दिले? याचा खुलासा करावा.

7) उशिरा साहित्य प्राप्त होवूनही म्हणजेच दिनांक 31/03/2016 रोजी साहित्य प्राप्त न होता तत्पूर्वी उक्त प्रमाणकाने दिनांक 31/03/2016 रोजी रक्कम कशी आदा केली? याबाबत खुलासा होणे आवश्यक आहे.

8) पुरवठा आदेश देणेपुर्वी 4 शाळांना साहित्य प्राप्त झाल्याचे डिलिव्हरी चलनावरून दिसून येते. तरी ह्याबाबत खुलासा करावा. अन्यथा 4 शाळांची रक्कम रुपये 8,953/- प्रती शाळाप्रमाणे रक्कम रूपये 35,182/- वसूल करून पूर्तता दाखवावी.

9) सदर रक्कम दिनांक 31/03/2016 अखेर खर्च करणेस मान्यता असताना दिनांक 31/03/2016 रोजी 15 दिवसात साहित्य पुरवठा करणेस पुरवठा आदेश कसा दिला? याचा खुलासा होणे आवश्यक आहे.

10) महाराष्ट्र शासन, उद्योग, उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांक भाखस-2014/प्र.क्र.82/भाग III/उद्योग 4, दिनांक 30/10/2015 नुसार 15 फेब्रुवारी पूर्वी खरेदी करणे आवश्यक असताना नंतर खरेदी केल्याने नियमबाह्यता झाली आहे.

**3.93 बायोमॅट्रिक प्रणाली उभारणीसाठी केलेल्या खर्चाबाबत.**

**जिल्हा परिषद सांगली, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 24) -** सदरबाबत रक्कम रूपये 27,09,582/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद सांगली चे पत्र पत्र क्रमांक प्राथ/साशिअ/सं प्रो/104/12, दिनांक 19/07/2012 दंड आकारणी का करू नये याबाबत विचारणा केली असता ACE ब्रेन ने दिनांक 19/07/2012 ने खुलासा दिला. DEVICE प्रोग्रामिंग मध्ये अडथळे येत आहेत तसेच पुरवठा आदेशातील अट क्र.5 अशी कुठलीही अट शासनाला दिलेल्या प्रस्तावात नाही. त्यामुळे सदर अट रद्द करून शुद्धीपत्र काढावे. त्यानुसार दंड माफ केला आहे. परंतु शासनाकडील करारनामा पहाता त्यामध्ये मुदतवाढ देताना अट क्र.7 व 8 मध्ये दंडाची अट समाविष्ट आहे. तरी दंड रक्कम रुपये 4,60,570/- वसूल करून पुर्तता दाखवावी.

2) ACE ब्रेन कडील पत्र नुसार 189 शाळापैंकी 120 शाळेत वीज कनेक्शन नसल्याचे दिसते. तरी वीज कनेक्शन नसताना त्या शाळाना मशीन पुरवणेबाबत पुरवठा आदेश काय आधारे दिला याचा खुलासा होणे आवश्यक आहे.

3) शासनाचे पत्र दिनांक 16/05/2015 नुसार योजनेचा उद्देश सफल न झाल्यामुळे योजना शासनाने बंद केली. तसेच अट व शर्तीचा भंग केल्यामुळे इ. करिता वसुली रक्कम बँक गॅरेंटी मधून करणेबाबत आदेश दिले होते त्यानुसार कार्यवाही केलेली नाही.

4) प्राप्त मशीन इतर कार्यालयांना पुरविणेचे आदेश दिले. परंतु बायोमॅट्रिक मशीन कार्यालयांना पुरविणेबाबत प्रशासकीय व तांत्रिक मंजुरी दिलेली नाही.

5) घेतलेल्या फिंगर ठसेचा रक्कम रुपये 2,96,552/- व 189 शाळांचा प्रशिक्षणाचा खर्च रक्कम रुपये 1429.57 प्रती शाळा प्रमाणे रुपये 2,70,189/- वाया गेला आहे.

6) आरोग्य विभागाने मशीनची आवश्यकता नाही. असे कळविले असताना 64 मशीन पुरवल्या आहेत.

7) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, क्रमांक तेविआ-1012/प्र.कर./वित्त 4, दिनांक 05/03/2012 अन्वये मंजुर रक्कम रुपये 11,13,72,400/- इतका निधी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद ठाणे अधिनस्त ठेवला आहे. तथापि, सदर निधी ठाणे जिल्हा परिषदेकडे ठेवल्यामुळे जिल्हा परिषद सांगली चे तेवढ्या दिवसाच्या व्याजाचे नुकसान झाले आहे. तरी सदर व्याजाची रक्कम ठाणे जिल्हा परिषदेकडून प्राप्त करून घेवून पूर्तता दाखवावी.

8) सेवाशुल्क वसूल केलेले नाही.

9) vat वसूल केलेला नाही. तरी 2 टक्के प्रमाणे vat वसूल करून पूर्तता दाखवावी.

10) ग्रामविकास विभाग, उपसचिव पत्र क्रमांक 2012/प्र.क्र.4/संगणक कक्ष, दिनांक 23/08/2011 व 19/09/2011 नुसार सदर प्रणाली वर्क ऑर्डर पासून 15 दिवसात कार्यान्वित करणे आवश्यक आहे, असे आदेश दिले असताना शिक्षण विभागाने 30 दिवसात प्रणाली कार्यान्वित करणेचे आदेश दिले आहेत हि बाब नियमबाह्य आहे.

**3.94 कृतियुक्त अध्ययन पद्धती (ABL) उपक्रमातील अनियमिततेबाबत.**

**जिल्हा परिषद कोल्हापूर, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 5) -** शिक्षण विभाग, जिल्हा परिषद कोल्हापूर यांचेकडील सन 2015-16 चे लेखापरीक्षणात कृतियुक्त अध्ययन पद्धती (ABL) उपक्रमाची नस्ती तपासणी केली असता याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सदर योजना उपरोक्त कृती आराखड्यानुसार राबविलेली नाही. केवळ रक्कम रूपये 1,32,012/- चे 4 ABL संच खरेदी करण्यात आले आहे. आराखडा व तरतुदीनुसार खरेदी व पुरवठा झालेला नाही. तांत्रिक मान्यता आदेशातील अट क्रमांक 4 नुसार सदर योजनेवर झालेल्या प्रत्यक्ष खर्चाचा अहवाल विहित कालावधीत शासनास व शिक्षण संचालनालयास सादर करणेचे आहे. परंतु असा अहवालही सादर केलेला नाही.

2) शिक्षण समिती खास सभा दिनांक 08/03/2016 रोजीच्या सभेमध्ये सन 2014-15 मध्ये जिल्हा परिषद च्या 170 शाळांना ABL संच पुरवठा केला आहे अशाच शाळांना इतर अनुषांगिक साहित्य खरेदी करून पुरवठा करणेचे ठरले आहे. तसेच रूपये 23,50,000/- वजा जाता शिल्लक राहणारी रूपये 46,50,000/- इतकी रक्कम ‘डिजिटल क्लासरूम’ योजनेकडे वर्ग करणेचे ठरले आहे. म्हणजेच ABL सन 2015-16 मध्ये नवीन संच खरेदी न करणेचे ठरले आहे. परंतु त्यानंतर दिनांक 18/03/2016 रोजी कल्याणी कॉर्पोरेशन ,पुणे यांना रक्कम रूपये 1,32,012/- चे 4 ABL संच दिनांक 31/03/2016 अखेर पुरवठा करणेचा पुरवठा आदेशही देण्यात आला आहे. म्हणजेच नविन संच खरेदी न करणेचे ठरवूनही पुरवठादारास पुरवठा आदेश दिला आहे. यावरून सदर साहित्य खरेदीबाबत विसंगती असल्याचे स्पष्ट होते.

3) ABL संच खरेदीची 32 लाखांची निविदा प्रसिद्ध करून खरेदी अंतिम टप्प्यात आल्यानंतर शिक्षण समितीने अचानकपणे या योजनेची तरतूद दुसऱ्या योजनेकडे वर्ग केली आहे. त्यामुळे दिनांक 22/06/2015 पासून

सुरु झालेली योजनेची प्रक्रिया राबविणेसाठी झालेला खर्च, जाहिरात खर्च, कार्यालयीन मनुष्यबळ इ.वर झालेला खर्च वाया गेला आहे.

4) प्रथम निविदेस पुरेसा प्रतिसाद न मिळालेने निविदेस मुदतवाढ दिली आहे. कमी निविदाधारक मिळालेने पुन्हा निविदा प्रक्रिया सुरु करणेपुर्वी खरेदी अधिकाऱ्याने निविदेमधील विविध अटी आणि कामाच्या व्याप्तीचा फेरविचार करणेचा आहे. परंतु प्रथम निविदेतील एकूण 65 अटी व शर्तीबाबत कोणताही बदल अथवा फेरविचार न करता द्वितीय निविदा प्रक्रिया राबविली आहे.

5) दिनांक 18/03/2016 रोजी कल्याणी कॉर्पोरेशन, पुणे यांना रक्कम रूपये 23,32,264/- चे ABL अनुषंगिक साहित्य छपाई करून दिनांक 31/03/2016 अखेर पुरवठा करणेचा पुरवठा आदेश देण्यात आला आहे. परंतु, पुरवठा आदेशाप्रमाणे कल्याणी कोर्पोरेशन यांनी पुरवठा केलेला नाही. सदर पुरवठा न करणेचे कारण स्पष्ट होत नाही. तसेच विहित वेळेत पुरवठा न केलेबाबत पुरवठादारावर बंधपत्राच्या आधारे कार्यवाही करणे आवश्यक आहे. परंतु अशी कार्यवाही केल्याचे दिसून येत नाही.

6) सन 2014-15 मध्ये ज्या 170 शाळांना ABL संच पुरवठा केला आहे, अशा शाळांना "ABL अंतर्गत इतर अनुषंगिक साहित्य" मिळणे आवश्यक होते. सदर साहित्याशिवाय केवळ ABL संच उपयोगी ठरू शकत नाही. तरी सन 2014-15 मधील ABL संच खरेदी खर्च रक्कम रूपये 65,52,047/- व्यर्थ झाला आहे.

7) सन 2015-16 मध्ये खरेदी करण्यात आलेले 4 ABL संच विहित वेळेत पुरवठा केलेबाबत पुरवठादाराचे पुरवठा चलन उपलब्ध नाही. त्यामुळे सदर संच पुरवठा झाल्याची खात्री करता येत नाही.

**3.95 ई-लर्निंग, ई-मॉनिटरिंग योजनेतील अनियमिततेबाबत.**

**जिल्हा परिषद कोल्हापूर, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 6) -** सदरबाबत रक्कम रूपये 69,65,224/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग यांचेकडील 1015/प्र.क्रमांक47/संगणक दिनांक 21/11/2015 च्या पत्रानुसार व महाराष्ट्र शासन, प्राथमिक शिक्षण संचालनालय, पुणे यांचेकडील क्रमांक प्रशिसं/ई-लर्निंग/2015-16/204/6977, दिनांक 09/12/2015 चे पत्रानुसार ई-लर्निंग साहित्य खरेदी करण्यास खालील अटी व शर्तीचा अधीन राहून परवानगी देण्यात आली आहे. त्या अटी खालीलप्रमाणे आहेत.

(अ) ई-लर्निंग साहित्य खरेदी करताना सर्व प्रचलित शासन निर्णयाप्रमाणे तसेच उद्योग, उर्जा व कामगार विभागाच्या दिनांक 30/10/2015 च्या शासन निर्णयातील कार्यपद्धतीनुसार प्रक्रिया करावी.

(आ) ई-निविदा पद्धतीचा अवलंब करावा.

(इ) सर्व प्रक्रिया नियमाप्रमाणे झाली आहे याबाबतची काटेकोरपणे तपासणी करावी व तसा अहवाल शासनास व संचालनालयास सादर करावा.

उपरोक्त अटींच्या अधिन राहून ई-लर्निंग साहित्याच्या खरेदीस परवानगी देण्यात आली आहे. परंतु, विभागाने सदर अटींचे पालन केलेले नाही. कारण अट (आ) मध्ये ई-निविदा पद्धतीचा अवलंब करणेचे नमूद असताना सदर खरेदी दरकरारावर करण्यात आली आहे. अट (इ) नुसार योजनेचा तपासणी अहवाल शासनास व संचालनालयास सादर केलेला नाही. याचा अर्थ योजनेच्या प्रक्रियेची काटेकोर तपासणी झालेली नाही.

2) जिल्हा परिषदेच्या एकूण 2005 शाळा आहेत. त्यापैकी 141 शाळांची निवड कोणत्या निकषाच्या आधारे केली हे स्पष्ट होत नाही. प्रोजेक्टर बसविणेसाठी विद्युत सुविधा तसेच संगणक उपलब्ध असणेची आवश्यकता होती. परंतु सदर बाबींची खात्री करून शाळांची निवड केल्याचे दिसत नाही. त्यामुळे प्रोजेक्टर पुरवठा होऊनही त्याच्या अपेक्षित विनियोगाबाबत खात्री करता येत नाही.

3) शैक्षणिक वर्षाची सुरवात जून महिन्यात होते. यावेळेस ई-लर्निंग साहित्य शाळांना उपलब्ध होणे आवश्यक होते, जेणेकरून पूर्ण शैक्षणिक वर्ष त्याचा वापर शाळांना करता येईल. परंतु जिल्हा परिषद सर्वसाधारण सभा ठराव क्रमांक 1000, दिनांक 19/01/2016 नुसार खरेदीची सर्व प्रक्रिया पूर्ण होऊनही दिनांक 26/02/2016

रोजी म्हणजेच 5 आठवडे उशिराने पुरवठादारास पुरवठा आदेश देण्यात आला आहे. तथापि नियोजना अभावि सदर योजनेचा प्रत्यक्ष लाभ शाळांना उशिराने मिळाला आहे.

4) तसेच सदर योजनेंतर्गत प्रोजेक्टर सोबत शाळांना अभ्यासक्रमावर आधारित सी.डी. पुरविणेचे आहेत. परंतु विभागाने केवळ प्रोजेक्टर पुरविले आहेत, अभ्यासक्रमाच्या सी.डी.पुरविलेल्या नाहीत. तथापि, सी.डी.शिवाय प्रोजेक्टर शाळांना उपयोगी ठरणार नाहीत. म्हणजेच योजनेच्या अर्धवट खरेदीमध्ये निधी नाहक गुंतून पडला आहे.

5) तांत्रिक मान्यता आदेशातील अट क्रमांक 5 नुसार पुरविण्यात येणाऱ्या ई-क्लास सिस्टीमच्या (दृकश्राव्य प्रणाली) दर्जाची तपासणी शासन नियमानुसार करणेचे आहे. मात्र अशी तपासणी करण्यात आलेली नाही.

**3.96 अशैक्षणिक, नियमबाह्य अशी ग्रामीण भागातील तरुण मंडळांना स्पिकर संच पुरविणे योजनाराबविलेबाबत व त्यातील अनियमिततेबाबत.**

**जिल्हा परिषद कोल्हापूर, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 14) -** सदरबाबत रक्कम रूपये 36,02,522/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र जिल्हा परिषद पंचायत समिती अधिनियम,1961 मधील कलम 100(1)अ, पोटकलम (2) अन्वये वेळोवेळी सुधारण्यात येणाऱ्या पहिल्या अनुसूचीमध्ये नमूद केलेल्या विषयांपैकी सर्व किंवा कोणत्याही विषयांच्या संबंधात जिल्हा परिषदेच्या स्वाधीन करण्यात आलेल्या जिल्हा निधीतून ग्रामीण भागातील तरुण मंडळांना स्पिकरसेट पुरविणे' ही योजना पहिल्या अनुसूचीमध्ये 'शिक्षण' संबंधी विषय क्रमांक 24 ते 29 पैकी कोणत्याही विषयाशी संबंधीत नाही. तरी सदर योजनेसाठी केलेली तरतूद ही नियमबाह्य असून झालेला खर्च रक्कम रूपये 36,02,522/- वसूल करण्यात यावा.

2) योजनेच्या तांत्रिक मान्यता आदेशामध्ये महाराष्ट्र जिल्हा परिषद पंचायत समिती अधिनियम,1961 मधील कलम 99(अ) नुसार तांत्रिक मान्यता दिल्याचे म्हटले आहे. सदर कलम अ नुसार 'आपल्या विभागाशी संबंधीत असलेल्या कामांच्या व विकास परियोजनांच्या बाबतीत, जिल्हा परिषदेच्या प्रत्येक विभाग प्रमुखास तांत्रिक मंजुरी देता येईल', असे नमूद आहे. मात्र उपरोक्त योजना ही शिक्षण विभागाशी संबंधीत असलेल्या कामांच्या व विकास परियोजनांच्या संबंधीत नाही, असे असताना सदर योजनेच्या खरेदीस दिलेली तांत्रिक मान्यता नियमबाह्य आहे.

3) पहिल्या खरेदीचे रक्कम रूपये 14,81,772/- चे 76 नग खरेदीचे मूळ प्रमाणक तपासणीस उपलब्ध झाले नाही. तथापि, देयकातून विहित कपाती केलेबाबत खात्री करता येत नाही.

4) दुसऱ्या खरेदीच्या वेळी राबविलेली निविदा प्रक्रिया पाहता 3 निविदा पात्र ठरविण्यात आल्या आहेत. यापैकी कमी दराची भालचंद्र स्टोअर्स यांची निविदा मंजूर करण्यात आली आहे. भालचंद्र स्टोअर्स यांचे लिफाफा क्रमांक 1 म्हणजेच तांत्रिक लिफाफा मधील कागदपत्रे पाहता भालचंद्र स्टोअर्स ह्यांच्या कागदपत्रांमध्ये खालीलप्रमाणे त्रुटी दिसून येतात.

अ) संस्था नोंदणीकृत असलेबाबतचा दाखला पाहता भालचंद्र स्टोअर्स यांचे धंद्याचे स्वरूप 'बुकसेलर्स, स्टेशनरी, पेपरमर्चंट व शालोपयोगी साहित्य विक्री' असे आहे. परंतु उपरोक्त योजना ही इलेकट्रॉनिक वस्तूंशी संबंधीत असलेने भालचंद्र स्टोअर्स यांनी या योजनेची निविदा भरणेस पात्र ठरत नाहीत. तरीही त्यांची निविदा पात्र ठरविण्यात आली आहे.

आ) भालचंद्र स्टोअर्स यांनी केलेल्या करारनाम्यातील अट क्रमांक 5 नुसार मंडळांना साहित्य देण्यापूर्वी साहित्याचे गुणवत्ता तपासणीचा शासकीय संस्थेचा दाखला सादर करू असे मान्य केले आहे. परंतु, प्रत्यक्षात गुणवत्ता तपासणी अहवाल हा दिनांक 07/06/2016 चा आहे. सदर खरेदीचे बिल दिनांक 31/03/2016 रोजी अदा करण्यात आले आहे. याचा अर्थ तपासणी अहवाल नसतानादेखील रक्कम रूपये 21,20,750/- चे बिल अदा केले आहे. हे नियमबाह्य आहे. तथापि, एकंदरीत संपूर्ण निविदा प्रक्रिया आक्षेपार्ह दिसून येते.

5) पुरवठादार मे.भालचंद्र स्टोअर्स, कराड यांनी दिनांक 15/09/2015 रोजीच्या पुनर्प्रत्ययी पुरवठा आदेशातील अटी शर्तीबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद कोल्हापूर यांचेशी केलेल्या करारनाम्यातील

(मुद्रांक रूपये 500/- क्रमांक E-702158) अट क्रमांक 11 नुसार 'निविदेतील नमुद केलेले साहित्याचे दर आम्हास मान्य आहेत. हे दर 180 दिवस आमचेवर बंधनकारक राहतील' अशी अट बंधनकारक राहील असे मान्य केले आहे. हा दर रूपये 19,497/- प्रति संच इतका आहे.

परंतु, या योजनेमध्ये दुसऱ्यांदा दिनांक 29/01/2016 रोजी म्हणजेच करारनाम्यानंतर 135 दिवसांनी, स्पिकर संच खरेदी करणेसाठी विभागाने प्रसिद्ध केलेल्या ई-निविदे (Tender Id:2016_KOLHA_91186_1) नुसार मे.भालचंद्र स्टोअर्स, कराड यांनी रूपये 24,950/- प्रति संच या दराने निविदा भरली आहे. म्हणजेच मागील पुरवठ्यापेक्षा रूपये 5,453/- इतक्या जादा दराने निविदा भरली आहे. शिवाय सदर निविदा मंजूरही करण्यात आली आहे.

तथापि मे.भालचंद्र स्टोअर्स यांनी दिनांक 15/09/2015 च्या करारनाम्याचा अधिन राहून निविदा भरणे आवश्यक होते. किंवा सदर करारनाम्याच्या आधारे जिल्हा परिषदेने भालचंद्र स्टोअर्स यांचेशी वाटाघाटी करून पूर्वीचा दर रूपये 19,497/- प्रति संच इतका निश्चित करणे आवश्यक होते. मात्र मे.भालचंद्र स्टोअर्स यांचा वाढीव दर मंजूर करून खरेदी केल्याने प्रति संच रूपये 5,453/- प्रमाणे 85 संचांचे रूपये 4,63,505/- इतके आर्थिक नुकसान झाले आहे.

6) दोन्ही खरेदीचे 76 अधिक 85 असे एकूण 161 स्पिकर संचांचे बिल पुरवठादारास अदा करण्यात आले आहे. परंतु पुरवठादाराने मंडळांच्या ठिकाणी स्पिकर सेट पुरवठा केलेबाबतचे एकही पुरवठा चलन दिलेले नाही. त्यामुळे प्रत्यक्षात पुरवठा झाला किंवा कसे याबाबत साशंकता निर्माण होते.

### 3.97 तसलमात रक्कमेचे समायोजन न केलेबाबत.

**जिल्हा परिषद सोलापूर, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 5) -** शिक्षण विभाग, जिल्हा परिषद, सोलापूर यांचेकडील सन 2015-2016 चे लेखापरीक्षण कालावधीत तसलमात नोंदवहीची पडताळणी केली असता संबंधीत विभागप्रमुख / अधिकारी यांचे नावे तसलमात / ॲडव्हान्स रक्कमा अदा प्रलंबित असल्याचे आढळून आलेले आहे.

सन 2015-2016 चे तसलमात नोंदवही चे अवलोकन करता नोंदवहीतील नोंदी अपुर्ण असल्याचे आढळुन आले आहे. सदर नोंदवहीत अग्रिम रक्कम स्वीकारणा-या व्यक्तीचे नाव व पदनाम नमुद नाही. तसेच अग्रिम रक्कम ज्या कारणासाठी अदा करण्यात आली आहे, तो उद्देश सफल होताच सदर रक्कमेचे समायोजन करणे आवश्यक आहे. परंतु, सन 1962-1963 ते 2015-2016 अखेर रक्कम रुपये 9,04,086/- थकित तसलमात आढळुन आली आहे. महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए/2009/प्र.क्र.522/वित्त 2009, दिनांक 10/12/2010 नुसार योग्य ती कार्यवाही करुन ज्या वर्षातील तसलमात असेल ती त्याच वर्षात वसुल करणे / समायोजन करणे अथवा संबंधीतांचे वेतनातून वसुली / समायोजन करणे आवश्यक असता तशी कार्यवाही केलेली नाही. सदरची बाब ही अतिशय गंभीर तसेच वित्तीय औचित्याचा भंग करणारी असलेने सदरचे गंभीर स्वरुपाचे अनियमिततेबाबत योग्य तो खुलासा करुन वरील नमूद केलेप्रमाणे ब-याच कालावधीपासून संबंधीतांकडे थकीत असलेल्या तसलमात रकमांचे व्याजासह वसुली / समायोजन करुन एकूण रक्कम त्या त्या कालावधीपासून व्याजाची परिगणना करुन व्याजासह शासनास भरणा करावी. सन 2015-2016 मध्ये सण अग्रिम रक्कमा अदा केल्या आहेत. तथापि, सदर अग्रिमाच्या नोंदी तसलमात नोंदवही घेण्यात आलेल्या नाहीत.

### 3.98 ग्रामीण भागामध्ये खेळांना प्रोत्साहनासाठी प्रशिक्षण क्रीडा स्पर्धा आयोजित करणे खर्चाबाबत.

**जिल्हा परिषद सोलापूर, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 18) -** सदरबाबत 4 प्रमाणकान्वये रक्कम रुपये 4,74,778/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) वरील नमूद खर्चातून समारोप साहित्य खरेदी करणे खर्चाबाबत, तसेच चहा, नाष्टा, दुपार एक वेळ जेवण या खर्चाबाबत, व मंडप डेकोरेशन व ट्रॉफी तयार करणे, निमंत्रण पत्रिका, प्रमाणपत्र तयार करणे, इत्यादी खरेदी व पुरवठासाठी महाराष्ट्र शासन, उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांक भाखंस-1088/(2512)/ उद्योग-6, दिनांक 02/01/1992 नुसार पुरवठादाराकडून निविदा मागविणे आवश्यक होते. परंतु, वरील नमूद खरेदी व

पुरवठासाठी निविदा मागविल्या नाहीत. त्यामुळे वरीलप्रमाणे खरेदी व पुरवठा निविदा / दरपत्रके न मागविता नियमबाह्य खर्च करण्यात आलेला आहे.

2) वरील नमूद खर्च रूपये 1,35,080/- मधून रूपये 57,960/- ट्रॉफीनग 85, सन राईज सोलापूर यांचेकडून खरेदी केले आहे. सदर खरेदी साहित्याच्या नोंदी साठा नोंदावहीत घेतलेल्या नाहीत. शिक्षण विभाग, जिल्हा परिषद, सोलापूर यांनी साठा नोंदवही दप्तरी ठेवलेली नाही. महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 मधील नियम क्रमांक 96 नुसार खरेदी केलेल्या साहित्याची साठा नोंदवही ठेऊन त्यामध्ये साहित्याचा खरेदी व वापर याचा अद्ययावत हिशोब ठेवणे आवश्यक आहे.

3) अर्थ विभागाकडील कार्यालयीन टिप्पणी दिनांक 28/03/2016 पाहता दिनांक 31/03/2016 अखेर रूपये 7,22,886.23/- इतके अग्रीम शिक्षण विभागाकडे समायोजनासाठी प्रलंबित आहे. एवढ्या मोठ्या रक्कमेचे समायोजन दिनांक 31/03/2016 अखेर शिक्षण विभागाने केलेले नाही. तरीसुद्धा नवीन अग्रिम कोणत्या आधारे मंजूर केले? महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक झेडपीए-2009/प्र.क्र.522/वित्त-9, दिनांक 10/12/2010 मधील बाब क्रमांक 8 नुसार मागील / पूर्वीचे अग्रिम समायोजन प्रलंबित असताना दुसरे / वाढीव / नवीन अग्रिम देता येत नाही.

4) जादा दराने बिल प्रदान केले बाबत - शिक्षण विभागाकडून सन 2015-2016 मध्ये स्काउट गाईड / कब बुलबुल योजनेतून जिल्हा मेळावा दिनांक 08/02/2016 ते दिनांक10/02/2016 या कलावधीत घेण्यात आला आहे. सदर जिल्हा मेळाव्यासाठी येणाऱ्या विध्यार्थी व शिक्षकांना चहा, नाश्ता व जेवण यासाठी प्रतिव्यक्ती रूपये 64/- दराने श्री कॅटरर्स यांना प्रदान केले आहे. परंतु, वरील खर्च क्रीडा स्पर्धासाठी येणाऱ्या विद्यार्थी व शिक्षक यांना चहा नाश्ता व एक वेळचे जेवण यासाठीचे रूपये 75/- प्रतिव्यक्ती दराने 1,463 व्यक्तीचे बिल रूपये 1,09,725/- श्री. कॅटरर्स यांनाच प्रदान केले आहे. यावरून एकाच पुरवठादाराला त्याच स्वरूपाच्या पुरवठ्याला रूपये 11/- जादा दराने बिल अदा केले आहे. जादा दराने दिलेले रूपये 16,093/- सबंधीताकडून वसूल करून जिल्हा परिषद सेस निधीत जमा करावे.

5) क्रीडा स्पर्धा अंतर्गत आयोजित एक दिवस प्रशिक्षण कार्यक्रमासाठी (दिनांक 23/01/2016) चहा, नाश्ता, एक वेळ जेवणासाठी रूपये 100/- प्रतिव्यक्ती दराने बिल प्रदान केले आहे. सदर बिलामधून ही श्री.कॅटरर्स यांना रूपये 36/- जादा दराने अदा केले आहे. रूपये 2,520/- संबंधीतांकडून वसूल करून जिल्हा परिषद सेस निधीत जमा करावे.

### 3.99 जिल्हा परिषद प्राथमिक शाळा इयत्ता 1 ली ते 4 थी विध्यार्थ्यांना बसण्यासाठी बेंच खरेदी करणे खर्चाबाबत.

**जिल्हा परिषद सोलापूर, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 19) -** सदरबाबत 4 प्रमाणकान्वये रक्कम रुपये 2,05,28,095/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सदर बेंच खरेदी योजनेच्या ई-निविदेसाठी GSN असोशिएट, मुंबई यांनी RTGS द्वारे मुख्य लेखा व वित्त अधिकारी याचे खातेवर भरणा केलेली बयाना रक्कम रूपये 5 लाख ही GSN असोशिएट, मुंबई यांनी निविदेतून माघार घेतल्याने त्यांना प्रदान केली आहे. परंतु, दिनांक 30/10/2015 रोजीच्या महाराष्ट्र शासन, उद्योग, उर्जा व कामगार विभाग यांचेकडील खरेदीबाबतचा शासन निर्णय मधील परिशिष्ट क्रमांक 8 मधील मुद्दा क्रमांक 5 मध्ये नमूद प्रमाणे निविदेत सहभागी निविदाकाराने निविदा प्रक्रियेमध्ये कोणत्याही टप्प्यावर माघार घेतल्यास त्याची बयाना रक्कम जप्त करण्यात येईल, असे असताना वरील नमूद रूपये 5 लाख निविदाकारास कोणत्या आधारे प्रदान केली? याचा खुलासा करावा.

2) सदर बेंच खरेदीबाबतचे विविध शाळांकडील मागणी प्रस्तावच नाहीत. तसेच सदर बेंचबाबत कोणत्याही गटशिक्षण अधिकारी किंवा कोणत्याही शाळेची मागणी आढळून आलेली नाही. त्यामुळे मागणी व आवश्यकतानुसार खरेदी झाल्याची लेखापरीक्षणाची खात्री होत नाही.

3) योग्य स्पेशिफिकेशननुसार बेन्चच्या साईजचा रेखांकित नकाशा निविदेमध्ये नाही. तसेच रेखांकित नकाशा मागणी बिलासोबत जोडलेला नाही. त्यामुळे योग्य स्पेशिफिकेशन शिवाय आणि रेखांकित व प्रमाणित नकाशाशिवाय निविदा अगर दर कोणत्या आधारे मंजूर केले व कोणत्या आधारे पुरवठा आदेश देण्यात आले? याचा खुलासा करावा.

4) वरील प्रमाणकानुसार खरेदी केलेले 4,002 नग बेंच प्राप्त झाल्याची मूळ पोहोच पावती शिक्षण विभागाकडे नाही. त्यामुळे विविध शाळांचे मुख्याध्यापक, जिल्हा परिषद, प्राथमिक शाळा, यांचेकडे कोणत्या प्रकारचे (PSA टाइप A व B बेंच) बेंच प्राप्त झाले ? कोणत्या साईजचे डेस्क प्राप्त झाले ? कधी डेस्क प्राप्त झाले? याची खात्री लेखापरीक्षणास करता आलेली नाही. आता योग्य ती खात्री पटवावी. तसेच शाळेच्या मुख्याध्यापाकाकडील जंगम मालमत्ता रजिस्टर मध्ये PSA टाइप A व B बेंचची नोंद घेतल्याबाबत डेडस्टॉक रजिस्टर लेखापरीक्षणास पाहणेस मिळालेले नाही.

5) निविदामधील अटी व शर्ती क्रमांक 13 नुसार लेटर ऑफ ॲक्सेप्टन्स दिल्यानंतर आठ दिवसाच्या आत रूपये 2,05,28,095/- इतक्या रक्कमेवर 3 टक्के इतकी रक्कम रूपये 6,15,842/- बँक गॅरंटी घेणे आवश्यक होते. परंतु, अशी बँक गॅरंटी घेण्यात आलेली नाही.

6) तांत्रिक लिफाफा यासाठीच्या सूचनेनुसार क्रमांक 12 नुसार सदर पुरवठादाराने एका मागणीदारास एकावेळी किमान एक कोटीचा पुरवठा केल्याबाबत अनुभव असल्याबाबतचा पुरावा सदर करणे आवश्यक होते. तथापि, तसा कोणताही पुरावा लेखापरीक्षणास उपलब्ध झाला नाही.

7) अट क्रमांक 20 नुसार सर्व कागदपत्रावर सील व स्वाक्षरी करून नोटरीमार्फत सर्व कागदपत्रे सांक्षांकित करून ऑनलाईन अपलोड करणे आवश्यक असताना सर्व कागदपत्रे नोटरी मार्फत सांक्षांकित केलेली नाहीत.

8) निविदा प्रक्रियेमधील अटी नुसार रूपये 20,000/- इतक्या रक्कमेच्या स्टॅम्प पेपरवर करारपत्र लिहून देणे आवश्यक होते. परंतु, असे करारपत्र करून देण्यात आलेले नाही. त्यामुळे शासनाच्या मुद्रांक शुल्क रक्कमेचे नुकसान झाले आहे व सदर निविदा प्रक्रियेतील अटींचा भंग झालेला आहे.

### 3.100 नाविन्यपूर्ण योजनेतून जिल्हा परिषद प्राथमिक शाळांना ड्युअल डेस्क पुरविणे खर्चाबाबत.

**जिल्हा परिषद सोलापूर, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 20) -** सदरबाबत 2 प्रमाणकान्वये रक्कम रुपये 6,45,84,960/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) निविदा मधील अटी व शर्ती क्रमांक 5 नुसार निविदा किमतीच्या 1 टक्के बयाना रक्कम रूपये 6,45,850/- ई-टेंडरिंग पोर्टलद्वारे ऑनलाईन ट्रान्सफरव्दारे भरणा करणे आवश्यक होते. परंतु, सदर रक्कम जमा केल्याबाबत कोणताही कागदोपत्री पुरावा तपासणीसाठी उपलब्ध झाला नाही.

2) निविदामधील अटी व शर्ती क्रमांक 13 नुसार लेटर ऑफ ॲक्सेप्टन्स दिल्यानंतर आठ दिवसाच्या आत रूपये 6,45,84,960/- इतक्या रक्कमेवर 3 टक्के इतकी रक्कम रूपये 19,37,548/- बँक गॅरंटी घेणे आवश्यक होते. परंतु, अशी बँक गॅरंटी घेण्यात आलेली नाही.

3) तांत्रिक लिफाफा यासाठीच्या सूचनेनुसार क्रमांक 12 नुसार सदर पुरवठादाराने एका मागणीदारास एकावेळी किमान एक कोटीचा पुरवठा केल्याबाबत अनुभव असल्याबाबतचा पुरावा सदर करणे आवश्यक होते. तथापि, तसा कोणताही पुरावा लेखापरीक्षणास उपलब्ध झाला नाही.

4) अट क्रमांक 20 नुसार सर्व कागदपत्रावर सील व स्वाक्षरी करून नोटरीमार्फत सर्व कागदपत्रे सांक्षांकित करून ऑनलाईन अपलोड करणे आवश्यक असताना सर्व कागदपत्रे नोटरीमार्फत सांक्षांकित केलेली नाहीत.

5) सदर डेस्कबाबत कोणत्याही गटशिक्षण अधिकारी किंवा कोणत्याही शाळेची मागणी आढळून आलेली नाही. त्यामुळे मागणी नुसार खरेदी झालेली नाही. तसेच मागणी नुसार पुरवठा झालेला नाही.

6) पुरवठा आदेश मधील अट क्रमांक 4 नुसार रूपये 64,100/- इतक्या रक्कमेच्या स्टॅम्प पेपरवर करारपत्र लिहून देणे आवश्यक होते परंतु, असे करारपत्र करून देण्यात आलेले नाही.

7) एकूण 15,115 नग डेस्कमधून केवळ 2 डेस्कची तपासणी करून अहवाल देण्यात आलेला आहे. तसेच तपासणी अहवालामध्ये कोणतेही टेक्नीकल स्पेशिफिकेशन अथवा अन्य बाबी नमूद नाहीत. त्यामुळे सर्व डेस्कच्या गुणवत्तेची खात्री करता आलेली नाही.

**3.101 सन 2015-16 करीता खेळ साहित्य खरेदीतील अनियमिततेबाबत.**

**जिल्हा परिषद अमरावती, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 1) -** सन 2015-16 या वित्तीय वर्षात खेळ साहीत्य खरेदीसाठी जिल्हा परिषद स्वनिधीतुन 13,00,000/- रुपये अनुदान वितरीत केले आहे. एकूण 41 शाळेला साहीत्य खरेदीसाठी रक्कम अदा केली. मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद अमरावती यांचे पत्र क्र.9451, दिनांक 14/10/2015 अन्वये सदर खर्च निवड केलेल्या शाळेकरीता अनुज्ञेय राहील व सदर निधीतुन खेळाचे साहीत्य उदाहरणार्थ (घसरपट्टी, झुला,कोअरसिटर मेरीगोल्ड राऊंड, होपींग, सी.सी., डब्बलबार, जंपीग डक, गार्डन बेंच, एनक्लाईंबर ई.) खरेदी बंधनकारक आहे. परंतु लेखापरिक्षण तपासणीत 41 शाळेपैकी 14 शाळेचे स्टॉक बुक व देयक तपासले असता त्यात मागणी केलेल्या साहीत्याव्यतिरिक्त इतरच साहीत्य पुरवठादाराने शाळेला पुरवले आहे. त्यामुळे जिल्हा परिषद आदेशाचे उल्लंघन झाल्याचे दिसते. तसेच संबंधीत शाळांनी पत्रात नमुद साहीत्य प्राप्त करुनच पुरवठादाराला रक्कम प्रदान करावे असे आदेशात नमुद असतांना वेगळे साहीत्य प्राप्त करुन रक्कम अदा केली. 14 शाळेची तपासणी झाली असुन 27 शाळेने अभिलेखे उपलब्ध केले नाही. सदर बाब गंभीर असुन झालेला खर्च रक्कम रूपये 13,00,000/- याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद अमरावती यांचे पत्र क्र.9451, दिनांक 14/10/2015 अन्वये सदर खर्च निवड केलेल्या शाळेकरीता अनुज्ञेय राहील व सदर निधीतुन खेळाचे साहीत्य उदाहरणार्थ (घसरपट्टी, झुला, कोअरसिटर मेरीगोल्ड राऊंड, होपींग ,सी.सी., डब्बलबार, जंपीग डक, गार्डन बेंच, एनक्लाईंबर ई.) खरेदी बंधनकारक आहे. असे नमुद असतांना रक्कम रूपये 2,59,000/- चे शाळांनी वेगळेच साहीत्य खरेदी केले आहे.

2) बेरोजगार शशिकांत बहुउद्देशिय मागासवर्गीय नागरी सेवा संस्था यांना जिल्हा परिषदने काम दिल्याचे व पुरवठा करण्याबाबतचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे आदेशाव्यतीरिक्त इतर कोणतेही अभिलेखे नस्तीत आढळले नाही.

3) बेरोजगार शशिकांत बहुउद्देशिय मागासवर्गीय नागरी सेवा संस्था यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे पत्रात नमुद साहीत्य जिल्हा परिषद शाळेला न देता दुसरे साहीत्य देवून जिल्हा परिषद शाळेची आर्थिक फ़सवणूक केली आहे. व शाळांना मागणी प्रमाणे साहीत्य न देता कोणत्या आधारावर दुसरे साहीत्य प्रदान केले,याबाबत खुलासा करावा.

4) संबंधीत शाळेने आदेशानुसार योग्य साहित्य प्राप्त झाल्यावरच रक्कम अदा करावी असे आदेशात नमुद असुन त्याप्रमाणे कार्यवाही केली नाही.

5) बेरोजगार शशिकांत बहुउद्देशिय मागासवर्गीय नागरी सेवा संस्था यांनी वेगवेगळ्या शाळेला वाटप केलेल्या साहीत्याच्या दरात फरक केला आहे. त्यामुळे शासनाचे रुपये 29,500/- चे नुकसान झाले आहे.

6) शिक्षण विभागाने खरेदी केलेल्या साहीत्याचे फोटो व नमुद साहीत्य खरेदी केल्याची खात्री केली नाही. तसेच मुख्याध्यापकांनी देखील फोटो व साहीत्याचा तपशिल सादर केला नाही.

7) 14 शाळेची तपासणी झाली असुन उर्वरित 27 शाळेचे अहवाल उपलब्ध करण्यात यावे. व त्यांचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांचेमार्फत अंतर्गत लेखापरिक्षण करुन अहवाल सादर करावा. रुपये 2,59,000/- चौकशी करुन वसुली करावी व पुरवठादारावर योग्य ती कारवाई करावी.

**3.102 राष्ट्रीय मध्यान्ह भोजन कार्यक्रम अंतर्गत शालेय पोषण आहार योजनेसाठी खाद्य वस्तुंचा पुरवठा करणे खर्चातील अनियमितता.**

**जिल्हा परिषद अमरावती, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 2) -** सदरबाबत रक्कम रुपये 11,22,30,689/- रूपये खर्च केले आहेत. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) शासन निर्णय क्रमांक शापोआ 2009/प्र.क्र.136/प्रशि-4, दिनांक 18/06/2009 चे परिशीष्ठ अ मध्ये शालेय पोषण आहार योजने अंतर्गत दयावयाचा पाककृतीचा तपशिल दिला आहे. सोयाबीन तेलासह इतर वस्तु ग्रॅम मध्ये वापरावयाचे आहेत. शिक्षण संचालनालय महाराष्ट्र राज्य, पुणे व पुरवठाधारकाने केलेल्या करारनाम्या मध्ये बाब क्रमांक 2 मध्ये मान्य दर दिले असुन त्यात सोयाबीन तेलाची लिटर मध्ये किंमत दर्शविली आहे. त्यामुळे धान्यादी वस्तुंचे निविदा मागवितांना सोयाबीन तेलाचे दर लिटरमध्ये मागविण्यात आले किंवा किलोग्रॅममध्ये? याबाबत निविदा प्रसिध्दी वृत्तपत्राचे तपशिलासह खात्री करणे आवश्यक आहेत.

2) करारनाम्यातील अट क्रमांक 27 अन्वये करारात नमूद केलेले दर हे सर्व करांसहित असून पूरवठादाराने सादर केलेल्या देयकाची अदायगी ही उद्‌गम कपात (Tax Deduction at Source) करुनच करण्यात येईल असे नमूद केले आहे. विभागाने संबंधीत पूरवठादारास एकुण रुपये 11,22,30,689 /- एवढ्या रक्कमेची देयके प्रदान केली आहेत. वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक आयकर 1007/प्र.क्र.105/कोषा प्र.5, दिनांक 22/02/2008 तसेच आयकर अधिनियम 1961 चे कलम 194 (सी) नुसार 2 टक्के उद्‌गम कपात (Tax Deduction at Source) रुपये 22,44,614/- करावयाची होती. याबाबत विभागाने खात्री करुन योग्य ती कार्यवाही करुन अनुपालन दर्शवावे.

3) करारनाम्यातील अट क्रमांक 24 अन्वये जिल्हास्तरावरील देयके प्रयोगशाळेचा तपासणी अहवाल समाधानकारक असल्यानंतरच पूरवठादाराने सादर केलेल्या देयकाचे प्रदान त्याने सादर केलेल्या देयकाच्या एकुण रकमेच्या 90 टक्के एवढे करण्याबाबत व उर्वरित 10 टक्के रक्कम कोणतीही तक्रार नसल्याची खात्री झाल्यावर मुख्य़ कार्यकारी अधिकारी यांच्या मान्यतेने अदा करण्याबाबत निर्देश असतांना सूध्दा पूरवठादारास देयकाची संपूर्ण 100 टक्के रक्कम़ एकाच देयकान्वये प्रदान करण्यात येऊन पूरवठादाराचे हित साधण्यात आल्याचे दिसून येते.

4) करारनामातील मुद्दा क्रमांक 3 (ड) प्रमाणे पुरवठा आदेश प्राप्त होताच जिल्हा व तालुक्यामध्ये तांदुळ व धान्यादी मालाच्या वाटपाचे सुक्ष्म नियोजन, तसेच वाहन चालकांचे नाव व दुरध्वनी क्रमांक इ शिक्षणाधिकारी (प्राथमिक) व गट शिक्षणाधिकारी तथा अधिक्षक शालेय पोषण आहार यांना दर वाटपाच्या वेळी सादर करतील. परंतु, त्याप्रमाणे कार्यवाही केल्याचे आढळून आले नाही.

5) साहित्य विहीत मुदतीत प्राप्त झालेबाबत शाळानिहाय दिनांक नमुद न करता मोघम स्वरूपात प्राप्तीचे दिनांक नमुद केले आहेत. निवडक महिन्यातील डिलेव्हरी मेमोची तपासणी केले असता काही शाळा केवळ पोच देतात त्यावर प्राप्तीचे दिनांक नमुद करत नाही. त्यामुळे माल मुदतीत प्राप्त झाला नाही हे स्पष्ट होते. असे असतांना दंडाची रक्कम वसुल केली नाही.

6) पुरवठादाराचे मंजुर केलेले ब-याच वस्तुंचे दर किरकोळ बाजार भावापेक्षा अधिक असल्याचे दिसुन येते.

7) महाराष्ट्र शासन, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, शासन निर्णय क्रमांक शापोआ-2009/प्र.क्र.207/ प्रशि-4, दिनांक 01/06/2009 अन्वये शालेय पोषण आहार योजनेची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी भरारी पथके व अतिदक्षता पथके प्रत्येक जिल्हयाच्या स्तरावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या नियंत्रणाखाली स्थापन करून, पथकामार्फत जिल्हयातील शाळामध्ये शालेय पोषण आहार योजनेची अंमलबजावणी व्यवस्थीत होत आहे किंवा कसे, याबाबत तपासणी करणे तसेच प्रत्येक जिल्हयामध्ये दरमहा किमान 10 शाळांची भरारी पथकामार्फत तपासणी करणे आवश्यक आहे. परंतु, त्याप्रमाणे कार्यवाही केल्याचे आढळून आले नाही.

8) करारनाम्यातील अटी व शर्ती क्रमांक 14 अन्वये प्रारंभिक पुरवठा दोन महीन्यासाठी असेल, त्यानंतर तांदळाचे व इतर धान्यादी मालाचे दोन महीन्याचे पुरवठा आदेश देण्यात येतील. शाळेत 20 दिवस पुरेल इतका साठा शिल्लक असतांना नवीन पुरवठा आदेश देण्यात येतील. असे असले तरी शैक्षणीक सत्राअखेर शाळानिहाय शिल्लक साठयाशी ताळमेळ घेवुन तफावत नसल्याबाबत प्रमाणित केले नाही. धान्यादी मालाची मागणी पटसंख्येनुसार केली जावी. परंतु, प्रत्यक्षात लाभ पटसंख्येनुसार न देता उपस्थिती नुसार दिले जाते. त्यामुळे ताळमेळ घेवुन तफावत नसल्याबाबत खात्री करुन अनुपालन दर्शवावे.

9) गट शिक्षणाधिकारी पंचायत समिती दर्यापुर यांनी माहे ऑक्टोबर व नोव्हेंबर 2015 साठी 52 दिवसाची मागणी नोंदविली असुन शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांनी पुरवठा आदेश क्रमांक जिप/शापोआ/9189/ 2015, दिनांक 06/10/2015 अन्वये पुरवठा आदेश दिले आहे.

माहे ऑक्टोंबर व नोव्हेंबर 2015 चे कार्यदिवस अनुक्रमे 23 व 9 = 32 असतांना 52 दिवसांची मागणी नोंदविल्याने एकुण रूपये 6,51,178/- ने जादा धान्य पुरवठा होवुन जादा शोधन झाले आहे. जवाबदारी निश्चित करून रक्कम वसुल करावी. पंचायत समिती दर्यापुर माहे ऑक्टोंबर व नोव्हेंबर 2015 इयत्ता 6 ते 8 चे आवक बिजक उपलब्ध झाले नाही.

10) दिर्घ सुटटीच्या कालावधीत मध्यान्ह भोजन दिलेल्या शाळांची भरारी पथकामार्फत तपासणी केली नाही.

11) करारनाम्यातील अटीनुसार पुरवठा केलेल्या मालापैकी चाचणीसाठी Random Sample घेवून त्याची तपासणी करणे आवश्यक आहे. मात्र अशा प्रकारे Random Sample कोणत्याही शाळेच्या साठा नोंदवहीत नोंद केल्याचे आढळून आले नाही. त्यामुळे अशा प्रकारची चाचणी केली जाते किंवा कसे, याबाबत खात्री पटत नाही. खुलासा करावा.

**3.103 शालेय पोषण आहार योजने अंतर्गत झालेल्या नियमबाहय प्रदानाबाबत.**

**जिल्हा परिषद अकोला, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 2) -** सदरबाबत रक्कम रूपये 1,68,59,277/- खर्च करण्यात आला असून याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) पुरवठा आदेशातील अट क्रमांक 17 नुसार पुरवठा आदेश मिळाल्यापासुन जास्तीत जास्त 5 दिवसात पुरवठा सुरु करावा व जास्तीत जास्त 20 दिवसात संपुर्ण पुरवठा करणे बंधनकारक आहे. परंतु, डिलेव्हरी मेमोची तपासणी केली असता कोणत्याही शाळेत साहित्य विहीत मुदतीत प्राप्त झाले नाही. याबाबत खुलासा करण्यात यावा.

2) पुरवठा केलेला माल शाळा व्यवस्थापन समिती, आहार शिजविणारी यंत्रणा बचत गट यांच्या समोर वजन करुन देतील, पुरवठा केलेल्या साहित्याची पॅकीग तारीख, वापरण्याची अंतीम मुदत, कंपनीचे नाव इत्यादी बाबी नमुद असल्याबाबत मुख्यध्यापक व बचत गट याची पोहोच घेतील. परंतु, पुरवठादाराने सादर केलेल्या डिलेव्हरी मेमोची तपासणी केली असता तशा नोंदी आढळल्या नाहीत.

3) ज्या महिन्याकरीता धान्यादी मालाची आवश्यकता आहे, त्या महिन्याचा पुरवठा आदेश त्या महिन्याच्या अगोदर देणे आवश्यक आहे. परंतु, माहे फेब्रुवारी, मार्च, 2015 व मे जून, जुलै, ऑगस्ट 2015 या महिन्याच्या धान्यादी साहीत्याचा पुरवठा आदेश शिक्षण विभाग (प्राथमिक) यांनी आदेश क्रमांक 2553/15 दिनांक 27/07/2015 व माहे ऑगस्ट ते ऑक्टोबर 2015 या महिन्याच्या धान्यादी साहित्याचा पुरवठा आदेश शिक्षण विभाग (प्राथमिक) यांनी आदेश क्रमांक 3191/15 दिनांक 16/09/2015 रोजी दिला. त्यामुळे शालेय पोषण आहारापासुन विद्यार्थी वंचित राहण्याची शक्यता नाकारता येत नाही. पुरवठा आदेश विलंबाने देण्याबाबत प्रयोजन काय ?

**3.104 मागणी पेक्षा जादा केलेल्या पुरवठयाबाबत.**

**जिल्हा परिषद अकोला, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 6) -** सदरबाबत रक्कम रूपये 1,68,47,213/- खर्च करण्यात आला असून याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

शिक्षण विभागाचे सन 2015-2016 य वर्षाचे लेखापरिक्षणात उपलब्ध करुन दिलेल्या शालेय पोषण आहाराची मागणी व पुरवठयाच्या देयकाची तपासणी केली असता, पुरवठादाराने जादाचा माल पुरवठा करुन जादाचे देयक आहारीत केल्यामुळे निधीची हानी झाली आहे.

पंचायत समिती निहाय मागणी व प्रत्यक्ष पुरवठा याची तपासणी केली असता मागणीपेक्षा जादा पुरवठा करुन देयक पारित केल्याचे दिसुन येते. करारनामा अटी व शर्तीच्या अट क्रमांक 7 नुसार मालाचा पुरवठा प्रत्येक शाळेने मागणी केलेल्या मागणीपत्रकानुसार आवश्यक तेवढया प्रमाणात करील, अशी अट असतांना मागणीपेक्षा जादा पुरवठा केला आहे. यावर खालील अभिप्राय आहेत:-

1) प्राथमिक शिक्षण संचालक, पुणे यांचे परिपत्रक क्रमांक शापोआ/साधायो/प्राशिसं/307/2014-15/3288, दिनांक 11/06/2014 नुसार महाराष्ट्र स्टेट को ऑप कंन्झ्युमर्स फेडरेशन लि., मुंबई यांच्याशी दर करार करण्यात आला आहे. त्यानुसार पुरवठा केलेल्या धान्यादी मालाची 90 टक्के रक्कम प्रयोग शाळेची तपासणी अहवाल

समाधानकारक असल्यानंतरच अदा करावीत व पुरवठा संदर्भांत काही तक्रार असल्यास 10 टक्के रक्कम मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या मान्यतेने अदा करावी. धान्यादी मालाच्या पुरवठा देयकाची 100 टक्के रक्कम एकाच वेळी प्रदान केलेली आहे.

2) शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन निर्णय क्रमांक शापोआ2010/प्र.क्र.18/प्राशि4, दिनांक 02/02/2011 चे परिशिष्ट अ नुसार शालेय पोषण आहार योजने अंतर्गत द्यावयाचा पाक कृतीचा तपशिल नमुद केलेला असुन त्यात गोड भात देण्याचे नमुद केलेले आहे. परंतु, साखर अथवा गुळ पुरवठा करण्याचे आदेश देण्यात आलेले नाही. तसेच कोणत्याच शाळेने मागणी केलेली नाहीत. उपरोक्त शासन निर्णयानुसार आठवडयातील प्रत्येक दिवसासाठी त्या त्या जिल्हयातील आवश्यकतेनुसार योग्य त्या पाककृतीची निवड जिल्हा स्तरावर मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांच्या अध्यक्षते खालील समिती मार्फत करण्यात येईल व प्रत्येक दिवशी कोणती पाककृती दयायची आहे, यांची अगोदर निश्चिती करण्यात यावी आणि त्या जिल्हयामध्ये प्रत्येक दिवशी निश्चित केलेली पाककृतीप्रमाणे सर्व विदयार्थ्यांना आहार देण्यात यावा. परंतु, याप्रमाणे कार्यवाही करण्यात आलेली नाही. शासन निर्णयानुसार कार्यवाही न करता योग्य तो शालेय पोषण आहार विदयार्थ्यांना देण्यात आल्याचे दिसुन येत नाही.

3) पंचायत समिती, बार्शीटाकळी, अकोला यांनी माहे जून 2015, जुलै 2015 व ऑगस्ट 2015 रोजीची शालेय पोषण आहाराची मागणी हरभरा या धान्यादी मालाची केली असतांना त्यांना वाटाणा पुरवठा केलेला आहे. त्यांच्याकडे वाटाणा असल्याने त्यांनी हरभ-याची मागणी नोंदविली असेल. त्यामुळे वाटाणा पुरवठा हा जादा झाला असण्याची शक्यता नाकारता येत नाही. मागणी केलेलेच धान्य पुरवठा करणे पुरवठादारावर बंधनकारक असतांना मागणी न केलेल्या धान्यादी मालाचा पुरवठा केला आहे.

4) प्राथमिक शिक्षण संचालक, पुणे यांचे परिपत्रक क्रमांक शापोआ/सुधायो/प्राशिस/307/2014-15/ 3288, दिनांक 11/06/2014 नुसार धान्यादी मालाची देयके अदा करण्याच्या पध्दतीनुसार पुरवठादाराने पुरवठा केलेल्या धान्यादी मालाची देयके चार प्रतीत बनवुन सादर करतील. एक प्रत पुरवठादार स्व:ताकडे ठेवील व देयकाच्या तीन प्रती गटस्तरावर शालेय पोषण आहार अधिक्षक यांच्याकडुन तपासणी करुन त्यापैकी दोन प्रती शिक्षण अधिकारी प्राथमिक यांना सादर करतील. देयकाची अदायगी करतांन एक प्रत शिक्षण अधिकारी प्राथमिक यांच्याकडे राहिल. परंतु, सदर देयकांच्या प्रती लेखापरिक्षणास उपलब्ध केल्या नाहीत.

उपरोक्त देयकांची मागणी व प्रत्यक्ष पुरवठाची तपासणी केली असता, एकूण मागणी पेक्षा रक्कम रुपये 65,851/- ने जादा पुरवठा केला आहे. वर्षातील इतर देयकात असा जादा पुरवठा केला असल्यास परिगणना करुन जादाची रक्कमेबाबत सुयोग्य कार्यवाही करणे आवश्यक आहे.

**3.105 कृतीशील अध्ययन पद्धती राबविणे योजनेतील अनियमितताबाबत.**

**जिल्हा परिषद वाशिम, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 8) -** सदरबाबत रक्कम रूपये 9,96,187/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) अप्पर आयुक्त विदर्भ वैधानिक विकास मंडळ, नागपूर यांचे पत्र क्रमांक विविमं/सस-1कावि-30/2015 नुसार जिल्हा परिषद प्राथमिक शाळांमध्ये कृतीयुक्त अध्ययन पद्धती राबविण्याबाबत कार्यपद्धती निश्चित केली आहे. त्यानुसार या कार्यक्रमाचे संपूर्ण सनियंत्रण व समन्वय शिक्षणाधिकारी (प्राथमिक) हे करतील. या बाबतचा प्रस्ताव त्यांनी जिल्हाधिकारी कार्यालयास प्रशासकीय मान्यतेसाठी त्वरित सादर करावा, असे नमूद असताना सदर योजना खर्चास मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, वाशिम यांनी प्रशासकीय मन्यता प्रदान केली आहे. या अनियामतताबाबत खुलासा करण्यात यावा.

2) उक्त अप्पर आयुक्त यांचे पत्रानुसार जिल्हा परिषद प्राथमिक शाळा हया आदिवासी व ग्रामीण क्षेत्रातील असतील हयाची शिक्षणाधिकारी (प्राथमिक) हे खात्री करतील, असे नमूद असताना या बाबतचा अभिलेख नस्तीमध्ये उपलब्ध झाला नाही.

3) महाराष्ट्र शासन, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांक भांखस-2014/प्र.क.82/ भाग-III/उद्योग -4, दिनांक 30/10/2015 अन्वये शासकीय कार्यालयांनी करायच्या साहित्य खरेदीबाबत सुधारीत

कार्यपद्धती विशद केलेली आहे. नियम पुस्तिकेच्या परीच्छेद 2.9.2 मध्ये नमुद केल्यानुसार खरेदी प्रकीया पार पाडण्यापुर्वी प्रशासकीय विभाग व कार्यालया अंतर्गत तात्काळ खरेदी समिती गठीत करणे आवश्यक असतांना विभागाने याप्रमाणे खरेदी समिती गठीत न करताच साहित्य खरेदी केलेले आहे.

4) महाराष्ट्र जिल्हा परीषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 79 मधील तरतुदीनुसार खरेदी केलेल्या साहित्याचे पुरवठ्याच्या बाबतीत पुरवठा घेणाऱ्या अधिकाऱ्याने पैसे देण्यापुर्वी सामान वस्तु वगैरे चांगल्या स्थितीत मिळाल्याचे आणि त्याची योग्य त्या संग्रह वहीत नोंद घेतल्याचे प्रमाणपत्र नोंदणे आवश्यक असतांना तशी कार्यवाही केली नाही.

5) पुरवठा आदेशानुसार शाळेवर माल पुरवठा करावा लागेल. त्यानुसार पुरवठा झाला किंवा कसे, याबाबत साठा पुस्तक लेखापरीक्षणास उपलब्ध न झाल्याने खात्री करता आली नाही.

**3.106 शालेय पोषण आहार धान्यादी मालाचा पुरवठा न करणे, पोषण आहार कमी पुरविणे व मागणीपेक्षा जादा साहित्याचा पुरवठा करणे योजनेमधील अनियमीततेबाबत.**

**जिल्हा परिषद वाशिम, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 3,4,10 व 12) -** प्राथमिक शिक्षणाचे सार्वत्रिकरण करण्याच्या दृष्टीने तसेच प्राथमिक शाळातील विदयार्थ्यांच्या पट नोंदणी व उपस्थितीचे प्रमाण वाढविण्यासाठी आणि शाळेतील गळतीचे प्रमाण थांबविण्यासाठी केंद्र पुरस्कृत शालेय पोषण आहार योजना सुरु करण्यात आली.

शिक्षण विभाग जिल्हा परीषद वाशिम यांनी सन 2015-2016 मध्ये शालेय पोषण आहार योजने अंतर्गत महाराष्ट्र स्टेट को- ऑपरेटीव्ह मार्केटींग फेडरेशन लिमिटेड, मुंबई यांनी धान्यादी मालाचा पुरवठा केल्याबाबत प्राप्त अनुदानातुन रक्कम रूपये 4,35,21,657/- खर्च केलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) धान्यादि माल पुरविणेबाबत दि महाराष्ट्र स्टेट को-ऑप मार्केटींग फेडरेशन यांना विभागस्तरावरुन दिलेले पुरवठा आदेश अर्धसमास पत्र क्रमांक 5 दिनांक 05/05/2017 अन्वये मागणी करुन देखील लेखापरीक्षणास उपलब्ध करुन देण्यात आलेली नाही.

i) अट क्रमांक 7 नुसार सबंधीत पुरवठादाराने मागणी नुसारच पुरवठा केलेला असल्याचे तपासणी करता आली नाही. पुरवठादारास शाळानिहाय मागणी किंवा पुरवठा आदेश प्राप्त करवुन न घेताच त्याचे सोयी नुसार पुरवठा करीत असल्याचे पंचायत समिती निहाय पोच पावत्यांची तपासणी करीत असतांना निदशर्नास आलेले आहे. शाळांच्या पोच पावत्यावर शाळेत धान्य/साहित्य उपलबध असल्यामुळे साहित्य परत करीत असल्याचा शेरा नोंदविलेला आहे.

जानेवारी ते फेब्रुवारी या कालावधीतील पुरविण्यात आलेले साहित्य बऱ्याच शाळांनी परत केलेले आहे. सबब पुरवठादारास शाळांकडुन मागणी गेलेली नसतांना देखील साहित्य पुरवलेले आहे.

ii) अट क्रमांक 17 नुसार धान्यादी मालाचा पुरवठा आदेश मिळाल्यापासुन पुरवठा 5 दिवसामध्ये सुरु करुन 20 दिवसांपर्यंत करणे बंधनकारक आहे. अट क्रमांक 19 नुसार विहीत मुदतीत पुरवठा न केल्यास उशीरा पुरवठा केलेल्या मालाच्या किंमतीवर 0.5 टक्के प्रती आठवडाप्रमाणे दंड आकारला जाईल. पंचायत समिती स्तरावरुन मिळालेल्या पोच पावती अन्वये साहित्याचा पुरवठा नियमीतपणे विलंबाने होत असल्याचे दिसून येते.

1 महिना साहित्य विलंबाने पुरवठा केल्यानंतर सुध्दा पुरवठाधारकावर दंडात्मक कार्यवाही केली नाही.

iii) अट क्रमांक 26 अन्वये पुरवठादार पुरवठा आदेशानुसार पुरवठा करण्यास असमर्थ ठरल्यास अपुरा पुरवठा केल्याचे कारणास्तव पुरवठादार व संचालनाय यांच्यातील करार रद्द करण्यात येईल. परंतु, त्याप्रमाणे धान्यादी साहित्य पुरवठा आदेशानुसार देण्यात आल्याचे प्रमाणित करता येत नाही. सबब प्रदानाचे बिलासोबत शिक्षंणाधिकारी (प्राथमिक) यांचे स्वाक्षरीनिशी पुरवठा आदेश असणे गरजेचे आहे. परंतू, देयकासोबत पुरवठा आदेशच राहात नाही. त्यामुळे साहित्याचा पुरवठा किती दिवस विलबाने झाला? दंडाची आकारणी किती करावी. याबाबत कोणतेही अधिकृत दस्तऐवज शिक्षण विभागाकडे उपलब्ध राहात नाहीत व पर्यंवेक्षकीय तथा संनियत्रन अधिकारी यांना सुध्दा देयकाचे प्रदान करतेवेळी तपासणी करणे आवश्यक असतांना त्याप्रमाणे कार्यवाही न केल्याचे निदर्शनास येते.

2) करारनाम्यामधील अट क्रमांक 3(ड) नुसार पुरवठा धारक पुरवठा आदेश प्राप्त होताच, जिल्हयातील तालुक्याचे तांदुळ व धान्यादी माल वाटपाचे सूक्ष्म नियोजन तसेच वाहन चालकाचे नाव व फोन नंबर इत्यादी शिक्षणाधिकारी (प्राथमिक) व गटशिक्षणाधिकारी /अधिक्षक (शालेय पोषण आहार) यांचेकडे धान्य वाटपाचे वेळेस सादर करतील, त्याला अनुसरुन कार्यवाही पुरवठाधारक करत नाहीत. त्याचप्रमाणे पुरवठा पोचपावतीवर सुध्दा संर्पक नंबर टाकण्यात आला नाही. यावरुन पुरवठाधारकाचे कामात पारदर्शकता आढळत नाही.

3) करारनाम्यातील अट क्रमांक 24 नुसार जिल्हास्तरावरील देयके प्रयोगशाळेचा तपासणी अहवाल समाधानकारक असल्यानंतरच पूरवठादाराने सादर केलेल्या देयकाचे प्रदान त्याने सादर केलेल्या देयकाच्या एकुण रक्कमेच्या 90 टक्के एवढे करण्याबाबत व उर्वरीत 10 टक्के रक्कम मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या मान्यतेने अदा करतील, असे निर्देश असतांना सुदधा पूरवठादारास देयकाची संपुर्ण 100 टक्के रक्कम एकाच देयकान्वये प्रदान करण्यात आली आहे.

4) धान्याचे चाचणी अहवाल हे धान्य वापरण्यापर्वी प्राप्त करवुन घेणे आवश्यक असतांना साहित्याचे चाचणी अहवाल विहीत मुदतीत प्राप्त करवुन घेतलेले नाही.

5) धान्यादी साहित्याचे साठा पुस्तक अर्धसमास पत्राद्वारे मागणी केली असता ते लेखापरीक्षणास उपलब्ध करुन देण्यात आले नाही.

6) करारनामा अट क्रमांक 6 नुसार पुरवठादारास शासनाने वेळोवेळी दिलेल्या आदेशानुसार त्याचप्रमाणे जिल्हयाने ठरवुन दिलेल्या पाककृतीनुसार धान्यादी मालाचा पुरवठा करणे बंधनकारक राहील. मात्र विभागाने मंजुर मेनुची यादी पत्र क्रमांक 11 दिनांक 15/05/2017 अन्वये मागणी करुन देखील लेखापरीक्षणास उपलब्ध करुन देण्यात आलेली नाही. त्यामुळे ठरवुन दिलेल्या मेनुनुसारच साहित्य पुरविण्यात आलेले आहे, याची खात्री करता आलेली नाही.

7) अनेक शाळेला निकृष्ठ साहित्याचा तुर डाळ मुग डाळ व इतर डाळी यांचा पुरवठा मुदतबाहय दिनांकानंतर पुरवठा केला असल्याचे पंचायत समिती, वाशिम मंगरूळपीर शाळेकडील पोच पावत्यावरुन आढळून आले.

प्रत्येक पंचायत समिती मध्ये डाळीं निकृष्ट असल्यामुळे परत करण्याबाबत मुख्याध्यापकांनी पोच दिलेली आहे. तसेच स्थायी समिती सभा दिनांक 27/1/2016 विषय क्रमांक 1 नुसार निकृष्ट प्रतीची डाळ शाळांना वाटप करण्यात आलेली आहे. 500 पोते धान्य जिल्हाधिकारी यांनी निकाली काढणे बाबत सुचित केलेले असतांना सदर माल शाळांना पुरविण्यात आला. याप्रमाणे तक्रार केलेली आहे. सबब पुरवठादारने शाळांना डाळींचा पुरवठा निकृष्ट दर्जाचा केलेला आहे. करारनाम्यातील अट क्रमांक 32 नुसार खाण्यास अयोग्य मालाचा पुरवठा केला म्हणून त्या मालाच्या किंमतीच्या 3 टक्के रक्कम एवढा दंड अकारण्याची अट असतांना त्यानुसार विभागाने कार्यवाही केली नाही. त्याचप्रमाणे जिल्हा परिषद शाळांना धान्यादी माल खराब असल्यामुळे परत केल्याचे निदर्शनास येते. परंतु, प्रमाणकाची तपासणी केली असता त्याला निदर्शनास आलेल्या चाचणी अहवालान्वये पुरवठा केलेला धान्यादी माल योग्य असल्याचे दाखविण्यात आले.

8) शिक्षणाधिकारी, अधिक्षक (शालेय पोषण आहार) यांनी शाळांचे केलेले तपासणी अहवाल लेखापरीक्षणास उपलब्ध करुन देण्यात आलेले नाही. महाराष्ट्र शासन, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, शासन निर्णय क्रमांक शापोआ-2009/प्र.क्र.207/प्राशि-4, दिनांक 01/06/2009 अन्वये शालेय पोषण आहाराची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी भरारी पथके व अतिदक्षता पथके प्रत्येक जिल्हयाच्या स्तरावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या नियंत्रणाखाली स्थापन करुन पथकामार्फत जिल्हयातील शाळांमध्ये शालेय पोषण आहार योजनेची अंमलबजावणी व्यवस्थित होत आहे किंवा कसे, याबाबत तपासणी करणे तसेच प्रत्येक जिल्हयामध्ये दरमहा किमान 10 शाळांची भरारी पथकामार्फत तपासणी करणे आवश्यक आहे. परंतु, याप्रमाणे कार्यवाही केल्याचे आढळुन आले नाही.

9) महाराष्ट्र शासन, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग विभाग, शासन निर्णय क्रमांक शापोआ-2010/प्रक्र 18 /प्राशि-4, दिनांक 02/02/2011 नुसार शालेय पोषण आहार योजनेतर्गंत खर्चाचे सुधारीत दर लागू करणेबाबत शासनाने आदेशित केले आहे. त्यातील परिच्छेद क्रमांक 4 नुसार धान्यादी माल पुरविण्यासाठी खर्च प्राथमिक करीता

प्रती लाभार्थी रूपये 1.70/- तर उच्च प्राथमिक करीता प्रती लाभार्थी रूपये 2.65/- या प्रमाणे मर्यादा ठरवून दिली आहे. पंचायत समिती स्तरावरुन मासिक देयके जिल्हा स्तरावर सादर करतेवेळी पंचायत समिती निहाय एकत्रित लाभार्थीचा गोषवारा काढून शासनाने दिलेल्या मर्यादेत खर्च झाल्याची खात्री करत नाहीत. त्यामुळे जिल्हा स्तरावर नोदविलेला खर्च निकषानुसार केल्याचे प्रमाणीत करता येत नाही.

10) AWP मध्ये मंजुर केलेल्या पटसंख्येच्या आधारे केंद्र हिस्सा 60 टक्के व राज्य हिस्सा 40 टक्के या प्रमाणात अनुदानाचे वाटप केलेले आहे. मात्र AWP मध्ये मंजुर शाळानिहाय पटसंख्येचा तपशील लेखापरीक्षणास उपलब्ध झालेला नाही.

11) उन्हाळी सुटीमध्ये दुष्काळ ग्रस्त घोषित केलेल्या पंचायत समिती अंतर्गत शाळांना शालेय पोषण आहार सुरु ठेवण्याबाबतचे आदेश आहेत. मात्र वाशिम विभागातील दुष्काळग्रस्त तालुक्यांची यादी लेखापरीक्षणास उपलब्ध करुन देण्यात आलेली नाही. त्यामुळे पुरविण्यात आलेले साहित्य योग्य असल्याबाबत खात्री करता आलेली नाही.

12) पंचायत समिती, मानोरा यांचे वर्ग 1 ते 5 वी व 6 वी ते 8 वीचे विदयार्थ्यांसाठी माहे जुलै व ऑगस्ट 2015 व माहे जानेवारी व फेब्रुवारी 2016 साठी पुरवठादाराने धान्यादी मालाचा पुरवठा न केलेल्या मालाची किंमत रुपये 35,382/- सबंधीत पुरवठादाराकडून वसूल करुन शासनखाती जमा करण्यात यावी. शाळेला धान्यादी मालाचा पुरवठा केल्याबाबत पुरवठादाराने पंचायत समितीला देयके सादर केले आहेत व सदर देयकाची तपासणी न करता साक्षांकीत करुन शिक्षण विभागाकडे प्रदान मंजूरीसाठी सादर केले आहेत. त्यामध्ये वरील प्रमाणे शाळेला माल प्राप्त नसतांना, देयकात नमूद परिमाणापेक्षा कमी प्राप्ती असतांना व संबंधीत शाळेचे मुख्याध्यापक यांची माल प्राप्तीबाबत पोहच नसतांना व काही शाळेने माल स्विकारला नसतांना सबंधीत पुरवठादाराने मागणी नुसार माल पुरवठा केल्याचे देयके सादर केले आहेत. शाळेला देयकात दर्शविला, त्याप्रमाणे माल प्राप्त नसतांना पुरवठादारास जादा प्रदान केले आहे. सदर नियमबाहय प्रदानाची रक्कम लेखापरीक्षणात अमान्य करण्यात येत असून सदरची रक्कम जबाबदारी निश्चित करून वसूल करुन शासन खाती जमा होणे आवश्यक आहे

13) शिक्षण विभागाचे सन 2015-2016 चे लेखापरीक्षणादरम्यान शालेय पोषण आहार योजने अंतर्गत धान्यादी साहित्य शाळानिहाय पुरवठा केल्याचे पोच पावत्यांची तपासणी केली असता पंचायत समिती, करंजा, वाशिम, मंगरूळपीर, रिसोडचे मुख्याध्यापक यांनी साहित्य प्राप्त झालेले नसल्याबाबत पोच दिलेली असतांना विभागाने सदर धान्यादी साहित्याचे देयके काढुन रक्कम रूपये 30,162/- अदा केलेली आहे. शाळेत धान्य पुरविल्यानंतर पुरवठादारने पिवळ्या रंगाची पावती देयकासोबत जोडणे आवश्यक असतांना पिवळ्या रंगाची पावती न जोडताच देयके सादर केलेली आहेत. साहित्य पुरविलेले नसतांना त्याबाबत अदा केलेली रक्कम रूपये 30,162/- वसूल करून शासन खाती भरणा करावी.

14) पंचायत समिती, वाशिम, रिसोडमधील काही मुख्याध्यापकांनी साहित्य अप्राप्त याप्रमाणे पोच पावती दिलेली असतांना त्याठिकाणी खोडुन प्राप्त, असे लिहुन देयक अदा केलेले आहे. मात्र याप्रमाणे खोडतोड असलेल्या पावत्यांची देयके साहित्य प्राप्त झाल्यानंतर अदा केलेली असल्याबाबत खात्री करता आलेली नाही.

15) पंचायत समिती मानोरा यांचेकडील अभिलेख्याची तपासणी केली असता संबंधीत पुरवठादाराने मागणी पेक्षा जास्त धान्यादी मालाचा पुरवठा केला आहे. मागणी पेक्षा जास्तीने केलेल्या पुरवठाची संबंधीत पंचायत समितीने व शिक्षण विभागाने कोणत्याही प्रकारची पडताळणी न करता पुरवठा केलेल्या मालाचे संबंधीत पुरवठादारास रक्कम रूपये 3,03,744/- प्रदान केले आहे. इतर पंचायत समित्यांमध्ये मागणी पेक्षा जास्तीने पुरवठा केलेल्या मालाची रक्कम लेखापरीक्षणात प्रमाणित करता येत नाही. याबाबत मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांचेमार्फत अंतर्गत लेखापरीक्षण करून जबाबदारी निश्चित करुन रक्कम वसूल करुन शासन खाती जमा होणे आवश्यक आहे.

### 3.107 स्थानिक विकास कार्यक्रमा अंतर्गत राणी लक्ष्मीबाई वाशिम विद्यालयाला डेक्स बेंच खरेदीतील अनियमितेबाबत.

**जिल्हा परिषद वाशिम, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 11) -** सदरबाबत रक्कम रूपये 2,42,437/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत अभिप्राय खालीलप्रमाणे आहेत.

1) सन 2014-2015 मध्ये निधी प्राप्त झाला असून त्याच वित्तीय वर्षात खरेदी केलेली नाही. अखर्चीत रक्कमेस सक्षम मंजूरी प्राप्त करणे आवश्यक होती. ती विभागाने घेतली नाही. विहीत मुदतीत निविदा प्रक्रिया केलेली नाही.

2) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास जलसंधारण विभाग, निर्णय क्रमांक संकीर्ण 2010/275/प्र.क्रं.172/ पंरा-7, दिनांक 19/10/2011 अन्वये केलेली ई - निवीदा प्रथम 1 ते 3 पावेतो निविदा केवळ शिव उद्योग, वाशिम यांचे खेरीज अन्य निविदा प्राप्त केल्या नाहीत. तेव्हा व्यापक प्रसिध्दी अभावी निविदा प्राप्त झाल्या नाहीत. तिनही वेळेस विशेष प्रतिसाद प्राप्त केला नाही.

3) डेक्स बेंच ही बाब महाराष्ट्र लघुउद्योग महामंडळाकडून खरेदी करणे उदयोग, उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय दिनांक 30/10/2015 नुसार राखीव आहे. परंतू, महामंडळाकडील दरपत्रक व त्यानुसार पुरवठाबाबतची कार्यवाही विभागाने केली नाही.

4) पूरवठा आदेशातील अट क्रमांक 11 नुसार साहीत्याची गुणवत्ता चाचणी अहवाल शासनमान्य संस्थेकडून साहित्य पूरवठा करण्यापूर्वी व पुरवठा केल्यानंतर सादर करावयाचा आहे. चाचणी अहवाल दिनांक 30/11/2015 ला सादर करण्यात आला. साहित्य पूरवठा केल्यानंतर चाचणी अहवाल सादर केला. परंतु, साहित्य पूरवठा करण्यापूर्वीचा चाचणी अहवाल सादर केला नाही.

5) पूरवठा आदेशातील अट क्रमांक 5 नुसार साहित्याचा पूरवठा 30 दिवसाचा विहीत कालावधीत न केल्यास एकूण किमतीच्या 0.9 टक्के प्रति दिन दंड करणेचा आहे. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद वाशिम यांचा पुरवठा आदेश जा.क्र./जि.प.वा./4346, दिनांक30/09/2015 ला देण्यात आला. परंतु, प्रत्यक्ष पुरवठा दिनांक 26/11/2015 करण्यात आला. म्हणजेच 25 दिवस विलंबाने करण्यात आला. परंतु, दंडाची रक्कम रूपये 54,548/- कपात करण्यात आली नाही. दंडाची रक्कम रूपये 54,548/- वसूल करण्यात यावी.

**3.108 जिल्हा नियोजन समिती अंतर्गत जिल्हा परिषद प्राथमिक / माध्यमिक शाळा दुरुस्ती खर्चाकरीता अनुदान वितरीत करणे.**

**जिल्हा परिषद यवतमाळ, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 2) -** शिक्षण विभाग येथील सन 2015-2016 लेखापरिक्षण केले असता सर्वसाधारण जिल्हा वार्षिक योजना सन 2015-16 करीता जिल्हाधिकारी कार्यालय यवतमाळकडुन पत्र क्रमांक नियो/जिवायो/2015-16 विवि/कार्या 6/2016, दिनांक 03/02/2016 नुसार प्राथमिक शाळेच्या इमारतीच्या विशेष दुरुस्ती करीता रुपये 80 लाख शासकीय माध्यमिक शाळा इमारतीच्या बांधकामा / दुरुस्तीकरीता रुपये 90 लाख अनुदान प्राप्त झाले असुन एकूण 16 पंचायत समिती अंतर्गत प्राथमिक व माध्यमिक शाळांना दुरस्तीकरीता शिक्षण विभागाकडुन पत्र क्रमांक 1711/16, दिनांक 30/03/2016 नुसार रक्कम वितरीत करण्यात आली. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) जिल्हाधिकारी कार्यालय यवतमाळ यांचे निधी वितरण आदेश क्रमांक 04/2016, दिनांक 03/02/2016 मधील अट क्र.5 नुसार सदर योजने अंतर्गत घेण्यात येणाऱ्या शाळा दुरुस्तीचे कामाचे छायाचित्र बांधकाम पुर्वीचे बांधकाम नंतरीचे सादर करणे आवश्यक आहे. परंतु एकाही शाळेकडुन तसे छायाचित्र प्राप्त करुन घेण्यात आले नाही.

2) अट 10 नुसार कामनिहाय खर्चाचा मासिक प्रगती अहवाल विहीत नमुन्यात दर महिन्यात 5 तारखेपुर्वी सादर करणे आवश्यक आहे. परंतु तसा कोणताही प्रगती अहवाल नस्तीत उपलब्ध नाही.

3) जिल्हाधिकारी यांचे कार्यालय निधी वितरण आदेश क्रमांक 04/2016, दिनांक 03/02/2016 मधील अटी शर्तीनुसार सदर निधी वित्तीय वर्षात मार्गदर्शक तत्वानुसारच खर्च करणे व त्याच कामावर खर्च करणे आवश्यक आहे. परंतु सदर अटी शर्ती नुसार कार्यवाही केल्या गेल्याबाबत कोणतीही कागद पत्रे नस्तीत उपलब्ध नाही.

4) उपरोक्त प्रमाणे प्राथमिक / माध्यमिक शाळेचे विशेष दुरुस्ती बाबत मागणी प्रस्ताव व इतर आवश्यक अभिलेखे नस्तीत उपलब्ध नाही. त्यामुळे आवश्यक्ते नुसार त्या त्या शाळांमध्ये निधी योग्य प्रमाणात वितरीत केला किंवा कसे याबाबत तपासणी करता आली नाही.

5) शिक्षण विभागाकडुन प्राथमिक व माध्यमिक शाळा विशेष दुरुस्ती करीता निधी बांधकाम विभाग जिल्हा परिषदेकडे वितरीत केल्यानुसार त्यांनी त्या संबंधात कोणती कार्यवाही केली मंजुर शाळानांच रक्कम अदा केली किंवा कसे याबाबत एकाही शाळेचे अभिलेखे बांधकाम विभागाकडुन प्राप्त झाले नाही. त्यामुळे निधी वितरणानंतर जिल्हा परिषद बांधकाम विभागाने कोणती कार्यवाही केली याबाबत शहनिशा करता आली नाही.

6) प्राथमिक व माध्यमिक शाळा विशेष दुरुस्ती करीता दिलेल्या अनुदानाबाबत त्यांचेकडुन उपयोगिता प्रमाणपत्र घेण्यात आले नाही. प्रत्येक शाळेकडुन उपयोगिता प्रमाणपत्र प्राप्त करुन अनुपालन सादर करावी.

7) जिल्हाधिकारी कार्यालय यवतमाळ यांचे वटन आदेश क्र.16/2015 दिनांक 16/02/2015 नुसार माध्यमिक शाळा दुरुस्ती करीता रुपये 32 लक्ष अनुदान प्राप्त झाले असुन नस्तीत नमुद शाळाना ते वाटप करण्यात आले. परंतु अद्यापपर्यंत त्यांचेकडुन उपयोगिता प्रमाणपत्र प्राप्त करुन घेतले नाही.

8) माहे फेब्रुवारी 2015 व माहे फेब्रुवारी 2016 प्राप्त अनुदान बांधकाम विभाग जिल्हा परिषदेकडे शाळा दुरुस्तीचे करीता वितरीत करण्यात आलेल्या आदेशाची तपासणी केली असता काही गावातील शाळांना दुबार रक्कम अदा करण्यात आली असल्याचे दिसते.

### 3.109 जिल्हा परिषद अंतर्गत प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांना बसण्यासाठी आसनपट्टी खरेदी करणे.

**जिल्हा परिषद यवतमाळ, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 7) -** सदरबाबत रक्कम रूपये 13,17,897/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, उद्योग, संचालनालय परिपत्रक क्रमांक भाखंस/हातमाग कापड/दरनिश्चिती /8381/ 2012/13, दिनांक 15/02/2012 तील देय रक्कमेच्या अटी नुसार मालप्राप्त झाल्यानंतर सुरवातीला पुरवठा धारकाला 90 टक्के रक्कमेचे शोधन करुन उर्वरीत रक्कम सर्व मालाची मागणी काराला पोच सुस्थितील व निर्देशाप्रमाणे प्राप्त झाल्यानंतर दयावयाची असतांना सुरवातीला 100 टक्के रक्कमेचे पुरवठाधारकाला शोधन केले आहे.

2) पंचायत समिती निहाय आसनपट्टी पुरविणेबाबत पुरवठा आदेश देण्यात आला. पंचायत समिती अंतर्गत केंद्रनिहाय शाळेकडुन आवश्यक आसनपट्टी ची मागणी घेण्यात आली नाही, त्यामुळे पुरविलेल्या आसनपट्टीचे पुर्ण नगाची त्या शाळांना आवश्यकता होती काय ? याबाबत शहनिशा करता आली नाही.

3) करारनामा नस्तीत उपलब्ध नाही. त्यामुळे व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य, हातमाग महामंडळ मर्यादित नागपूर यांचे सोबत करारनामा केला किंवा कसे याबाबत तपासणी करता आली नाही.

4) आसनपट्टी कापड 1,1/2x 10 = 189 प्रती नग 135.5 प्रमी चौमी चे सॅम्पल नस्तीत उपलब्ध नाही. आसनपट्टी निर्देशाप्रमाणे / योग्य प्राप्त झाली किंवा कसे याबाबत शासकीय प्रयोग शाळेचा चाचणी अहवाल घेण्यात आला नाही.

5) देयकातुन 2 टक्के आयकर व सेस 29,783/- रुपये कपात करण्यात आले नाही.

### 3.110 कृती युक्त अध्यापन पध्दती अंतर्गत जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचे साहित्य पुरविणे खर्चाबाबत.

**जिल्हा परिषद यवतमाळ, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 13) -** सदरबाबत रक्कम रूपये 14,20,575/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) शाळेचे मुख्याध्यापकाकडुन उपयोगिता प्रमाणपत्र घेण्यात आले नाही. त्यामुळे योजनेचा बहु वर्ग अध्यापनासाठी चा उद्देश सफल झाला किंवा कसे याबाबत शहनिशा करता आली नाही.

2) कल्याणी कार्पोरेशन यांनी 15 शाळा वर पुरवठा केलेल्या ABL साहित्याचे DM ची तपासणी केली असता त्यावर दिनांक नमुद नाही. त्यामुळे DM हि कोणत्या दिनांकाची होती याबाबत तपासणी करता आली नाही. DM No106 जिल्हा परिषद प्राथमिक शाळा तिरझडा कंळब ची तपासणी केली असता त्यावर दिनांक नमुद नाही. सदर DM शाळेने क्रमांक 47, दिनांक 07/04/2016 नुसार आवक केल्याचे दिसते.

3) योजनेच्या आराखडयामध्ये कुठेही 5.5 इंच x 400 इंच आकाराच्या क्लॅश कार्डचा उल्लेख नसतांना प्रत्यक्षात CM नुसार प्रत्येक शाळेला अंदाजे 1400 ते 1600 कार्डचा कसा काय पुरविण्यात आला.

4) टेंडर अटी व शर्ती क्र.42 नुसार पुरवठाधार यास प्रथमता 85 टक्के रक्कमेचे शोधन करण्याच्या मागे असतांना 100 टक्के रक्कमेचे शोधन कसे काय करण्यात आले.

5) प्राथमिक शाळेला (15 शाळा जिल्हा परिषद) सादर केलेल्या DM ची तपासणी केली असता त्यांत प्रत्येक साहित्य हे कार्यालयीन नमुन्या प्रमाणे पुरविल्याचे नमुद आहे. DM नुसार शाळेला माल पुरविला असतांना शाळेचे मुख्याध्यापकाना सादर साहीत्य मंजुर कार्यालयीन नमुन्याप्रमाणे प्राप्त हे कशावरुन कळवले किंवा पुरवठा धारकाने DM मध्ये कार्यालयीन नमुन्याप्रमाणे नमुद केले म्हणुन ते मान्य करुन प्रत्येक मुख्याध्यापकाने ते साहित्य स्विकृत केल्याचे दिसते.

6) संचालक, खादी ग्रामोद्योग मंडळ, पुणे यांचे टेस्ट रिपोर्ट मध्ये संदर्भ नमुद नाही. फक्त कारणे खाती पत्र क्र.1727/16 दिनांक 30/03/2016 असा उल्लेख आहे. त्यामुळे त्यांनी चाचणी अहवाल नेमका कशाचे आधारे दिला याबाबत तपासणी करता आली नाही.

**3.111 शालेय पोषण आहार योजनेतील वर्ग 1 ली ते 5 वी देयकाचे प्रदानातील अनियमिततेबाबत.**

**जिल्हा परिषद बुलडाणा, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 5) -** सदरबाबत 3 प्रमाणकान्वये रक्कम रुपये 4,40,47,033/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) बुलढाणा तालुक्यासाठी बिल नं.791, दिनांक 23/11/2015 नुसार धान्यादी मालाचा पुरवठा रुपये 13,23,133/- चा करण्यात आला सदर देयकावर अधिक्षक वर्ग-2 शालेय पोषण आहार पंचायत समिती बुलढाणा यांनी प्रमाणित केलेल्या प्रमाणपत्रानुसार सप्टेंबर व ऑक्टोबर 15 चा रुपये 13,23,133/- चा पुरवठा विहीत मुदतीत करण्यात आला अदा करण्यास हरकत नाही, असे मोघम प्रमाणीत करण्यात आले आहे. कोणत्या दिनांकास मालाचा पुरवठा करण्यात आला याबाबत दिनांकीत प्रमाणित करण्यात आले नाही.

पंचायत समितीनिहाय पुरवठा झालेल्या मालाच्या गोषवाऱ्यात पुरवठा दिनांक तसेच साठा पंजी नोंदवही क्रमांक नमुद नाही. त्यामुळे पुरवठा वेळेत झाल्याची खात्री करता आलेली नाही.

2) शासन निर्णय शापोआ/2009/प्रक्र/136/प्रशि-4/शालेय शिक्षण व क्रिडा विभाग मंत्रालय मुंबई दि.10 जून 2009 मधील सुचना क्रं.5 नुसार धान्यादी मालाची तपासणी चे अटीनुसार 5-1 प्रमाणेपुरवठादाराने धान्यादी मालाचा पुरवठा केल्यानंतर त्याचे नमुने गटशिक्षणाधिकारी / अधिक्षक शालेय पोषण आहार यांनी शासकीय प्रयोगशाळेत पाठवावेत असे असतांना पुरवठादारानेच त्यांचे स्तरावरुन नमुने एकत्रीतरीत्या शासकीय प्रयोगशाळेत पाठवुन त्याचा एकत्रीत तपासणी अहवाल सादर केला आहे. पंचायत समितीनिहाय प्रयोगशाळा तपासणी अहवाल गटशिक्षणाधिकारी स्तरावरुन मागविण्यात आलेला नाही.

3) शासन निर्णय शापोआ/2009/प्रक्र/136/प्रशि-4/शालेय शिक्षण व क्रिडा विभाग मंत्रालय मुंबई दि.10 जून 2009 मधील सुचना क्रं.10 नुसार धान्यादी माल उतरवुन घेतांना संबंधीतांनी मालाचा दर्जा वजन योग्य असल्याचे तसेच भारतीय अन्न महामंडळाकडुन आलेल्या तांदुळाच्या पोत्यांवर भारतीय अन्न महामंडळाचे सिल व शिक्का असल्याची खात्री करावी तसेच तांदुळ व धान्यादी मालाचे वजन करुन योग्य असल्याची खात्री झाल्यानंतर पोच पावतीवर तसे स्पष्ट नमुद करावे असे स्प्ष्ट निर्देश असतांना मालाची पिवळी पावती DM (डिलेव्हरी मेमो) वर फक्त मुख्याध्याकाची माल मिळाल्याबाबत स्वाक्षरी आहे. वरील बाबींची पडताळणी केल्याबाबतच्या नोंदी शाळा स्तरावर आढळुन आलेल्या नाहीत.

4) मुळ प्रमाणकासोबत शासकीय प्रयोगशाळेतील तपासणी अहवाल जोडण्यात आलेले नाहीत.

5) करारनामा क्रमांक 13776, दिनांक 11/06/2014 नुसार एक वर्षाचे कालवधीकरीता दिनांक 01/06/2015 पर्यंत केलेला आहे. तरीसुध्दा सप्टेंबर व ऑक्टोबर 15 चे पुरवठयाचे प्रदान केलेले आहे.

**3.112 शालेय पोषण आहार योजनेतील वर्ग 6 वी ते 8 वी देयकाचे प्रदानातील अनियमिततेबाबत.**

**जिल्हा परिषद बुलडाणा, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 6) -** सदरबाबत रक्कम रुपये 1,97,67,910/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) बुलढाणा तालुक्यासाठी बिल नं.791 दिनांक 23/11/2015 नुसार धान्यादी मालाचा पुरवठा रुपये 13,23,133/- चा करण्यात आला सदर देयकावर अधिक्षक वर्ग-2 शालेय पोषण आहार पंचायत समिती बुलढाणा यांनी प्रमाणित केलेल्या प्रमाणपत्रानुसार सप्टेंबर व ऑक्टोबर 15 चा रुपये 13,23,133/- चा पुरवठा विहीत मुदतीत करण्यात आला अदा करण्यास हरकत नाही, असे मोघम प्रमाणीत करण्यात आले आहे. कोणत्या दिनांकास मालाचा पुरवठा करण्यात आला याबाबत दिनांकीत प्रमाणित करण्यात आले नाही.

पंचायत समितीनिहाय पुरवठा झालेल्या मालाच्या गोषवाऱ्यात पुरवठा दिनांक तसेच साठा पंजी नोंदवही क्रमांक नमुद नाही. त्यामुळे पुरवठा वेळेत झाल्याची खात्री करता आलेली नाही.

2) शासन निर्णय शापोआ/2009/प्रक्र/136/प्रशि-4/शालेय शिक्षण व क्रिडा विभाग मंत्रालय मुंबई दि.10 जून 2009 मधील सुचना क्रमांक 5 नुसार धान्यादी मालाची तपासणी चे अटीनुसार 5-1 प्रमाणे पुरवठादाराने धान्यादी मालाचा पुरवठा केल्यानंतर त्याचे नमुने गटशिक्षणाधिकारी / अधिक्षक शालेय पोषण आहार यांनी शासकीय प्रयोगशाळेत पाठवावेत असे असतांना पुरवठादारानेच त्यांचे स्तरावरुन नमुने एकत्रीतरीत्या शासकीय प्रयोगशाळेत पाठवुन त्याचा एकत्रीत तपासणी अहवाल सादर केला आहे. पंचायत समितीनिहाय प्रयोगशाळा तपासणी अहवाल गटशिक्षणाधिकारी स्तरावरुन मागविण्यात आलेला नाही.

3) प्राथमिक शिक्षण, संचालनालय, पुणे यांचे परिपत्रक क्रमांक शापोआ/प्राशिसं/307/3288, दिनांक 11/06/2014 नुसार अट क्रं. 6 नुसार पुरवठादारास तांदुळ व धान्यादी मालाचा पुरवठा आदेश दिल्यानंतर 20 शालेय कामकाजाच्या दिवसांमध्ये शालेय वेळेत तांदुळ व धान्यादी मालाचा पुरवठा करणे बंधनकारक असतांना मालाचा पुरवठा 6 दिवस उशीरा करण्यात आला याबाबत दंडात्मक कार्यवाही केली काय? याबाबत अनुपालन सादर करावे.

4) शासन निर्णय शापोआ/2009/प्रक्र/136/प्रशि-4/शालेय शिक्षण व क्रिडा विभाग मंत्रालय मुंबई दि.10 जून 2009 मधील सुचना क्रमांक10 नुसार धान्यादी माल उतरवुन घेतांना संबंधीतांनी मालाचा दर्जा, वजन भारतीय अन्न महामंडळाचे सिल व शिक्का असल्याची खात्री करावी. तसेच तांदुळ व धान्यादी मालाचे वजन करुन योग्य असल्याची खात्री झाल्यानंतर पोच पावतीवर तसे स्पष्ट नमुद करावे असे स्प्ष्ट निर्देश असतांना मालाची पिवळी पावती DM (डिलेव्हरी मेमो) वर फक्त मुख्याध्याकाची माल मिळाल्याबाबत स्वाक्षरी आहे. वरील बाबींची पडताळणी केल्याबाबतच्या नोंदी शाळा स्तरावर आढळुन आलेल्या नाहीत.

5) मुळ प्रमाणकास शासकीय प्रयोगशाळेतील तपासणी अहवाल जोडण्यात आलेले नाहीत.

**3.113 संगणक अर्हता प्राप्त करुन न घेतलेल्या शिक्षकांच्या वेतनवाढी नियमीत निर्गमीत केल्या आहेत अथवा नाही याबाबतचा तपशील सादर करणेबाबत.**

**जिल्हा परिषद बुलडाणा, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 14) -** याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) शिक्षण विभाग, जिल्हा परिषद बुलडाणाचे सन 2015-16 या वित्तीय वर्षाचे लेखापरिक्षणात ज्या शिक्षकांनी अद्यापही संगणक अर्हता प्राप्त करुन घेतलेली नाही त्याची माहिती सादर करण्यात आलेली नाही.

2) सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक प्रशिक्षण 2000/प्र.क्र.61/2001/39, दिनांक 07/08/2001 अन्वये सर्व शासकीय अधिकारी / कर्मचारी यांना संगणक अर्हता परिक्षा उत्तीर्ण होणे अनिवार्य करण्यात आलेले आहे.

3) सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक प्रशिक्षण-2000/प्र.क्र.5/2001/39, दिनांक 20/07/2002 नुसार सर्व अधिकारी / कर्मचारी यांनी संगणक हाताळणी व वापराबाबतचे प्रमाणपत्र शासनमान्य संस्थेकडुन प्राप्त करुन सादर करणे आवश्यक आहे. तसेच विहीत मुदतीत प्रमाणपत्र सादर न केल्यास किंवा परिक्षा उत्तीर्ण होण्यापासुन सुट देण्यात येईपर्यंतच्या कालावधीकरीता वेतनवाढी रोखुन ठेवण्यात येतील

4) सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्रमांक मातसं/नस्ती/04/224/39, दिनांक 05/05/2007 नुसार संगणक अहर्ता परिक्षा उत्तीर्ण करुन प्रमाणपत्र शासनास सादर करण्यासाठी दिंनाक 01/01/2007 पासुन दिनांक 31/12/2007 पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. दिनांक 31/12/2007 पर्यंत संगणक अहर्ता प्राप्त करुन घेणे आवश्यक होते. व ज्यांनी अशी अहर्ता प्राप्त करुन घेतलेली नाही त्यांची दिंनाक 01/07/2008 रोजी देय असलेली

वेतनवाढ मंजुर न करता स्थगित ठेवुन ज्या दिंनाकास संबंधीतानी संगणक अहर्ता प्राप्त करुन घेतली, त्या दिनांकास सदर वेतनवाढ मंजुर करणे आवश्यक होते. याप्रमाणे कार्यवाही करण्यात आली आहे काय? तसेच अशी कार्यवाही केली नसल्यास संबंधीत शिक्षकांचे नावासह त्यांची दिनांक 01/07/2008 रोजी मंजुर केलेली वेतनवाढ, वेतन व ग्रेड वेतन व त्यांनतर मंजुर करण्यात आलेल्या सर्व वेतनवाढीचा तपशील लेखापरीक्षणास सादर करण्यासाठी टिपण क्रमांक 07, दिनांक 08/05/2017 अन्वये माहिती मागुनही कोणतीच माहिती उपलब्ध करुन देण्यात आली नाही.

उपरोक्त आक्षेपांची पुर्तता करावी व शासन निर्णयानुसार कार्यवाही करण्यात आली नसल्यास संबंधीताच्या वेतनवाढी रोखुन ठेवणबाबत कार्यवाही करण्यात यावी. तसेच दिनांक 01/07/2008 नतंर मंजुर करण्यात आलेल्या वेतनवाढी रद्द करुन ज्या दिनांकास संबंधीतानी संगणक अहर्ता प्राप्त करुन घेतली आहे. त्या दिनांकापर्यंत जादा प्रदान झालेली वेतनवाढीची रक्कम वसुल करुन शासन लेखाशिर्षाखाली भरणा करुन पुर्तता दर्शवावी.

**3.114 जिल्हा परिषद सेस फंडा अंतर्गत लेडीज व जेन्ट्स सायकल खरेदीतील अनियमितता.**

**जिल्हा परिषद नागपूर, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 1) -** शिक्षण विभागाद्वारे प्राथमिक शाळेतील वर्ग 5 ते 12 वी च्या मुलांना व मुलींना सायकल पुरविणे योजनेअंतर्गत प्रत्येकी 50,00,000/- ची तरतुद करण्यात आली असून सायकलींची खरेदी करण्यात आलेली आहे. दोन प्रमाणकाद्वारे रक्कम आहरीत करुन खर्च रक्कम रूपये 99,95,906/- रोखपुस्तीकेत नोंदविण्यात आलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) पुरवठा आदेशातील परिशिष्ट अ नुसार सायकलींचा पुरवठा दिनांक 11/08/2015 पर्यत करणे आवश्यक आहे. तथापि, पुरवठा विवरणावर पंचायत समिती हिंगणा व पंचायत समिती उमरेड वगळता साठा प्राप्तीचा दिनांक एकाच व्यक्तीने नोंदविला असल्याचे दिसून येते. पंचायत समिती लेखापरिक्षणात साठा पुस्तकांची तपासणी केली असता पंचायत समिती नागपूर येथील साठा नोंदवहीनुसार प्रत्यक्षात सायकलचा साठा दिनांक 21/08/2015 रोजी प्राप्त झाल्याचे नमुद असल्यामुळे पुरवठादारास लाभ देण्याच्या हेतूने सदरील कार्यवाही केल्याचे दिसून येते. सदर प्रकरणी जिल्हा परिषदेचे अंतर्गत तपासणी पथकाद्वारे तपासणी करुन नियमाप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

2) शर्ती व अटीनुसार विहीत मुदतीत साहित्य पुरवठा न झाल्यास दरकरारातील अट क्रमांक 16 नुसार दंडनिय कार्यवाही करणे आवश्यक असतांना अशी कार्यवाही केल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे जिल्हा परिषदेचे आर्थिक नुकसान झालेले आहे.

3) शर्ती व अटीनुसार साहित्याचा पुरवठा केल्यानंतर पुरवठादाराने पुरवठयाचे डिलीव्हरी मेमो व नॅशनल टेस्टं हाऊस अंधेरी, मुंबई या कार्यालयाकडून पुरवठा पूर्ण तपासणी केल्याचा चाचणी अहवाल सादर करणे आवश्यक राहील. तथापि, नॅशनल टेस्ट हाऊस मुंबई यांनी दिनांक 27/06/2013 ला प्राप्त सॅम्पलचे दिनांक 31/07/2013 रोजीचे तपासणी केंल्याचे प्रमाणपत्र सोबत जोडण्यात आलेले असल्यामुळे उपरोक्त पुरवठा आदेशासोबत सदरील प्रमाणपत्राचा संबंध दिसून येत नाही. त्यामुळे करारनाम्याचा भंग झालेला आहे.

4) शर्ती व अटीमधील अट क्रमांक 6 नुसार साहित्याचा पुरवठा केल्यानंतर शिक्षणाधिकारी प्राथमिक यांनी गटशिक्षणाधिकारी, पंचायत समिती कार्यालयापैकी कोणत्याही दोन कार्यालयात पुरवठा केलेल्या साहित्यापैकी किमान दोन नग रॅंडमली काढून शासकीय तंत्रशिक्षण महाविद्यालय नागपूर यांचेकडून साहित्याचे दर्जाबाबत तपासणी करुन घेऊन त्यानंतर साहित्य स्पेसिफिकेशन प्रमाणे असल्याचे तपासणी प्रमाणपत्र प्राप्त झाल्यावर देयकाचे प्रदान करण्यात येईल अशी अट नमुद आहे. तथापि, दोन कार्यालयाकडून नमुने काढून न घेता फक्त गटशिक्षणाधिकारी, पंचायत समिती, नरखेड या कार्यालयाकडून नमुने काढण्यात आलेले असून शासकिय तंत्रशिक्षण महाविद्यालय नागपूर यांचेकडून नमुने तपासून न घेता शासकिय तंत्र माध्यमिक शाळा नरखेड यांचेकडून नमुने तपासून घेण्यात आलेले आहे. सदर तपासणी प्रमाणत्रात जेन्टस सायकलचे दर्जाबाबत अभिप्राय नसतांनादेखील रकमेचे प्रदान करण्यात आल्यामुळे सदरील प्रदान मान्य करता येत नाही.

5) नमुन्यादाखल अर्जाची तपासणी केली असता अर्ज मंजूरीबाबत अर्जावर सक्षम प्राधिका-याचे अभिप्राय नाहीत. अर्जाचे समर्थनार्थ आवश्यक दस्तऐवज अर्जासोबत जोडण्यात आलेले नाहीत. तसेच काही प्रकरणी आवश्यक माहिती अर्जामधे नमुद नसल्यामुळे लाभार्थी योजनेसाठी पात्र असल्याबाबत खात्री करता आली नाही.

6) साहित्य वाटपाबाबतचे अहवाल व उपयोगिता प्रमाणपत्रे संबंधीताकडून प्राप्त करुन घेऊन नस्तीबध्द करण्यात आलेली नाही.

7) पंचायत समिती, नागपूर यांना वाटप करण्यात आलेल्या 186 नग सायकलपैकी 183 नग सायकलींचे वाटप करण्यात आलेले असून तीन सायकली लाभार्थी यादी अप्राप्त असल्यामुळे प्रलंबित असल्याचे दिसून येते. महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग यांचे शासन परिपत्रक क्रमांक पंरास-1096/प्र.क्रं.178/95, दिनांक 09/10/1997 मध्ये दिलेल्या निर्देशानुसार वस्तूंची खरेदी करण्यापूर्वी लाभार्थ्यांची निवड होणे आवश्यक असून जिल्हा परिषदेकडून राबविण्यात येणा-या सर्व कल्याणकारी योजनाअंतर्गत वाटप करावयाच्या वस्तूचे वाटप त्याच वित्तीय वर्षात व वेळेत होण्याबाबत दक्षता घेण्याबाबत निर्देश आहेत. तथापि त्यानुसार कार्यवाही झाल्याचे दिसून येत नाही.

**3.115 शालेय पोषण आहार योजनाअंतर्गत व्यंवस्थापन, संनियंत्रण व मुल्यमापन मधून धान्यकोठ्या व पिण्याचे ग्लास खरेदीमधील अनियमितता.**

**जिल्हा परिषद नागपूर, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 2) -** शालेय पोषण आहार योजनाअंतर्गत व्यंवस्थापन, संनियंत्रण व मुल्यमापन मधून खालीलप्रमाणे धान्यकोठ्या व पिण्याचे ग्लास खरेदी करुन प्रमाणकाद्वारे रक्कम रूपये 27,48,289/- आहरीत करुन खर्च रोखपुस्तीकेत नोंदविण्यात आलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) पुरवठा आदेशातील अट क्रमाक 4 नुसार आदेश प्राप्त होताच 3 दिवसाचे आंत करारनामा करावा लागेल, तथापि करारनामा करण्यात आलेला नाही.

2) पुरवठा आदेशातील अट क्रमांक 8 नुसार विहीत मुदतीत पुरवठा न झाल्यास प्रती आठवडा 0.5 टक्के प्रमाणे दंड आकारण्याची तरतुद आहे. तथापि विलंबाबाबत दंडनिय कार्यवाही करण्यात आलेली नाही.

3) महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन परिपत्रक क्रमांक संकीर्ण-1000/प्र.क्र.14/भाग-1/कोषा.प्रशा-5, दिनांक 09/03/2015 अन्वये दिनांक 15 फेब्रुवारी नंतर नवीन साहित्य खरेदी प्रस्तावांना मंजूरी देवू नये. तसेच देयक पारीत न करण्याबाबत निर्देश दिलेले आहे. तथापि सदर निर्देशाचे पालन न केल्याने उपरोक्त नियमाचे उल्लंघन झाल्याचे दिसून येते.

4) पुरवठा आदेशातील अट क्रमांक 9 नुसार साहित्य प्राप्त झाल्याचे पोचपावती प्राप्त झाल्यावरच देयकाचे शोधन करण्यात येईल. तथापि साहित्य प्राप्त होण्यापूर्वीच रक्कम आहरीत केल्याचे दिसून येते.

**3.116 शाळा पोषण आहार पुरवठा आदेशापेक्षा जास्त प्रमाणात साहित्य पुरवठाबाबत.**

**जिल्हा परिषद वर्धा, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 1) -** शिक्षण विभागातील सन 2015-16 चे लेखापरिक्षणात शिक्षण विभाग यांनी इयत्ता 1 ली ते 5 वी व इयत्ता 6 वी ते 8 वी पर्यंत शिक्षण घेणारे विदयार्थ्यांना पोषण आहार संबंधीत धान्यादी मालाचे पुरवठा करण्यात आले.

1) प्राथमिक शिक्षण, संचालनालय यांचे परिपत्रक क्रमांक शा.पो.आ./सघयो/303/20.11.12/7177(अ), दिनांक 01/11/2011 व त्या अनुषंगाने करारनामा दिनांक 11/06/2014 अन्वये करण्यात आला. सन 2015-16 मध्ये करारनामा करण्यात आलेले नाही. सन 2014-15 च्या करारनुसारच साहित्य पुरवठा करण्यात आला आहे. केलेले करारनामामधील अट क्रमांक 7 अन्वये धान्यादी मालाचे पुरवठा प्रत्येक शाळेमध्ये मागणी पत्रकानुसार आवश्यक तेवढयाच प्रमाणात करील असे असताना जादा साहित्य पुरवठा करण्यात आलेला आहे.

दि महाराष्ट्र स्टेट को-ऑपरेटीव फेडरेशन लि. मुंबई यांनी पुरवठा आदेश पेक्षा जादा साहित्य पुरवठा करण्यात आला आहे. व त्याची रक्कम प्रदान करण्यात आली आहे. शालेय पोषण आहर अधिक्षक व गटशिक्षणाधिकारी यांनी सदर साहित्य पुरवठाबाबत पुरवठा आदेश व प्रत्यक्ष पुरवठा साहित्य तपासणी न करता साहित्य बरोबर असल्याचे प्रमाणीत केल्याने सदर जादा साहित्य पुरवठा चे रक्कम 7,13,394/- चे जादा प्रदान झाले आहे. तसेच शालेय पोषणआहार वरिष्ठ सहाय्यक व लेखा अधिकारी यांनी ही तपासणी करुन देयक सादर करणे आवश्यक असताना तशी कार्यवाही करण्यात आली नाही.

पंचायत समिती हिंगणघाट व कांरजा यानी आपले पुरवठा आदेश माहे 12/2015 व माहे 1/2016 व माहे 10/2015 व 11/2015 सादर न केल्याने व पंचायत समिती देवळी, सेलु यांनी माहे 12/2015 व माहे 1/2016 चे पुरवठा आदेश व पंचायत समिती समुद्रपुर व आर्वी माहे 10/2015 व 11/2015 चे पुरवठा आदेश सादर न केल्याने वरील प्रमाणे जादा पुरवठा साहित्याचे प्रदान होवु शकते. पुरवठा आदेश व प्रत्यक्ष पुरवठा याची वरिष्ठाकडुन गणना करुन वसुलीची कार्यवाही होणे आवश्यक आहे.

**3.117 देयकात नमुद दरापेक्षा जादा दराने मंजुरी प्रदान करणेबाबत.**

**जिल्हा परिषद वर्धा, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 10) -** शिक्षण विभाग येथील सन 2015-2016 चे लेखापरीक्षण केले असता शिक्षण विभागाने देयकात नमुद दराप्रमाणे देयक मंजुर करणे आवश्यक असताना मागणी प्रमाणे देयक मंजुर करण्यात आले आहे. त्यामुळे 14 प्रमाणकान्वये रक्कम रुपये 1,59,185/- चे जादा प्रदान करण्यात आले आहे.

देयकातील नमुद दराप्रमाणे प्रदान करणे आवश्यक असताना तशी कार्यवाही करण्यात आली नाही. देयकात नमुद दरापेक्षा जादा दराने देयक पारीत करणेबाबत शासन निर्णय, परिपत्रक असल्यास सादर होणे आवश्यक आहे. अन्यथा जादा प्रदान रक्कम वसुल करुन योग्य लेखाशिर्षात जमा होणे आवश्यक आहे. सदर लेखापरीक्षण हे निवड महिन्याचे असल्याने इतरही महिन्याच्या देयकात अशी अनियमतता राहू शकते, त्यावर ही वरीलप्रमाणे कार्यवाही होणे आवश्यक आहे.

**3.118 जिल्हा परिषद प्राथमिक शाळा स्काउट गाईड प्रशिक्षण 2015-16.**

**जिल्हा परिषद भंडारा, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 6) -** सन 2015-16 या वित्तीय वर्षात जिल्हा परिषद भंडाराच्या शिक्षण विभागाने स्काउट गाईड प्रशिक्षणावर प्रमाणक क्रमांक 1144, दिनांक 31/03/2016 अन्वये रक्कम रुपये 50,000/- खर्च नोंदविला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) जिल्हा चिटणीस, भंडारा स्काउट आणि गाइड्स, जिल्हा कार्यालय भंडारा यांनी पत्र क्रमांक 304/16 दिनांक 25/03/2016 अन्वये रुपये 50,000/- ची मागणी केली असल्याचे दिसते. संबंधीताने सदर प्रशिक्षण राबविण्यापूर्वी शिक्षण विभाग जिल्हा परिषद भंडारा यांचेकडुन पूर्व मंजूरी तसेच तांत्रिक व प्रशासनीक मंजूरी प्राप्त करुन त्या नंतर योजना राबविने आवश्यक होते. मात्र त्यांनी प्रशिक्षण योजना राबविल्याचा दिनांक 18/01/2016 ते 21/01/2016 हा तांत्रीक व प्रशासनीक मंजूरी पूर्वीचा असल्यामुळे खर्च नियमबाहय ठरतो.

2) उपरोक्त प्रमाणकातील न्यु विदर्भ प्रिंटर्स यांचे प्रिंटींग बील क्रमाक 82, दिनांक 26/01/2016 चे अवलोकन केले असता जिल्हा चिटणीस भंडारा, भारत स्काउट आणि गाइड्स, जिल्हा कार्यालय भंडारा यांनी 20 पानी 80 देणगी पावती पुस्तके छपाई केल्याचे दिसते. यावरुन असे निदर्शनांस येते कि भारत स्काउट आणि गाइड्स कार्यालयाने लोकांकडुन सदर कार्यक्रमाकरिता देणगीच्या रुपाने रकमा स्वीकारुन सदर प्रशिक्षण योजना राबविली आहे. योजना पूर्ण झाल्यावर परत जिल्हा परिषदेकडुन योजनेच्या खर्चाच्या नांवे अनुदान प्राप्त् करणे हे नियमबाहय ठरते त्यामुळे खर्च अमान्य् करण्यांत येत आहे.

3) भारत स्काउट गाईड यांनी सदर योजना राबवितांना पावती पुस्तके, निमंत्रण पत्रीका व लिफापे तसेच ट्रॉफी या करिता दरपत्रके मागवुन तुलनात्म्क तक्ता तयार केल्याचे दिसते. सदर तुलनात्मक तक्त्यावर ट्रेझार व जिल्हा चिटणीस यांच्या स्वाक्ष-या आहेत. यावर जिल्हा परिषदेच्या अधिकारी वर्गाची स्वाक्षरी नसल्यामुळे सदर खर्च व तुलनात्म्क तक्ते जिल्हा निधिच्या खर्चाकरिता ग्राहय धरता येत नाही त्यामुळे खर्च नियमबाहय ठरतो. त्याचप्रमाणे बॅनर व भोजन खर्च देखील नियमबाहय ठरतो.

4) उपरोक्त प्रमाणकान्वये नोदविलेल्या खर्चाचा वित्त् विभागाने धनादेश शिक्षणाधिकारी यांचे नावे काढला असुन शिक्षणाधिकारी प्राथमिक, जिल्हा परिषद, भंडारा यांनी पत्र क्रमांक डे-28/3646, दिनांक 20/06/2016 अन्वये रुपये 50,000/- चा धनादेश क्रमांक 333507, दिनांक 20/06/2016 अन्वये भारत स्काउट गाइड यांना प्रदान केला आहे. वित्त् विभागाने सदर धनादेश डायरेक्ट पार्टीचे नावे प्रदान न करण्यां मागील कारण नियमबाहय खर्च

असल्याची शक्यता नाकारता येत नाही. म्हणजेच संबंधीत अधिकारी वर्गाच्या निदर्शनांस येउन देखील नियमबाहय खर्चाचे प्रदान करण्यांत आले. ही गंभीर अनियमितता आहे.

**3.119 भारत स्काऊट गाईड मेळाव्याचे आयोजनाबाबत.**

**जिल्हा परिषद गोंदिया, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 7) -** जिल्हा निधीतून भारत स्काऊट गाईड मेळाव्याकरीता रुपये 75,000/- ची तरतूद केली असून दिनांक 28/01/2016 ते दिनांक 31/01/2016 या कालावधीत जिल्हा परिषद, वरीष्ठ प्राथमिक शाळा, भानपूर येथे मेळाव्याचे आयोजन केले होते.

1) मेळाव्याकरीता आवश्यक साहित्याच्या खरेदीसाठी तीन दरपत्रके मागविली आहेत. परंतु दरपत्रक मागविण्याच्या पत्रावर व पुरवठा आदेशावर दरपत्रकधारकाचे नाव, त्यांची पोचपावती, दरपत्रके सादर करावयाचा दिनांक, दरपत्रके उघडण्याचा दिनांक व नेमके कोणते साहित्य किती प्रमाणात हवे याबाबत काहीच नमूद नसल्याने राबविलेली प्रक्रीया नियमबाहय व संशयास्पद दिसून येते.

2) सदर योजनेस प्रशासकीय मंजुरी प्राप्त असल्याचे पत्र आहे. परंतु सदर पत्रावर पत्र क्रमांक व दिनांक नमूद नसल्याने शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांनी प्रशासकीय मंजुरी प्रदान केल्याची खात्री पटत नाही.

3) मेळाव्याकरीता उपप्रमाणक क्रमांक 303, दिनांक 02/02/2016 रुपये 16,465/- छोटू ग्राफीक्स, गोंदिया यांचेकडून निमंत्रण पत्रिका, फॅक्स व मेळावा बॅनर व प्रमाणपत्र छपाई करुन घेतली आहे. प्रमाणपत्र रुपये 9.15 दराने 900 नग छापले असून त्याकरीता रुपये 8,235/- खर्च केलेले आहे. जिल्हा चिटणीस स्काऊट गाईड कार्यालय गोंदिया यांचे अहवालानुसार सदर मेळाव्यात 13 शाळांच्या 281 स्काऊट गाईड नी सहभाग नोंदविलेला आहे. असे असतांना फार मोठ्या प्रमाणात 900 नग प्रमाणपत्रे छापण्याची आवश्यकता नव्हती. जास्तीत जास्त 300 नग प्रमाणपत्रे छापावयाचे होते. त्यामुळे प्रमाणपत्र छपाईवर अनावश्यकरित्या जादा केलेला खर्च 600 नग x 9.15= रुपये 5,490/- लेखामान्य नाही व वसूलपात्र आहेत.

4) उपप्रमाणक क्रमांक 32/2016, दिनांक 27/01/2016 अन्वये तिरुपती गिफ्ट हाऊस गोंदियाकडून रुपये 15,200/- चे एकूण 220 मोमेंटो, ट्रॉफी व मेडल खरेदी केलेले आहेत. मेळाव्यात किती प्रकारच्या स्पर्धा घेण्यात आल्या व त्यातील किती स्पर्धकांनी मोमेंटो, ट्रॉफी व मेडल वाटप करण्यात आले याची नोंद नाही. खरेदी केलेल्या साहित्याची साठा नोंद नाही व कोणास वाटप केले याची सुध्दा नोंद नाही. त्यामुळे सदर खरेदी संशयास्पद दिसून येते.

5) उपप्रमाणक क्रमांक 25, दिनांक 02/02/2016 अन्वये चिल्हारे बंधू डेकोरेशन, भानपूर यांचेकडून आणलेल्या मंडप व डेकोरेशन साहित्याबाबत प्रदान केलेले आहे. यामध्ये 500 खुर्च्या रुपये 3/- प्रमाणे 4 दिवसांकरीता रुपये 6,000/- प्रदान केलेले आहे. परंतु उपस्थिती फक्त 281 विद्यार्थी व इता पाहु णे व शिक्षक धरुन जास्तीत जास्त 300 खुर्चीची आवश्यकता असतांना जास्तीच्या 200 खुर्च्यांसाठी रुपये 3/- प्रमाणे 4 दिवसाकरीता दिलेले प्रदान रुपये 2,400/- वसूलपात्र आहेत.

6) उपप्रमाणक क्रमांक 18, दिनांक 02/02/2016 रुपये 3,521/- स्टेशनरी खरेदीचे बिल आहे. सदर खरेदीची साठा नोंद नाही. व मेळावा झाल्यानंतर केलेली स्टेशनरी खरेदी संशयास्पद आहे. तसेच उपप्रमाणक क्रमांक 04/2016, दिनांक 02/02/2016 रुपये 3,100/- झेरॉक्सचे बिल आहे. मेळावा झाल्यानंतरचे बिल असल्याने स्टेशनरी व झेरॉक्सवर केलेला खर्च रुपये 3,521/- + रुपये 3,100/- = रुपये 6,621/- लेखापरीक्षणास अमान्य असून वसूलपात्र आहेत.

7) रुपये 4,000/- चे पोस्टेज खरेदीचे देयक आहे. परंतु पोस्टेज स्टँप खरेदीची नोंद जावक नोंदवहीवर केल्याबाबत तपासणीस सादर न केल्याने दर्शविलेला खर्च संशयास्पद दिसून येतो.

**3.120 प्राप्त तरतूद नसताना माध्यमिक शाळेच्या वेतन व इतर खर्चाकरिता काढण्यात आलेल्या शासन निधीतून घरभाड्याची रक्कम रुपये 17,67,240/- जिल्हानिधीत जमा करणेबाबत.**

**जिल्हा परिषद गोंदिया, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 9) -** सन 2015-16 या वित्तीय वर्षाचे लेखापरीक्षणात विभागाचे रोखापुस्तकाची तपासणी केली असता धनादेश क्रमांक 121293, दिनांक 15/03/2016 अन्वये रुपये 17,67,240/- चलनाद्वारे जिल्हानिधीमध्ये जमा करण्यात आले. याबाबत अधिक तपासणी केली असता प्राप्त अनुदान वितरण आदेशानुसार माध्यमिक शाळा इमारत भाडेबाबत अनुदान प्राप्त झाल्याचे दिसून आले नाही. सदर रक्कम रुपये 2,20,20,558/- माध्यमिक शिक्षकांचे वेतन यातूनच भरणा करण्यात आले. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) ठेवण्यात आलेल्या नस्तीत एकूण 22 शाळांचे घरभाडे प्रतीमाह रुपये 1,47,270/- प्रमाणे दिनांक 01/05/2015 ते 31/03/2016 पर्यंत रुपये 17,67,240/- देय असल्याचे नमूद करून सन 2015-16 या वित्तीय वर्षात जिल्हा परिषद, माध्यमिक शाळेच्या प्राप्त झालेल्या अनुदानातून माहे जुलै 2015 च्या वेतनाकरिता गटशिक्षणाधिकारी सर्व पंचायत समिती यांना वेतनाची रक्कम वितरीत केल्यानंतर उर्वरित अखर्चित निधीतून शाळेचे भाडेबाबत अनुदान मागणी न करता जिल्हानिधीत नियमबाह्य रक्कम जमा करून शासन निधी अडकवून ठेवलेला आहे.

2) वेतन अनुदान प्रत्यक्ष मागणीपेक्षा किती जादा प्राप्त होत आहे. याबाबत वरील अर्धसमास पत्राद्वारे विचारणा केली असता कोणतेही उत्तर प्राप्त झाले नाही.

3) सदर नियमबाह्य व्यवहाराबाबत शहानिशा करणेसाठी अर्धसमास पत्र देऊन विचारणा केली असता पत्राची मूळ प्रत कोणतेही उत्तर न देता लेखापरीक्षणास परत केली नाही. मुंबई स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम, 1930 चे कलम 7 अन्वये कलम 6 नुसार मागणीची अवज्ञा केल्याबद्दल शास्ती होणे आवश्यक आहे.

**3.121 शालेय पोषण आहार योजनेतील अनियमिततेबाबत.**

**जिल्हा परिषद गोंदिया, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 13) -** सन 2015-2016 या वित्तीय वर्षात शिक्षण विभागाने खालील प्रमाणकांद्वारे शालेय पोषण आहार योजनेअंतर्गत एकूण रुपये 2,43,17,315/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) शालेय पोषण आहार योजने अंतर्गत पुरवठया संदर्भात शाळांना पुर्वसूचना देऊन व पुरवठा नियोजन / वेळापत्रक करणेबाबत प्राथमिक शिक्षण संचालनालय यांचे पत्र क्रमांक 2201, दिनांक 26/05/2015 नुसार सुचना क्रमांक 1 ते 10 चे तंतोतंत पालन केलेले नाही. त्यामुळे शालेय पोषण आहार योजने अंतर्गत सन 2014-15 चा केंद्र हिस्सा रुपये 52,16,169/- अखर्चीत असून राज्य हिस्सा रुपये 25,67,888/- इतका जादा खर्च करण्यात आलेला होता. त्यानंतर प्राप्त अनुदान मागणी प्रमाणे योग्य नियोजन करुन मागणी न करता मागविण्यात आल्याने सन 2015-16 अखेर सुध्दा एकूण रुपये 8,47,76,362/- इतका निधी अखर्चीत असल्याचे दिसून आले. प्राप्त अनुदान त्याच वर्षात खर्च न करता अखर्चीत ठेवणे म्हणजेच विभागाचे योजनेवर वेळापत्रक न करताच व्यवहार करणे हे स्पष्ट होते.

2) महाराष्ट्र शासन, शासन निर्णय दिनांक 02/02/2011 अन्वये पुरवठाधारकामार्फत पुरवठा करण्यात येणाऱ्या धान्यादी व इतर साहीत्याचे पुरवठा संदर्भ क्रमांक 7 नुसार नमूद केल्याप्रमाणे प्राथमिक (इयत्ता 1 ली ते 5 वी) व उच्च प्राथमिक (इयत्ता 6 वी ते 8 वी) बाबत प्रती विद्यार्थी प्रती दिन येणाऱ्या खर्चानुसार धान्यादी पुरवठ्याचे देयक अदा करणेबाबत उपरोक्त प्रमाणकांची तपासणी केली असता, पंचायत समितीनिहाय दर्शविलेल्या काही शाळांना आधीचेच धान्यादी माल व इतर साहित्य शिल्लक असल्या कारणाने उचल केल्याचे दिसून आले नाही. शिल्लक साहीत्याबाबत पुरवठा मागणीचे वेळेस याबाबीकडे वेळीच लक्ष दिले असते, तर मागणी ही योग्य स्वरुपात झाली असती. केलेल्या जादा मागणीबाबत व झालेल्या जादा खर्चाबाबत संयुक्तीक खुलासा होणे क्रमप्राप्त आहे.

3) प्राथमिक शिक्षण संचालनालय महाराष्ट्र राज्य, पुणे-1 यांनी शालेय पोषण आहार पुरवठयासंदर्भात व्यवस्थापक, दि महाराष्ट्र स्टेट को-ऑपरेटिव्ह मार्केटिंग फेडरेशन लि., कनमूर हाउस नरसी नाथा स्ट्रीट मुंबई यांचे

सोबत केलेल्या करारनाम्यानुसार सन 2014-15 या वर्षात मंजूर केलेल्या दरांनाच सन 2015-16 चे वित्तीय वर्षात मुदतवाढी देऊन पुरवठ्याबाबतची देयके अदा करण्यात आली. मात्र करारनाम्यातील अट क्र.24 नुसार धान्यादी मालाच्या देयकातील प्रथम 90 टक्के रक्कम प्रयोगशाळेचा तपासणी अहवाल समाधानकारक असल्यानंतरच अदा करतील व जिल्ह्यातील शालेय पोषण आहाराच्या पुरवठयासंदर्भात काही तक्रारी असल्यास उर्वरीत 10 टक्के रक्कम मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे मान्यतेने अदा करण्यात येतील. असे असतांना सरसकट 100 टक्के रक्कमेचे प्रदान उपरोक्त प्रमाणकांन्वये केल्याचे दिसून आले. करारनाम्यातील अटीनुसार प्रदान न केल्याने आलेल्या अडचणी लक्षातच घेण्यात येत नसल्याचे स्पष्ट होते. त्यामुळे योजनेचा उद्देश सफल झाला असे म्हणता येत नाही.

4) करारनाम्यातील अट क्र.27 नुसार देयकातून उद्‌गम कर (Tax Deduction at Source) कपात करुन पुरवठाधारकाचे व्हॅट टिन नं. व इन्कम टॅक्स पॅन नं. नुसार भरणा करणे आवश्यक असतांना तशी कार्यवाही केलेली नाही. त्यामुळे झालेल्या शासन महसुलाचे नुकसानीबाबत परिगणना करुन भरणा करणे आवश्यक आहे.

5) करारनाम्यातील अट क्र.17 नुसार पुरवठा आदेश मिळाल्यापासून जास्तीत जास्त 20 दिवसांमध्ये शालेय कामकाजाचे दिवस धरुन पुरवठा करणे बंधनकारक असतांना माहे डिसेंबर 2015 ते जानेवारी 2016 या महिन्यातील धान्यादी मालाचा पुरवठा करणेबाबत शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, गोंदिया यांचे पुरवठ आदेश क्रमांक 2083/2015, दिनांक 22/12/2015 प्रमाणे देण्यात आला. प्रत्यक्ष पुरवठा हा उपरोक्त अटीप्रमाणे करण्यात आल्याचे दिसून आले नाही. त्यामुळे करारनाम्यातील अट क्र.19 नुसार उशीरा पुरवठा केलेल्या मालाच्या किमतीवर 0.5 टक्के प्रती आठवड्याप्रमाणे दंड, 1 लक्षपेक्षा कमी 10 टक्के याप्रमाणे उशीर झालेल्या पुरवठा मालाच्या किंमतीनुसार दंडाची परिगणना करावी व पुरवठाधारकाकडून वसुली करुन पुर्तता दर्शवावी. तसेच दंडाची आकारणी का करण्यात आली नाही? याबाबत संयुक्तीक अनुपालन सादर करावे.

**3.122 जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील इयत्ता 1 ली मधील विदयार्थ्यांना वर्क बुक पुरवठा करणेबाबत.**

**जिल्हा परिषद चंद्रपूर, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 1) -** सदरबाबत प्रमाणक क्रमांक 569, दिनांक 31/03/2016 अन्वये रक्कम रुपये 9,99,982/- खर्च करण्यात आला आहे. सन 2015-16 या आर्थिक वर्षात जिल्हा निधी योजने अंतर्गत जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील इयत्ता 1 ली मधील विदयार्थ्यांना वर्कबुक पुरविण्याकरीता उपरोक्त प्रमाणकान्वये पारस एन्टरप्रायझेस चंद्रपूर यांना रक्कम रुपये 9,99,982/- चे शोधन केले आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) दिनांक 30/01/2016 च्या जिल्हा स्तरावरील खरेदी समितीच्या बैठकीच्या इतिवृत्तावर समितीचे अध्यक्ष मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, चंद्रपूर यांची स्वाक्षरी नाही.

2) पुरवठादाराकडून प्राप्त ई-निविदेवर उपशिक्षणाधिकारी व शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांच्या स्वाक्ष-या आहेत. परंतु समितीचे अध्यक्ष मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, चंद्रपूर यांची स्वाक्षरी नाही.

3) पुरवठादारांनी ई-निवीदा भरुन तत्संबंधी सर्व प्रमाणपत्रे उपलब्ध करुन दिल्याबाबत सर्व प्रमाणपत्राची प्रत नस्तीस उपलब्ध् नाही.

4) इयत्ता 1 ली च्या विदयार्थ्यांना वर्कबुक पुरविणे बाबतचा प्रस्ताव सर्व गटशिक्षणाधिकारी पंचायत समिती यांचेकडून आलेला दिसून येत नाही. त्यावरुन प्रत्येक पंचायत समिती अंतर्गत 1 ली चे विदयार्थी किती आहेत याबाबतची एकंदर संख्या व खरेदी केलेली वर्कबुकची संख्या यामधील मेळ कसा घेतला व सर्व प्रक्रिया एकाच दिवशी पुर्ण झालेबाबत खुलासा होणे आवश्यक आहे.

5) शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांनी व्यवस्थापक शासकीय मुद्रणालय व ग्रंथागार नागपूर यांना दिनांक 31/03/2016 ला पारस एन्टरप्रायझेस चंद्रपूर यांना देण्यात आलेल्या पुरवठा आदेशानुसार 15 पंचायत समितीला पुरवठा करण्यात आलेल्या वर्कबुक मधून प्रत्येकी एक याप्रमाणे दोन्ही विषयाचे प्रत्येकी 15 याप्रमाणे एकुण 30 वर्कबुक पुरवठा आदेशातील निकषानुसार व नमुन्याचे दर्जानुसार आहेत किंवा नाहीत, याकरीता तपासणी करीता दिले. त्याच तारखेत म्हणजेच दिनांक 31/03/2016 ला व्यवस्थापक शासकीय मुद्रणालय व ग्रंथागार नागपूर यांचे पत्र क्रमांक संकीर्ण/2016, दिनांक 31/03/2016 अन्वये वर्कबुकची तपासणी करुन आदेशातील निकषाप्रमाणे असल्याचे

प्रमाणित केले आहे. यावरुन ही सर्व प्रक्रीया एकाच दिवशी कशी काय शक्य झाली याबाबत खुलासा होणे आवश्यक आहे.

6) भाषा वर्कबुक साठी पारस एन्टरप्रायझेस यांचे दर सर्वात कमी तर गणित वर्कबुक साठी वर्धमान मार्केटिंग यांचे दर सर्वात कमी आहेत. परंतु भाषा व गणित वर्कबुकच्या दराची बेरीज करुन पारस एन्टरप्रायझेस यांचे दर रुपये 60.2 असे कमी असल्याचे दर्शवून दोन्ही प्रकारच्या वर्कबुकचा पुरवठा आदेश पारस एन्टरप्रायझेस यांना देण्यात आला.

7) गणित वर्क बुकचे दर वर्धमान मार्केटिंग यांचे सर्वात कमी असल्याने जर त्यांना गणित वर्क बुकचा पुरवठा आदेश दिला गेला असता तर रुपये 11,627/- रुपये जिल्हा परिषदेचे नुकसान टाळता आले असते.

**3.123 नवरत्न पुरस्कार योजना सन 2015-16 बाबत.**

**जिल्हा परिषद चंद्रपूर, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 4) -** सदरबाबत 2 प्रमाणकान्वये रक्कम रुपये 3,01,609/- खर्च करण्यात आला आहे. स्व. यशवंतराव चव्हाण नाविण्यपूर्ण उपक्रम सन 2015-16 अंतर्गत नवरत्न पुरस्कार योजने साठी जिल्हा निधीत रुपये 7 लक्ष रुपयाची सुधारीत तरतुद करण्यात आली. त्यातील केंद्रस्तर सादील खर्च रुपये 66,500/-, तालुकास्तरावरील रोख रक्कम रुपये 1,35,000/-, तालुकास्तरीय ट्रॉफी रुपये 1,35,000/-, तालुकास्तरीय सादील रुपये 15,000/- असे एकुण रुपये 3,51,500/- असे 15 पंचायत समित्यांना वितरीत करण्यात आले. जिल्हा स्तरावर स्पर्धा आयोजनाकरीता 7 लक्ष - 3,51,500 = 3,48,500/- शिल्लक आहे. सदर जिल्हा स्तरीय नवरत्न स्पर्धा दिनांक 11/03/2016 रोजी कामगार मनोरंजन केंद्र, कलामंदिर उर्जानगर व विदयामंदिर हायस्कूल उर्जानगर येथे प्राथमिक व माध्यमिक या दोन गटात घेण्यात आल्या. या स्पर्धा दरम्यान प्रथम क्रमांक प्राप्त विदयार्थ्याला रुपये 1,000/- व व्दितीय क्रमांक प्राप्त विदयार्थ्याला रुपये 500/- रोख याप्रमाणे दोन गटातील 9 स्पर्धासाठी रुपये 27,000/- रोख बक्षिसा करीता व रुपये 13,000/- इतर किरकोळ खर्चाकरीता असे एकुण रुपये 40,000/- अग्रीम शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांचे नावे देण्यात आले. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे निधी वितरण आदेश क्रमांक 172, दिनांक 06/02/2016 अन्वये रुपये 3,51,500/- तालुकास्तरावर प्रत्येक पंचायत समितीला वितरीत करण्यात आले. परंतु सदर अनुदान संबंधित गटशिक्षणाधिकारी यांना प्राप्त झाल्याबाबतची पोच नस्तीला नाही. तसेच निधी वितरण आदेशात नमुद केल्याप्रमाणे अखर्चित असलेल्या रक्कमेबाबतचा अहवाल अप्राप्त आहे.

2) जिल्हास्तरीय नवरत्न स्पर्धेत सहभागी झालेल्या विदयार्थ्यांची यादी फक्त गटशिक्षणाधिकारी पंचायत समिती सिंदेवाही व चिमूर यांचेकडूनच प्राप्त करुन घेतल्याचे आढळते. उर्वरीत तालुक्यातील किती विद्यार्थी स्पर्धेत सहभागी झाले ते त्याच्या नाव व शाळेच्या नावासह यादी नस्तीला नाही.

3) उपरोक्त प्रमाणे प्रमाणक क्रमांक 47, दिनांक 10/03/2016 अन्वये रुपये 40,000/- शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांना अग्रीम देण्यात आले. परंतु, अग्रीमाचे समायोजना प्रित्यर्थ्य रुपये 40,000/- च्या खर्चाबाबतची पावती, उपप्रमाणके सदर प्रमाणकासोबत लावणे आवश्यक आहे.

4) शिल्लक अखर्चित निधी परत केल्याबात नस्तीत नमुद नाही.

5) रेणुका कार्ड कलेक्शन यांचेकडून त्यांचे उपप्रमाणक क्रमांक 1285, दिनांक 11/03/2016 अन्वये प्रमाणपत्र छपाई वर रुपये 1,000/- खर्च केले, परंतु सदर प्रमाणत्राची झेरॉक्स प्रत नस्तीला नाही.

6) वैभवी कॅटरर्स यांना रुपये 90/- प्रती प्लेट प्रमाणे 540 प्लेट चे रुपये 48,600/- शोधन करण्यात आले. परंतु 540 प्लेट मध्ये कोणत्या शाळेच्या किती विदयार्थी/शिक्षक यांचा जेवणासाठी समावेश होता. याबाबत अहवाल नाही.

7) सांची डिजीटल स्टुडिओ चंद्रपूर यांचे उपप्रमाणक क्रमांक 761 दिनांक 11/03/2016 अन्वये 30/- रुपये प्रती फोटो कॉपी याप्रमाणे 80 नग फोटो चे रुपये 2,400/- चे व व्हिडीओ शुटिंग एक दिवसाचे रुपये 5,500/- चे शोधन केले आहे. परंतु बाजारभावाप्रमाणे 4*6 साईजच्या एका फोटो कॉपी ची किंतम अंदाजित रुपये 15/- आहे

त्यामुळे रुपये 1,200/- चे फोटो साठी अतिप्रदान झाले. तर व्हिडीओ शुटिंग साठी एका दिवसाची अंदाजित किंमत रुपये 3,000/- आहे, त्यामुळे व्हिडिओ शुटिंग वर रुपये 2,500/- अतिप्रदान झालेले आहे.

8) रेणूका कार्ड कलेक्शन चंद्रपूर यांचे उपप्रमाणक क्रमांक 1286, दिनांक 12/03/2016 अन्वये रुपये 2,184/- खर्च स्टेशनरी वर तर उपप्रमाणक क्रमांक 1314, दिनांक 14/03/2016 अन्वये रुपये 15,675/- केंद्रस्तर / तालुकास्तर नवरत्न स्पर्धा प्रमाणपत्र छपाईवर केलेला आहे. जिल्हास्तरीय नवरत्न स्पर्धा दिनांक 11/03/2016 ला च संपन्न झाल्याने रेणूका कार्ड कलेक्शन चा स्टेशनरी वरील व प्रमाणपत्र छपाई वरील खर्च रुपये 2,184 + 15,675 = रुपये 17,859/- स्पर्धा संपल्या नंतरच्या तारखे नंतर चा असल्याने संबंधिताकडून वसुलपात्र ठरतो.

9) जिल्हा स्तरीय नवरत्न स्पर्धेकरीता फाले डेकोरेशन कोंढी, रमेश व्ही फाले डेकोरेशन उर्जानगर, स्वागत डेकोरेशन चंद्रपूर या तीन डेकोरेशन धारकांकडून दरपत्रके मागवून रमेश व्ही फाले यांचे दरपत्रकातील दर सर्वात कमी असल्याचे दर्शवून त्यांना पुरवठा आदेश देण्यात आला, व त्यांचे उपप्रमाणक क्रमांक 21, दिनांक 11/03/2016 अन्वये रुपये 50,000/- चे शोधन संबंधितास करण्यात आले. परंतु वरील तीन पुरवठादाराकडून प्राप्त दरपत्रकाचे अवलोकन केले असता त्यावरील छापील मॅटर वरुन तीनही दरपत्रके एकाच पुरवठादाराने वेगवेगळया नावाने सादर केल्याचे नाकारता येत नाही. तसेच प्राप्त दरपत्रकावरील लिफाफे वर कार्यालयाचा आवक क्रमांक व दिनांक नमुद नाही, यावरुन सदर दरपत्रके कार्यालयाला डाकेतून प्राप्त झाल्याचे दिसून येत नाही. तसेच लिफाफे उघडणा-या अधिका-यांची सही ही दिनांकीत नाही. त्यामुळे सदर लिफाफे कोणत्या दिनाकांस उघडल्या गेलीत याची खात्री करता येत नाही. त्यामुळे सदर रक्कम रुपये 50,000/- आक्षेपाधीन ठेवण्यात येत आहे.

10) त्याचप्रमाणे व्हिडीओ चित्रीकरण व फोटो करीता तीन पुरवठादाराकडून दरपत्रके मागविण्यात आले, परंतु प्राप्त दरपत्रकावरील लिफाफयावर कार्यालयाचा आवक क्रमांक / दिनांक नाही, तसेच लिफाफे उघडणा-या अधिका-याची स्वाक्षरी दिनांकीत नाही.

11) प्रमाणपत्र प्रिंटींग, डिझाईन व छपाई तसेच मोमेंट प्रथम व व्दितीय क्रमांकासाठी तीन पुरवठादाराकडून दरपत्रके मागविली परंतु प्राप्त दरपत्रकावरील लिफाफयावर कार्यालयाचा आवक क्रमांक/दिनांक नाही, तसेच लिफाफे उघडणा-या अधिका-याची स्वाक्षरी दिनांकीत नाही.

वैभवी कॅटरर्स चंद्रपूर यांना त्यांचे उपप्रमाणक क्रमांक 16, दिनांक 11/03/2016 अन्वये रुपये 48,600/- चे शोधन केले, परंतु याबाबत ईतर कॅटरर्स यांचेकडून दरपत्रके न मागविता वैभवी कॅटरर्स यांना नियमबाहयरित्या पुरवठा आदेश दिल्या बाबत खुलासा करण्यात यावा.

**3.124 शालेय पोषण आहार वर्ग 1 ते 5 व 6 ते 8 योजनेतील अनियमितता.**

**जिल्हा परिषद गडचिरोली, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 2 व 3) -** शालेय पोषण आहार योजना सन 2015-16 अंतर्गत वर्ग 1 ते 5 करीता धान्यादी साहित्याचे शाळास्तरावर वाटप योजना शिक्षण विभाग (प्राथमिक) जिल्हा परिषद गडचिरोली कडून राबविण्यात आली असून रक्कम रुपये 1,35,62,088/- + 1,19,50,840/- = रुपये 2,55,12,928/- खर्च नोंदविला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 20 व 21 नुसार सन 2015-16 मध्ये अदा केलेल्या रक्कमाबाबत पुरवठादाराच्या मुद्रांक पावत्या आढळून आल्या नाही.

2) शासन निर्णय क्रमांक शापोआ 2004/246(04)/प्राशि-4, दिनांक 31/03/2005 परिच्छेद 4 नुसार सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार शालेय पोषण आहाराची प्रभावी अंमलबजावणी होण्याचे दृष्टिने जिल्हास्तरीय समिती व तालुका स्तरीय समिती, जिल्हाधिकारी व तहसिलदार यांचे अध्यक्षतेखाली गठीत करून जिल्हास्तरीय समितीच्या वर्षातून किमान तीन बैठका घेणे आवश्यक आहे व तालुका स्तरीय समितीच्या दरमहा सभा घेणे आवश्यक आहे. परंतु सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार सुद्धा समिती गठीत करुन सभा झाल्याचे आढळून आले नाही.

शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, शासन निर्णय क्रमांक शापोआ 2009/प्र.क्र.207/प्राशि-4, दिनांक 01/06/2009 नुसार शालेय पोषण आहार योजनेची प्रभावी अंमलबजावणी करीता मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे नियंत्रणाखाली भरारी पथकाची स्थापना करणेबाबत सूचना आहे. शिक्षण विभागाने भरारी पथकाची स्थापना केलेली

आहे असे उत्तर दिले. परंतु भरारी पथकातील सदस्यांची सूची (यादी) व आदेशाची प्रत लेखापरिक्षणास उपलब्ध झाली नाही. शासन निर्णय दिनांक 01/06/2009 परि. 5 नुसार भरारी पथकानी दरमहा 10 शाळांची तपासणी पथकामार्फत करावयाची असून अहवाल विहित नमूना परिशिष्ट “अ” व “ब” मध्ये सादर करावयाचा आहे. परंतु सन 2015-16 मध्ये केलेल्या कार्यवाहीचा अहवाल लेखापरिक्षणास उपलब्ध झाला नाही.

3) शासन परिपत्रक क्रमांक शापोआ 2009/प्र.क्र.383/प्राशि-4, दिनांक 26/02/2010 क-2 तालुकास्तर नुसार तालुका स्तरावरुन गटशिक्षणाधिकारी यांनी दिलेला पुरवठा आदेशाला शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांची पुर्वसूचना घेणे आवश्याक आहे व अशा पूरवठा आदेशाची प्रत शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांचेकडे पाठविणे आवश्यक आहे. सन 2015-16 मध्ये तालुका स्तरावरुन शालेय पोषण आहार योजने अंतर्गत धान्यादी साहित्य मागणी करीता दिलेल्या पुरवठा आदेशाच्या प्रती शिक्षण विभाग (प्राथमिक) कडे उपलब्ध नाही. पुरवठा आदेशाच्या प्रती लेखापरिक्षणास उपलब्ध झाल्या नाही व आदेश देण्यापूर्वी मान्यता घेतल्याचे आढळून आले नाही. धान्यादी साहित्याची शाळेची मागणी किती होती, मागणी नुसार किती साहित्य पुरवठा शाळेला झाला, पुरवठा विहित मुदतीत झाला किंवा नाही, किती विलंबाने झाला याबाबत खात्री करता आली नाही. पुवरठा आदेशाच्या प्रती शिक्षण विभागाकडे उपलब्ध नसतांना सुद्धा पुरवठादाराची देयके अदा केल्याचे दिसून येते.

4) शालेय पोषण आहार योजना सन 2015-16 वर्ग 1 ते 5 पोचपावतीवर स्वाक्षरी नसतांना व शाळेला मान्यता नसतांना रक्कम अदा केलेली आहे.

5) वर्ग 1 ते 5 धान्यादी मालाचा पुरवठा फेब्रुवारी ते मार्च 2016 या कालावधीत शिक्षणाधिकारी, पंचायत समिती मुलचेरा अंतर्गत पुरवठा पोच पावती नुसार संकलीत शाळांना कमी पुरवठा झाला. विवरणपत्रात संबंधीत शाळेसमोर गोल केले. परंतु प्रत्यक्ष बिल अदा करता कमी प्राप्त मालाची मात्रा (संख्या) कमी केली नाही. त्यामुळे रक्कम रुपये 3,927/- जादा प्रदान झाले.

6) शासन निर्णय क्रमांक शापोआ 2010/प्र.क्र.18/प्राशि-4, दिनांक 02/02/2011 परि. 5 नुसार ग्रामीण भागातील अन्न शिजवणाऱ्या यंत्रणांनी आठवड्यातून किमाल एक दिवस पुरक आहार नियमित आहाराव्यतिरिक्त सदर पूरक आहार अतिरिक्त मोफत देणे गरजेचे आहे. परंतु तसे केल्याचे आढळून आले नाही.

7) शासन निर्णय क्रमांक शापोआ 2010/प्र.क्र.18/प्राशि-4, दिनांक 02/02/2011 शालेय पोषण आहार योजनेच्या अंमलबजावणीमध्ये केंद्र शासनाचा हिस्सा आणि राज्य शासनाचा हिस्सा यामधील खर्चाचे प्रमाणे 75:25 असे राहील. असे नमूद आहे. सन 2015-16 मध्ये वर्ग 1 ते 5 धान्यादी पुरवठा शालेय पोषण आहारावर रक्कम रुपये 3,08,33,379/- खर्च झालेला 75:25 प्रमाणे केंद्र / राज्य हिस्सा अनुक्रमे 23125034 : 7708344 खर्च होणे अपेक्षीत होते. परंतु प्रत्यक्षात खर्च 2225186 : 8581511 म्हणजे 72:28 या प्रमाणात झालेला आहे. यावरुन गुणोत्तर प्रमाण पाळलेले नाही. शिक्षण संचालक महाराष्ट्र राज्य, पूणे यांचे पत्र क्रमांक शापोआ/अनुदान/प्राशिस 301/2015-16 2134, दिनांक 31/03/2016 लेखाशिर्षा अंतर्गत एका बाबीवरील तरतूद दुसऱ्या बाबीवर वापरता येईल. परंतु येथे केंद्र हिस्स्याची तरतूद रक्कम रूपये 873167/- राज्य हिस्यात वापरली आहे. तरी अनुदान प्राप्त करुन भरपाई करावी.

8) सदर योजनेचे उपयोगिता प्रमाणपत्र पंचायत समितीकडून प्राप्त केल्याचे आढळून आले नाही. तसेच शालेय पोषण आहार अंतर्गत मुलांना भोजन दिल्यामुळे त्यांचे उंची / वजनामध्ये (शरिरयष्टी), बौद्धिक क्षमतेत व शाळेतील उपस्थितीवर काय परिणाम झाला याचे सकारात्मक फायदे काय झाले याचा फलश्रुती अहवाल प्राप्त केल्याचे आढळून आले नाही. अर्धसमास पत्र क्रमांक 5, दिनांक 21/06/2017 नुसार AWP व नमुना अ, ब, क, ड अहवाल संचालक कार्यालयास अहवाल सादर केला जातो असे मोघम उत्तर दिलेले आहे. परंतु अहवालाची प्रत लेखापरिक्षणास सादर केली नाही.

9) करारनामा दिनांक 11/06/2014 अट क्रमांक 35 नुसार निविदा प्रक्रियेमधे सादर करण्यात आलेले धान्यादी मालाची नमुने ज्या दर्जाचे होते त्याच दर्जाचा मालाचा पुरवठा करणे बंधनकारक आहे. परंतु राज्यस्तरावर निविदेच्या वेळी सादर केलेले नमुने जिल्हा / तालुका स्तरावर नसल्यामुळे मालाच्या बाबतीत अशा तक्रारी येतात. श्री घोडेस्वार प्रा.शि. इंदाळा तिखट निम्न दर्जाचे असल्यामुळे तक्रार होती. तिखटपणा कमी असतो त्यामुळे जास्त मात्रा

(quantity) वापरावी लागते व भाजीचा रंग काळा येणेबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी यांची टिपणी पृष्ठा क्र. 12, 13, 14 वर अभिप्राय नमुद करुन 1 नमुना जिल्हा स्तरावर ठेवावा, Lab कडून तिखट नमूना अहवाल प्राप्त करणेस्तव सूचना केलेली आहे. पत्र क्रमांक 1913, दिनांक 07/11/2015 अन्वये नमुना तपासणीस पाठवला आहे. परंतु रिपोर्ट अप्राप्त आहे. तसेच माहे एप्रिल ते जून 2015 या कालावधीत जिल्हा परिषद, शाळा गणेशपूर, जिल्हा परिषद शाळा, भवानीपूर, प्राथमिक शाळा इंदाळा (ऑक्टोबर 2015) या शाळांना झालेला कांदा, लसून, मसाला मुदतबाह्य तिखट पावडर मधे गुठळ्या, सोयाबीन तेल मुदतबाह्य (Expiry Date) जवळची असलेले (8/2015) पुरविणे आढळून आले. तसेच जिल्हा परिषद प्राथमिक शाळा आलापल्ली यांचे 4 ते 5 किलो तांदूळ कमी पुरवठा, तूर डाळी मधे लाखोळीची डाळ आढळून येणे इत्यादी शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद, गडचिरोली यांचे पत्र क्रमांक 1099, दिनांक 13/07/2015 व पत्र क्रमांक 1217, दिनांक 27/07/2015 अन्वये पुरवठा दाराला माल बदलून देणेबाबत पत्र दिलेले आहे. परंतु सदर तक्रारीचा निपटारा झाल्याचे आढळून आले नाही. तरी करारनाम्यातील अट क्रमांक 32 नुसार पुरवठादारा विरुद्ध कार्यवाही करणे अपेक्षीत आहे.

### 3.125 कृतिशिल अध्ययन पद्धती उपक्रम राबविणे मधील अनियमितता.

**जिल्हा परिषद गडचिरोली, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 8) -** विदर्भ विकास मंडळ विशेष निधी सन 2014-15 मधे कृतिशील अध्ययन पद्धत या उपक्रमा अंतर्गत जिल्हा परिषद शाळामधे उपक्रम राबविणे, शिक्षक, मुख्याध्यापक, केंद्रप्रमुख व गटशिक्षणाधिकारी यांना प्रशिक्षण देणे, 15 शाळांना साहित्य पुरवठा करणेस्तव रक्कम रुपये 14,50,000/- ची तरतुद जिल्हाधिकारी, गडचिरोली यांचे प्रशासकीय मान्यता व निधी वितरण आदेश क्रमांक कक्ष-4/नियोजन/सोर्स-1/विवि 14-15/17, दिनांक 30/02/2015 अन्वये लेखाशिर्ष 4515-इतर ग्राम विकास कार्यक्रमा वरील भांडवली खर्च, 01-वैधानिक विकास मंडळ क्षेत्राअंतर्गत विकास कार्यक्रम, 27-लहान बांधकामे (45150039) योजना अंतर्गत दत्तमत खर्च प्राप्त झाली असून सदर तरतुद प्रमाणक क्रमांक 15, दिनांक 31/03/2015 अन्वये कोषागारातून काढलेली आहे. सदर योजनेस मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, गडचिरोली यांचे पत्र क्रमांक 987, दिनांक 01/08/2015 अन्वये तांत्रिक मंजूरी दिलेली आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) कृतीशील अध्ययन पद्धती अंतर्गत साहित्य पुरवठा बाबत 15 शाळेकडून मागणीपत्र नस्तीला आढळून आले नाही.

2) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, गडचिरोली जावक क्रमांक सशिअ/ABL/325, दिनांक 30/03/2015 कृती आराखडा 2(2) नुसार शिक्षक प्रशिक्षण व मार्गदर्शक पुस्तिका छपाई वर रुपये 1,68,155/- तरतुद आहे. प्रति शाळा रुपये 5,500/- प्रमाणे 15 करीता रुपये 82,500/- प्रशिक्षा व उर्वरीत रक्कम रुपये 85,655/- मार्गदर्शक पुस्तके छपाई करीता आहे. प्रमाणक क्रमांक 2512, दिनांक 31/03/2016 अन्वये 8 व दिनांक 09/10/2015 या कालावधीसाठी निवड केलेल्या 15 शाळेतील मुख्याध्यापक, शिक्षक, केंद्रप्रमुख, विस्तार अधिकारी प्रति शाळा 5,500/- प्रमाणे रुपये 82,500/- खर्च केलेला आहे. पुन्हा प्रमाणक क्रमांक 2513, दिनांक 31/03/2016 अन्वये दिनांक 14 व 15/12/2015 प्रशिक्षण दिलेले आहे. त्यावरील खर्च रक्कम रुपये 82,500/- आहे. मार्गदर्शक पुस्तके छपाई न करता पुन्हा त्याच शाळेतील त्याच शिक्षकांना तेच प्रशिक्षण देऊन उचल केलेली रक्कम रुपये 82,500/- आक्षेपाधीन ठेवण्यात येते.

3) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 146 नुसार कराराने द्यावयाच्या प्रत्येक कामाचे करारपत्र स्टँप पेपरवर करणे आवश्यक आहे. परंतु करारनामा केल्याचे आढळून आले नाही. मुंबई मुद्रांक अधिनियम 1958 कलम 34 चे परिशिष्टा 1 अनुच्छेद 63 नुसार कार्यवाही न झाल्यामुळे 500 चे शासानाचे नुकसान झालेले आहे.

4) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 20 व 21 नुसार पुरवठादाराची पोचपावती आढळून आली नाही.

5) कपात केलेली 5 टक्के सुरक्षा ठेव रक्कम रुपये 64,094/- जिल्हा निधीत जमा न करता शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांचे SBI A/c No. 11267741217 मधे ठेवलेली आहे. तरी सदर रक्कम जिल्हा निधीत जमा करण्यात यावी.

6) कृतिशील अध्यायन पद्धती उपक्रम राबविल्यामुळे 15 शाळेतील विद्यार्थ्यांना याचा काय फायदा झाला त्याच्या मध्ये कोणता बदल झाला याबाबतचा फलश्रुती अहवाल नस्तीला आढळून आला नाही.

**3.126 शालेय पोषण आहार योजनेबाबत.**

**जिल्हा परिषद औरंगाबाद, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 2) -** सदरबाबत रक्कम रूपये 8,35,15,532/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे व विभागीय व्यवस्थापक महाराष्ट्र स्टेट को-ऑप.कन्झुमर्स फेडरेशन लि., मुंबई यांच्या दिनांक 11/06/2014 च्या करारनाम्यातील अट क्रमांक 03(अ) नुसार ग्रामीण भागातील शाळांसाठी आवश्यक धान्यादी माल/साहित्य यांची शाळानिहाय मागणी केंद्रप्रमुख गट शिक्षणाधिकाऱ्याकडे / अधिक्षक (शालेय पोषण आहार) यांचेकडे करतील. तालुक्याची शाळानिहाय मागणी गट शिक्षणाधिकारी / अधिक्षक (शालेय पोषण आहार) हे शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांचेकडे सादर करतील. शिक्षणाधिकारी मागणीनुसार पुरवठा आदेश पुरवठादारास देतील. या आदेशात संपूर्ण जिल्ह्याची शाळानिहाय मागणी दर्शविलेली असेल. तथापि, करारनाम्यातील सदर अटीचे पालन झालेले नाही. गट शिक्षणाधिकारी / अधिक्षक (शालेय पोषण आहार) यांनीच मागणीनुसार पुरवठादारास पुरवठा आदेश दिले आहेत.

2) सर्व शिक्षा अभियान या योजनेतर्गत प्रकल्प स्तरावर साधन व्यक्तींची (विषय तज्ञ) पदे निर्माण करण्यात आली आहेत. तालुकास्तरीय अधिक्षक आणि साधन व्यक्ती यांनी तालुक्यातील शाळांमध्ये वेळोवेळी तपासणी करणे, आहाराचा दर्जा व गुणवत्ता यावर नियंत्रण ठेवणेबाबत शासन निर्देश असतांना सन 2015-2016 मध्ये या निर्देशानुसार कार्यवाही केलेली दिसून येत नाही.

3) शालेय शिक्षण विभाग, शासन पत्र दिनांक 26/06/2013 नुसार अन्न शिजविणाऱ्या यंत्रणांच्या स्वयंपाकी /मदतनीस यांची सहा महिन्यातून एकदा वैद्यकीय तपासणी करणे आवश्यक असतांना अशा तपासण्या केल्याबाबतचे अभिलेखे लेखापरीक्षणास अत्यल्प निदर्शनास आले. काही प्राथमिक शाळेच्या अभिलेखे तपासणीत वैद्यकीय प्रमाणपत्र वर्षातून एकदाच घेतल्याचे निदर्शनास आले.

4) शिक्षण संचालक (प्राथमिक) यांचे पत्र दिनांक 13/08/2013 नुसार शिक्षणाधिकारी, गट शिक्षणाधिकारी, अधिक्षक (शालेय पोषण आहार) विस्तार अधिकारी इत्यादी क्षेत्रीय अधिकाऱ्यांनी प्रत्येक तिमाहीत आपल्या क्षेत्रातील किमान 25 टक्के शाळांची शालेय पोषण आहाराबाबत तपासणी करणे आवश्यक आहे. तथापि, याप्रमाणे तपासण्या केलेल्या दिसून येत नाही. तसेच शिक्षण संचालक (प्राथमिक) यांचे पत्र दिनांक 27/08/2013 नुसार आहाराचा दर्जा चांगला असलेची खात्री करणे कामी नियमित, अचानक व भरारी पथकांमार्फत भेटी देणे आवश्यक आहे. परंतु, अशा अचानक व भरारी पथकांमार्फत भेटी दिल्याचे दिसून येत नाही.

5) शिक्षण संचालक (प्राथमिक) व विभागीय व्यवस्थापक महाराष्ट्र स्टेट को-ऑप.कन्झुमर्स फेडरेशन लि., मुंबई यांच्या करारनाम्यातील अट क्रमांक 07 अन्वये शाळेच्या मागणीपत्रानुसार आवश्यक तेवढाच मालाचा पुरवठा करणे आवश्यक असतांना शाळांना कमी/जास्त प्रमाणात पुरवठा केल्याचे दिसून येते.

6) करारनाम्यातील अट क्रमांक 21 (ब) नुसार ग्रामीण भागात पुरवठा केलेल्या मालाची जिल्हास्तरीय/ तालुकास्तरीय अधिकाऱ्याकडून तपासणी करणे आवश्यक असतांना पुरवठा केलेल्या मालाची तपासणी केल्याचे दिसून येत नाही.

7) करारनाम्यातील अट क्रमांक 37 नुसार पुरवठादाराने प्रत्येक जिल्ह्यात शालेय पोषण आहार योजनेचे धान्य ज्या गोदामांमध्ये ठेवले आहे, अशा गोदामांना शिक्षणाधिकारी यांनी किमान तीन महिन्यांतून एकदा भेट देऊन तपासणी करणे आवश्यक असतांना अशा तपासण्या केलेल्या दिसून येत नाही.

8) करारनाम्यातील अट क्रमांक 17 नुसार धान्यादी मालाचे पुरवठा आदेश मिळाल्यापासून 05 दिवसांमध्ये पुरवठा सुरु करणे व जास्तीत जास्त 20 दिवसांमध्ये (शालेय कामकाजाचे दिवस गृहीत धरून) संपूर्ण धान्यादी मालाचा पुरवठा करणे पुरवठादारास बंधनकारक आहे. तथापि, बहुतेक मुख्याध्यापकांनी पावत्यांवर साहित्य प्राप्त झाल्याबाबत वेळ व दिनांक नमूद केलेला नाही. त्यामुळे विहित कालावधीत धान्यादी माल प्राप्त झाल्याची खात्री होऊ शकली नाही.

**3.127 शालेय पोषण आहार योजनेअंतर्गत धान्यादी मालाचे देयक अदा करणेतील अनियमिततेबाबत.**

**जिल्हा परिषद जालना, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 4) -** सदरबाबत रक्कम रूपये 6,74,18,045/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) धान्यादी मालाचे पुरवठादार मे. महाराष्ट्र स्टेट को. ऑप. कन्झूमर्स फेडरेशन यांचे सोबत करारनामा झाला असून (दिनांक 10/06/2014) करारनाम्यांतील अट क्रमांक 3 (अ) नुसार धान्यादी मालाचे पुरवठा आदेश हे जिल्हास्तरावरुन घ्यावयाचे असतांना ते गट शिक्षण अधिकारी कार्यालयातून दिले जातात.

2) शिक्षण व क्रिडा विभाग, शासन निर्णय क्रमांक 2010/प्र.क्रमांक 18/ प्राशि-04, दिनांक 02/02/2011 मध्ये पाककृती निश्चित करण्यात आली.

1. पाककृती क्रमांक 1 : डाळ तांदळाची खिचडी / मसालेभात / पुलाव
2. पाककृती क्रमांक 2 : भात आणि कडधान्याची उसळ, भाजी आमटी
3. पाककृती क्रमांक 3 : वरणभात / सांबर भात / आमटी भात
4. पाककृती क्रमांक 4 : गोड भात

दिनांक 20/04/2011 रोजी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, जालना यांचे अध्यक्षतेखाली सर्व तालुक्यातील पोषण आहार अधिक्षक यांची बैठक होऊन अनुक्रमांक 4 पाककृती क्रमांक 4 गोड भात विदयार्थी चवीने खात नसल्यामुळे पाककृती क्रमांक 1 ते 3 यास मान्यता देण्यात आली.

पाककृती क्रमांक 1 : सोमवार व गुरुवार

पाककृती क्रमांक 2 : मंगळवार व शुक्रवार

पाककृती क्रमांक 3 : बुधवार व शनिवार

असा मेनू निवडण्यात आला. या निवड मेनूसाठी पुरवठादारने पुरवठा केलेल्या अन्नधान्यापासून तयार केलेल्या पाककृतीतून इयत्ता 1 ली ते 5 वी साठी 450 ग्रॅम उष्मांक व 12 ग्रॅम प्रथिने व इयत्ता 6 वी ते 8 वी साठी 700 ग्रॅम उष्माक व 20 ग्रॅम प्रथिने मिळून विद्यार्थ्यांचे कुषोषण होणार नाही. याबाबत विभागाने सनियंत्रण करुन दक्षता बाळगावी.

3) करारनाम्यातील अट क्रमांक 21(अ) पुरवठादाराने मालाचा पुरवठा केल्यानंतर त्यांचे तालुका निहाय नमुने प्रथम प्रयोग शाळेकडून पाठवून अहवाल प्राप्त झाल्यावरच देयके अदा करण्यात येईल. परंतू, अटीचे पालन झाले असल्याचे दिसून येत नाही.

4) तालुकेनिहाय केंद्रनिहाय व एकत्रित 1 ते 5 व 6 ते 8 वर्गाची पटसंख्या किती आहे? याबाबत खात्री करता आली नाही. त्यामुळे केलेली मागणी व पुरवठा बरोबर असलेबाबत लेखापरीक्षणांस खात्री करता आली नाही. तसेच प्रति दिन प्रति लाभार्थी आहार खर्च मर्यादेचे पालन झाले असल्याची खात्री करता आली नाही.

5) करारनामा अट क्रमांक (17) धान्यादी मालाचे पुरवठा आदेश मिळाल्यापासून जास्तीत जास्त (05) दिवसामध्ये पुरवठा सुरु करावा लागेल व जास्तीत जास्त 20 दिवसामध्ये (शालेय कामकाजाचे दिवस गृहीत धरुन) संपूरण पुरवठा करणे पुरवठादारास बंधनकारक राहील. परंतू, पुरवठादाराने ज्या ज्या संस्थेस धान्यादी मालाचा पुरवठा करण्यात आला आहे. त्या त्या संस्थेच्या साठा नोंदवहया किंवा प्रमाणपत्र संचिकेत आढळून आले नाही. त्यामुळे धान्यादी माल पोंहच अटी व शर्ती प्रमाणेच झाल्याची खात्री करता येत नाही.

6) अटी व शर्ती नुसार विहीत मुदतीत पुरवठा न केल्यास उशिरा पुरवठा केलेल्या मालाच्या किंमतीवर 0.5% (अर्धा टक्का) प्रती आठवडा प्रमाणे दंड आकाराला जाईल.

7) महाराष्ट्र शासन, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, शासन निर्णय क्रमांक शापोआ.2001/प्र.क्रमांक 207/ प्रा.शि.प., दिनांक 01/06/2009 अन्वये शालेय पोषण आहार योजनेची प्रभावी अंमलबजावणी करणेसाठी भरारी पथके आणि दक्षता पथके स्थापन करणेबाबत आदेशित असतांना विभागाने कार्यवाही केली नाही. तसे अहवाल संचिकेत आढळून आले नाही. तसेच आहाराचा दर्जा व गुणवत्ता तपासलेबाबतचे अभिलेखे संचिकेत नाही. सदर शासन निर्णयानुसार प्रत्येक जिल्हयामध्ये दरमहा किमान 10 शाळांची भरारी पथकामार्फत तपासणी करण्यात यावी. तथापि, अशा प्रकारची कुठलीही कार्यवाही झाली नसल्याचे उपलब्ध करुन दिलेल्या अभिलेख्यावरुन आढळून आले आहे. त्यामुळे योजना राबवितांना गैरव्यवहार होत असल्यास तो निदर्शनास येऊ शकत नाही.

8) शाळेत देण्यात येणाऱ्या सकस व पौष्टीक आहारातून योजनेची उद्दिष्टपूर्ती, पटनोंदणी व उपस्थितीत वाढ होणे इत्यादी बाबीचे मुल्यमापन अहवाल संचिकेत आढळून आले नाही.

**3.128 मंजूर पदापेक्षा जादा पदे भरून केलेला अनियमिततेबाबत.**

**जिल्हा परिषद जालना, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 10) -** सदरबाबत रक्कम रूपये 93,39,930/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

शिक्षण विभाग, जिल्हा परिषद (प्राथामिक) यांचे आस्थापनेवर सन 2015-2016 या वित्तीय वर्षामध्ये एकूण 54 पदे कार्यरत आहेत. शासन निर्णय क्रमांक एपीटी-1001/प्र.क्रमांक 960/आस्था-8, दिनांक 27/06/2003 अन्वये 15 पदे शिक्षण विभाग (प्राथामिक) यांना मंजूर आहेत. परंतू, प्रत्यक्षात मंजूर पदापेक्षा शिक्षण विभाग (प्राथामिक), जिल्हा परिषद, जालना यांचे कार्यालयात व शिक्षण सहाय्यक 9, कनिष्ठ सहाय्यक 14, व 1 लघुलेखक असे एकूण 24 कार्यालयीन आस्थापनावर सन 2015-2016 मध्ये रूपये 93,39,930/- एवढा खर्च झालेला आहे. ज्या पदांना शासनाची मान्यता नाही. अशा पदावर शासन अनुदानातून वेतन व भत्यावर खर्च करता येत नाही. त्यामुळे या अतिरिक्त जादा पदाची रक्कम शासन अनुदानास अंतिम अमान्य करण्यात येत आहे. आहरण व संवितरण अधिकारी यांनी मंजूर पदापेक्षा जास्तीच्या पदाचे वेतन आहरीत केले आहे. या गंभीर अनियमिततेबाबत दर वर्षी लेखापरीक्षणात परिच्छेद नोंदविण्यात आलेले आहेत. या बाबीकडे दुर्लक्ष केल्याचे दिसून येते.

**3.129 शिक्षकांचे वेतन आहारीत करणेतील अनियमितता.**

**जिल्हा परिषद बीड, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 4) -** शिक्षण विभाग, जिल्हा परिषद बीड मधील तालुका गटशिक्षण कार्यालय शिक्षकांचे वेतन देण्यासाठी अनुदान रक्कम रूपये 4,39,69,668/- वितरीत केले आहे.

शिक्षण विभाग, जिल्हा परिषद बीडचे तालुका स्तरावरील गटशिक्षण कार्यालय यांचेकडून अतिरिक्त शिक्षकांचे वेतन आहारीत करणेबाबत नियमबाहय कार्यवाही झालेली आहे. याबाबत कार्यालयाचे सन 2014-2015 चे पंचायत समिती अहवालात आक्षेप नोंदविण्यात आले होते. उदा.अंबाजोगाई परिच्छेद क्रमांक 07, गेवराई परिच्छेद क्रमांक 18, बीड परिच्छेद क्रमांक 07, परळी परिच्छेद क्रमांक 13., याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) शिक्षण विभाग, जिल्हा परिषद बीड यांनी अर्धसमासपत्र क्रमांक 2, दिनांक 16/06/2017, 3, दिनांक 16/06/2017, 6, दिनांक 21/06/2017, 7, दिनांक 22/06/2017 अन्वये मागणी करूनही मंजूर पदाची सूची लेखापरीक्षणास उपलब्ध करून दिली नाही. तसेच शाळानिहाय मान्य शिक्षकांची संख्या, अतिरिक्त शिक्षकांची संख्या, शालार्थ प्रणालीवरून किती अतिरिक्त शिक्षकांचे वेतन आहारीत केले व कोणत्या कालावधीचे वेतन आहारीत केले? याबाबतची सविस्तर तपशील उपलब्ध करून दिला नाही.

2) सर्व अतिरिक्त शिक्षकांच्या समयोजनाची माहिती उपलब्ध न झाल्यामुळे सदरील तालुका स्तरावरील वेतन देयक नियमाप्रमाणे आहारीत झालेची खात्री करता आली नाही. महाराष्ट्र शासन, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, संकिर्ण 2412/(81-अ/12)/अर्थसंकल्प, दिनांक 14/07/2014 रोजीच्या परिपत्रकात अतिरिक्त शिक्षकांच्या समायोजनाबाबत अटी विषद केलेल्या आहेत. त्यातील मुद्दा क्रमांक 6 नुसार संच मान्यते नुसार मान्य असलेल्या पदांपेक्षा जादा कार्यरत असलेल्या अतिरिक्त कर्मचार्यांचे वेतन सुयोग्य मान्यतेखेरीज करण्याबाबत आदेशीत केलेले आहे. असे निर्देश असताना सर्व तालुका स्तरावरील गटशिक्षणाधिकारी यांनी दिनांक 30/10/2014 नंतर ठरलेल्या

अतिरिक्त शिक्षकांचे समायोजन केल्याचे दिसून आले नाही. त्यामुळे 30 सप्टेंबर नंतर समायोजन दिनांकापर्यंत अतिरिक्त शिक्षकाचे वेतन वासुलपत्र ठरते. माहे जून 2016 अखेर 781 शिक्षक अतिरिक्त आहेत.

3) महाराष्ट्र शासन, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन परिपत्रक क्रमांक संकीर्ण 2412/81-39/12 अर्थसंकल्प, दिनांक 14/07/2014 मधील बाब क्रमांक 6 अन्वये संच मान्यता पदापेक्षा जादा कार्यरत असलेल्या अतिरिक्त कर्मचार्याचे वेतन online अथवा offline पध्दतीने अदा केले जाणार नाही, याची दक्षता घ्यावयाची आहे. अतिरिक्त शिक्षकांचे वेतन अन्य केंद्राकडून आहारीत केले आहे.

4) लेखा संहिता 1968 चे नियम 73 अन्वये वार्षिक वेतनवाढीसाठी आहरण अधिका-याचे वार्षिक वेतनवाढ प्रमाणपत्र वेतन देयका सोबत सादर करणे आवश्यक आहे. या नियमाचे पालन झाल्याचे दिसुन येत नाही.

5) मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे जावक क्रमांक 7831, दिनांक 13/08/14 नुसार अतिरिक्त शिक्षकांचे पगार अखर्चित निधितून काढणेबाबत अयोग्य आदेश दिल्याचे आढळते.

**3.130 डयुल डेस्क खरेदीतील अनियमितताबाबत.**

**जिल्हा परिषद परभणी, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 4) -** सदरबाबत रक्कम रूपये 96,08,814/- खर्च केलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) संबंधीत डयुलडेस्क खरेदीचा संदर्भात पत्र क्रमांक 3098, दिनांक 25/06/2015 नुसार गट शिक्षणाधिकारी यांचेकडुन विद्यार्थी संख्येनुसार इयत्ता 1 ली ते 7 वी पर्यंत उपलब्ध डयुल डेस्क व आवश्यक असणारे डेस्क यांची माहिती मागविण्यात आली होती. यानुसार मानवत व परभणी वगळता उर्वरित तालुक्यांची स्वतंत्र मागणी आढळुन आली नाही. इतर 07 तालुक्यांची स्वतंत्रपणे मागणी प्राप्त न करुन घेताच पुरवठा आदेश दिला आहे.

2) या खरेदी प्रक्रीयेमध्ये खालील निविदाधारकांनी भाग नोंदविला होता:-

1) तृप्ती उद्योग, मुंबई - 5180.40
2) सारथी इंडस्ट्रीज, पुणे - 5202
3) रेड कार्पोरेशन, मुंबई - 5301.
4) शौर्य इंडस्ट्रीज, पुणे - 5202

वरीलपैकी तृप्ती उद्योग, मुंबई यांचे न्युनतम दर असल्यामुळे तृप्ती उद्योग, मुंबई यांच्याशी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, परभणी यांनी दिनांक 21/07/2015 रोजी समक्ष वाटाघाटी करुन प्राप्त दर रुपये 5,180/- ऐवजी रुपये 5,130/- निश्चित करण्यात आले. केंद्रीय दक्षता आयोगाचे स्थायी निर्देशानुसार, न्युनतम दरधारकांना सुध्दा वाटाघाटी करणे प्रतिबंधीत करण्यात आले आहे.

3) पुरवठादाराला दिलेल्या पुरवठा आदेशानुसार 30 दिवसांच्या आत साहित्याचा पुरवठा करणे आवश्यक आहे, अन्यथा नियमानुसार दंड आकारला जाईल, अशी अट आहे. सदर अट मोघम स्वरुपाची असुन विवक्षितपणे प्रती दिन आकारवयाचा दंडात्मक रकमेचा उल्लेख केलेला नाही.

4) शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परीषद, परभणी यांचे पत्र क्रमांक 3656, दिनांक 05/08/2015 नुसार खरेदी करावयाच्या डेस्कचे स्थानिक बाजार भावाचे दर कळविणेबाबत (1) वरद इंटरप्रायजेस, सोलापुर (2) द एव्हरेस्ट इंडस्ट्रीयल, गंगापुर, औरंगाबाद यांना विचारणा करण्यात आली आहे. निवडण्यात आलेले पुरवठादार मुंबईचे असुन खरेदी करावयाचे ठिकाण परभणी आहे. या दोन्ही ठिकाणच्या स्थानिक बाजार भावाच्या चौकशी न करता सोलापुर व औरंगाबाद येथील बाजार भावाची चौकशी करण्याचे प्रयोजन स्पष्ट करणे आवश्यक आहे.

5) पुरवठादार मेसर्स तृप्ती उद्योग, मुंबई यांच्याशी केलेला करारनामा रूपये 100/- च्या मुद्रांक शुल्कावर केलेला आहे. परंतु, 10 लाखापर्यंत रुपये 100/- व पुढील प्रत्येक लाखासाठी रुपये 100/- याप्रमाणे रुपये 96,08,814/- इतक्या खरेदी मुल्यावर रुपये 100/- + रूपये 8,600/- = रुपये 9,600/- इतक्या मुद्रांकावर करारनामा करणे आवश्यक असताना (9600-100) = रूपये 9,500/- चे शासन महसुलाचे नुकसान झाले आहे. ते वसुल करण्यात यावे.

6) ई - निविदा प्रक्रियेमध्ये ई - टेंडर उघडताना कार्यकारी अभियंता बांधकाम, उपअभियंता NRHM, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे डिजिटल स्वाक्षरी वापरली आहे. प्रत्यक्षात निविदा प्रक्रियेत कागदोपत्री उक्त अधिका-यांच्या स्वाक्ष-या दिसुन येत नाहीत. तसेच सदर अधिकारी खरेदी समितीचे सदस्य असल्याचे सुध्दा आढळुन आले नाही.

7) पुरवठादारांनी सादर केलेल्या सँपलची तपासणी शासकीय यंत्रणेमार्फत न करता या मेसर्स सुप्रीटेंन्डंड कंपनी ऑफ इंडीया (प्रा) लिमिटेड, मुंबई या खासगी संस्थेकडुन करण्यात आलेली आहे.

8) तालुका निहाय पुरवठा केलेल्या डयुल डेस्क डिलिव्हरी चलनाची पडताळणी केली असता तालुका पालम मधील उक्कडगाव (ज) येथे पुरवण्यात आलेल्या डिलिव्हरी चालानवर दिनांक 09/09/2015 असताना संबंधीत मुख्याध्यापकांची दिनांक 15/09/2015 ची पोच प्राप्त आहे. यावरुन डयुल डेस्क पुरवठा विहित मुदतीत झाल्याचे दिसुन येत नाही. तालुकानिहाय साठानोंदवहया उपलब्ध करुन देण्यात आल्या नाहीत. त्यामुळे दंडात्मक रक्कमेची परिगणना करता आली नाही.

**3.131 जिल्हा परीषद उपकरातुन डयुल डेस्क खरेदीतील अनियमितताबाबत.**

**जिल्हा परिषद परभणी, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 5) -** शिक्षण विभाग, जिल्हा परीषद, परभणी येथे माध्यमिक व प्राथमिक शाळांना डयुल डेस्क पुरवठा करण्यासाठी रुपये 39,96,270/- इतका खर्च प्रमाणक क्रमांक 39, दिनांक 08/01/2016 अन्वये नोंदवण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) संबंधीत माध्यमिक शाळांची डयुलडेस्क मागणी प्राप्त करुन त्यानंतर मागणी निश्चित केल्यावर प्रशासकीय व तांत्रिक मान्यता घेणे आवश्यक असताना अशी कार्यवाही केलेली नाही.

2) प्रस्तुत खरेदीच्या संचिकेचे अवलोकन केले असता सन 2015-2016 मुळ अंदाजपत्रकानुसार सदर खरेदीची प्रक्रिया विभागाने माहे मे 2015 मध्येच प्रारंभ केल्याचे दिसुन येते. मात्र दिनांक 27/05/2015 नंतर या संचिकेवर पुढील कसलीही कार्यवाही करण्यात आलेली नाही. त्यामुळे दिनांक 28/05/2015 ते 05/10/2015 पर्यंत विभागाने या खरेदी संर्दभात कसलीही कार्यवाही न करता मानव विकास योजनेअंतर्गत याच बाबीची खरेदी केलेल्या पुरवठादाराकडुन केवळ पुर्नप्रत्ययी आदेशानुसार खरेदी करण्याच्या हेतुने सदर खरेदी केलेली आहे. त्यामुळे निविदा प्रक्रिया टाळुन विवक्षित पुरवठादाराला पुरवठा आदेश दिला आहे. विषय समितीचा ठराव क्रमांक 29, दिनांक 29/05/2015 अन्वये विषय क्रमांक 5 नुसार ई - निविदाव्दारे खरेदी करण्यात यावी, असे नमुद असताना देखील ही प्रक्रिया टाळुन पुर्नप्रत्ययी आदेशाव्दारे खरेदी करण्यात आली आहे.

3) पुरवठादारांनी सादर केलेल्या सँपलची तपासणी शासकीय यंत्रणेमार्फत न करता या मेसर्स सुप्रीटेंन्डंड कंपनी ऑफ इंडीया (प्रा) लिमिटेड, मुंबई या खासगी संस्थेकडुन करण्यात आलेली आहे. त्यामुळे सदर कंपनीचा तपासणी अहवाल वैध असल्याचे प्रमाणित करता येत नाही.

4) प्रशासकीय आदेशात नमुद अट क्रमांक 15 नुसार या योजनेअंर्तगत घेण्यात येणारे डयुलडेस्क हे संबंधीत शाळेच्या विदयार्थ्यांसाठी वर्ग खोल्यांमध्ये ठेवण्यात आले किंवा नाही, याची खात्री करुन घेण्याची जबाबदारी शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांची राहील व खात्री केल्यानंतरचे प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक असताना असे प्रमाणपत्र घेतल्याचे संचिकेत दिसुन आले नाही.

5) पुरवठा आदेशानुसार प्राप्त 779 डयुलडेस्कचा पुरवठा तालुका स्तरावर खालीलप्रमाणे करण्यात आला. संबंधीत शाळांना डयुलडेस्कचा पुरवठा झाल्यानंतर साठा नोंदवहीमध्ये साहित्याची नोंद घेणे आवश्यक आहे. परंतु, संबंधीत शाळांनी साठा नोंदवही न दर्शविल्यामुळे डयुलडेस्कचा विहित मुदतीत पुरवठा झाल्याबाबत पडताळणी करता आली नाही.

**3.132 शालेय पोषण आहार योजने अंतर्गत धान्यादी मालाचा पुरवठातील अनियमितता.**

**जिल्हा परिषद परभणी, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 6) -** सदर बाबत रक्कम रूपये 6,08,61,966/- खर्च केलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

शिक्षण विभाग, जिल्हा परिषद, परभणीने सन 2015-2016 मध्ये शालेय पोषण आहार योजनेतंर्गत धान्याची मालाचा पुरवठा माहे फेब्रु व मार्च 2016 करिता शाळा स्तरावर वर्ग 1 ते 5 व 6 ते 8 करिता महाराष्ट्र तिरुपती सप्लायर्स, औरंगाबाद यांचेकडून येऊन त्यावर रुपये 6,08,61,966/- खर्च करण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे. यावर खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत:-

1) महाराष्ट्र शासन, परिपत्रक क्रमांक शापोआ-2009/प्र.क्र.383/प्राशि-4, दिनांक 26/02/2010 मधील मार्गदर्शक सुचना व शासन निर्णय क्रमांक शापोआ-2009/प्र.क्र.136, दिनांक 18/06/2009 मधील सुचनेनुसार शालेय पोषण आहार योजनेअंतर्गत धान्यादि मालाचा पुरवठा करणेसाठी दि महाराष्ट्र स्टेट को-ऑपरेटिव्ह मार्केटिंग फेडरेशन या पुरवठाधारकाशी दिनांक 21/10/2009 पासुन करारनामा करण्यात आला आहे. करारनाम्यातील अट क्रमांक 5 नुसार पुरवठाधारक नियतन केलेल्या मालाचा पुरवठा प्रत्येक शाळेमध्ये मागणीनुसर आवश्यक व तेवढयाच प्रमाणात पुरवठा करतील. निविदेतील व करारनाम्यातील अटी व शर्ती तसेच संचालनालयाच्या वरील संदर्भात वेळोवेळी निर्गमित होणारे सर्व आदेशाचे पालन करणे पुरवठाधारकास बंधनकारक असतानांही निविदेतील अटी व शर्तीचे उल्लघंन करुन कमी/ अधिक, मालाचा पुरवठा केला असल्याचे दिसून आले आहे.

2) महाराष्ट्र शासन, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन परिपत्रक क्रमांक शापोआ 2009/प्र.क्र.383/ प्राशि-4, दिनांक 26/02/2010 मधील मार्गदर्शक सुचना 3 नुसार तांदुळ व धान्यादि मालाचे पुरवठा आदेश एकाच वेळी देण्यात यावेत. तथापि, अशी कार्यवाही झालेली नाही,

3) शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन परिपत्रक क्रमांक शापोआ 2009/प्र.क्र.383/प्राशि-4, दिनांक 26/02/2010 मधील अट क्रमांक 6 नुसार शाळेकडून मागणी वेळेत प्राप्त करून घेऊन पुरवठा आदेश वेळेत पुरवठाधारकास देण्याची जवाबदारी गट शिक्षणाधिकारी /अधिक्षक शालेय पोषण आहार यांची असेल तसेच अट क्रमांक 8 नुसार सदरील पुरवठा आदेश देण्याअगोदर गट शिक्षणाधिकारी / अधिक्षक शालेय पोषण आहार हे शिक्षाधिकारी [प्राथमिक] यांची परवानगी घेतील. परंतु, शाळांची मागणी न घेता व शिक्षाधिकारी [प्राथमिक] यांची परवानगी न घेता व वेळेत मागणी नोंदविलेली दिसून येत नाही. मागील शिल्लक साठा विचारात न घेता मागणी नोंदविल्याचे दिसुन येते.

4) शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन परिपत्रक क्रमांक शापोआ 2009/प्र.क्र.383/प्राशि-4, दिनांक 26/02/2010 मधील मार्गदर्शक सुचना ड-1 नुसार धान्यादि मालाचा पुरवठा केल्यानंतर त्याचे नमुने प्रत्येकी 250 ग्रॅम प्रमाणे प्रत्येक गट शिक्षणाधिकारी, अधिक्षक (शालेय पोषण आहार) यांनी त्यांचे पत्रासोबत शासकीय प्रयोगशाळेत पाठवावेत व सदरचा गुणवत्ता अहवाल प्राप्त झाल्यानंतर देयकाच्या अदायगी करण्याच्या सूचना आहेत. परंतु, उपरोक्त प्र.क्र.537 व 540 दिनांक 31/03/2016 सोबत फक्त गट शिक्षणाधिकारी, परभणी यांनी पाठविलेल्या नमुनाबाबत गुणवत्ता अहवाल दिसून आला. बाकीच्या तालुक्यांचा गुणवत्ता अहवाल आलेला नसतांना देयकाची अदायगी केली आहे.

5) शासन परिपत्रक क्रमांक शापोअ-2009/प्र.क्र.383/प्राशी-4, दिनांक 26/02/2010 मधील मार्गदर्शक सुचना (क-4) नुसार पुरवठादारास पुरवठा आदेशाच्या दिनांकापासून 15 दिवसाचे आत मालाचा पुरवठा शालेय स्तरावर करणे बंधनकारक असल्याने व मार्गदर्शक सुचना (क-3) नुसार गट स्तरावरुन पुरवठा आदेश ज्या दिनांकापासुन काढला जाईल, त्या दिनांकापासून पुरवठा करण्यासाठीचा कालावधी गृहीत धरण्यात येत असल्याने पुरवठा विहित वेळेत झाला किंवा नाही, ते तालुकास्तरीय अभिलेखे उपलब्ध न झाल्यामुळे समजू शकले नाही तरी विलंबाने झाला असल्यास सदर परिपत्रकाप्रमाणे विलंब शुल्क वसूल केल्याची खात्री पटवावी.

6) दिनांक 21/10/2009 च्या करारनाम्यातील अट क्रमांक 9 नुसार मालाचा पुरवठा विहीत मुदतीत न केल्यास महाराष्ट्र शासन, परिपत्रक क्रमांक शापोआ-2009/प्र.क्र.383/प्राशी-4, दिनांक 26/02/2010 मधील मार्गदर्शक सुचना (क-6) नुसार प्रारंभिक पुरवठा 2 महिन्यासाठी करण्यात येऊन त्यानंतर 1 महिन्यासाठी पुरेल एवढे धान्यादि मालाचा पुरवठा करण्यात यावा. शाळेमध्ये 20 दिवस पुरेल इतका साठा शिल्लक असतांना नवीन पुरवठा आदेश देण्यात यावेत. तथापि, वरीलप्रमाणे परिपत्रकातील मार्गदर्शक सुचनांचे पालन न करता व मागील शिल्लक साठा नमुद न करता दोन- दोन महिन्यांकरिता एकत्रीत पुरवठा आदेश देण्याची कार्यवाही करण्यात आली आहे.

7) वरील परिपत्रकातील मार्गदर्शक सुचना (ग) नुसार पुरवठा केलेल्या धान्यादि मालासाठी स्वतंत्र साठा नोंदवही व अभिप्राय पुस्तिका ठेवण्यात येऊन अभिप्राय पुस्तिकेत आहाराच्या दर्जाबाबत वेळोवेळी ग्राम शिक्षण समिती सदस्य, माता, पालक व अधिका-याचे अभिप्राय घेण्यात यावेत. तथापि, अशी कार्यवाही झालेली नाही.

8) गट शिक्षणाधिकारी यांनी दिलेल्या प्रमाणपत्रामध्ये दिनांक, किती माल मिळाला, कोणत्या तारखेस मिळाला, जावक क्रमांक व दिनांक याचा उल्लेख नाही.

**3.133 शालेय पोषण आहार योजनेअंतर्गत (केंद्र व राज्य हिस्सा) ग्रामीण भागातील शाळेला धान्यादि मालपुरवठा करणे वरील खर्चाबाबत.**

**जिल्हा परिषद हिंगोली, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 2) -** सदर योजनेअंतर्गत रक्कम रूपये 1,44,86,304/- खर्च नोंदविणेत आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, परिपत्रक क्रमांक शापोआ 2009/ प्र.क्र.383/ प्रा.शि.-4, दिनांक 26/02/2010 मधील कलम (3) नुसार गट स्तरावरून पुरवठा आदेशानुसार तांदळाची वाहतुक व इतर धान्यांदी मालाचा पुरवठा एकाच वेळी द्यावेत, असे असताना त्याप्रमाणे कार्यवाही केली किंवा नाही, याबाबत अर्धसमास पत्र क्रमांक 01, दिनांक 05/06/2017 देऊनही पुरवठा आदेशाची संचिका लेखपरीक्षणात उपलब्ध केली नाही. त्यामुळे पुरवठा आदेश केव्हा दिले आहेत? हे समजू शकले नाही. लेखापरीक्षणात शालेय पोषण आहाराचे प्रमाणक व साठा नोंदवही उपलब्ध केली. त्या व्यतिरिक्त कोणतेच अभिलेखे लेखापरीक्षणास उपलब्ध केले नाहीत. गट शिक्षणाधिकारी कार्यालयाचे तालुका स्तरावरील धान्यादी मालाची मागणी, अंतर्गत शाळेच्या मुख्याध्यापक यांची मागणी इत्यादीचे अभिलेखे लेखपरीक्षणास उपलब्ध केले नसल्यामुळे झालेला पुरवठा योग्य असल्याची खात्री करता आली नाही.

2) महाराष्ट्र शासन, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, परिपत्रक क्रमांक शालेय पोषण आहार 2009/प्र.क्र.383/प्रशि-4, दिनांक 26/02/2010 मधील (ड-9) नुसार पुरवठाधारकाने धान्यादी मालाचा पुरवठा केल्यानंतर तपासणी अहवाल लेखापरीक्षणास उपलब्ध झाला नाही. त्यामुळे योग्य दर्जाचा धान्यादी पुरवठा केल्याची खात्री करता आली नाही.

3) प्राथमिक शिक्षण संचालक यांचे परिपत्रक क्रमांक शापोआ/सुधावो/प्रशिस/303/2011-12/7177(3), दिनांक 01/11/2011 नुसार महाराष्ट्र स्टेट को. ऑप कंझुमर्स फेड्रेशन लि., औरंगाबाद यांचेकडून धान्यादी मालाच्या देयकाची 90 टक्के रक्कम प्रयोगशाळेचा तपासणी अहवाल समाधनकारक आल्यानंतरच अदा करावी व जिल्ह्यातील शालेय पोषण आहाराच्या पुरवठा संदर्भात तक्रारी असल्यास उर्वरीत 10 टक्के रक्कम शिक्षण संचालक (प्राथमिक) यांच्या मान्यतेने आदा करावी. परंतु, धान्यादी मालाच्या पुरवठ्याची 100 टक्के अदाई एकाच वेळी प्रदान करण्यात आले आहे.

4) शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, शासन निर्णय क्रमांक शापोआ-2012/प्र.क्र.484/प्राशी-4, दिनांक 14/06/2013 नुसार शालेय पोषण आहार या केंद्र शासनाच्या योजनेअंतर्गत 1 ली ते 5 वी प्राथमिक वर्गाच्या विद्यार्थ्यांना Other Health Intervention पुरविण्यास मंजूरी देण्यात आली आहे. मायक्रोन्यूट्रीयंट सप्लीमेंट आय.एफ.ए. सिरप व इंटरनल फिडपावडर पुरवठा करण्यात यावा, असे आदेशित आहे. याप्रमाणे कार्यवाही झाल्याचे अभिलेखे उपलब्ध झाले नाहीत.

5) शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, शासन निर्णय क्रमांक शापोआ-2012/प्र.क्र.282/प्रशी-4, दिनांक 19/06/2013 नुसार शालेय पोषण आहार या केंद्र शासनाच्या योजनेअंतर्गत इयत्ता 6 ते 8 च्या विद्यार्थ्यांना Weekly Iron and folic supplementation योजना राबविण्यासाठी केंद्र सरकारने मार्गदर्शन सुचनांमध्ये विहित केल्याप्रमाणे Iron गोळयांचा पुरवठा करण्यात यावा. याप्रमाणे कार्यवाही करण्यात आल्याबाबत योग्य त्या अभिलेख्याधारे कळू शकले नाही.

6) देयकाची तपासणी केली असता सर्व पंचायत समितीने गट शिक्षणाधिकारी यांना तुरडाळ, हरभरा, वाटाणा, पुरवठा केल्याचे नोंदविले आहे. परंतु, महाराष्ट्र शासन, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, शासन निर्णय

क्रमांक शापोआ-2010/प्र.क्र.18/प्राशी-4, दिनांक 02/02/2011 अन्वये परिशिष्ट अ मध्ये शालेय पोषण आहार योजनेअंतर्गत द्यावयाचा पाककृतीचा तपशिल दिलेला आहे. त्यामध्ये डाळ-तांदळाची खिचडी, मसाले भात, पुलाव इयत्ता 1 ते 5 व 6 ते 8 साठी पाककृतीत तांदुळ, मुगडाळ, तेल, हळद, मीठ, जीरे, खोबरे इत्यादी दिलेले आहे. परंतु, त्यात तुरडाळ दिलेली नसुन मुगडाळीचा उल्लेख केला आहे हे नियमानुसार दिसून येत नाही. तसेच प्रत्येक दिवशी कोणती पाककृती केली? याचे अभिलेखे उपलब्ध न झाल्यामुळे शासन आदेशाप्रमाणे अंमलबजावणी झाल्याची खात्री करता आली नाही.

7) महाराष्ट्र शासन, शिक्षण विभाग, शासन निर्णय क्रमांक 5/प्रशा/1095/2134/प्राशी-2, दिनांक 22/11/1995 नुसार इयत्ता 5 वी तील विद्यार्थ्यांना शालेय पोषण आहार योजना लागु करण्यात आलेली आहे. शिक्षण उपसंचालक प्राथमिक यांचे पत्र क्रमांक शालेय पोषण आहार 2007-08/तरतुद/ प्राशी30119563, दिनांक 31/05/2007 नुसार विद्यार्थी संख्येच्या प्रमाणानुसार अनुदान देण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे. परंतु, अर्धसमास पत्र क्रमांक 03, दिनांक 30/08/2016 नुसार मागणी करूनही शालेय पोषण आहाराची संचिका उपलब्ध केली नाही. त्यामुळे शासन निर्णयानुसार अंमलबजावणी झाल्याची खात्री करता आली नाही**.**

**3.134 संगणक अर्हता प्राप्त करून न घेतलेल्या शिक्षकांच्या वेतनवाढी नियमित निर्गमित केले आहेत अथवा नाही याबाबतचा तपशील सादर करणेबाबत.**

**जिल्हा परिषद हिंगोली सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 5) -** शिक्षण विभाग, जिल्हा परिषद, हिंगोली चे सन 2015-2016 या वर्षाचे लेखापरीक्षणात ज्या शिक्षकांनी अद्यापही संगणक अर्हता प्राप्त करून घेतलेली नाही. त्यांची माहिती सादर करण्यात आलेली नाही. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक प्रशिक्षण-2000/प्र.क्र.61/2001/39, दिनांक 07/08/2001 अन्वये सर्व शासकीय अधिकारी / कर्मचारी यांना संगणक अर्हता परिक्षा उत्तीर्ण होणे अनिवार्य करण्यात आलेले आहे.

2) सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक प्रशिक्षण-2000/प्र.क्र.5/2001/39, दिनांक 20/07/2002 नुसार सर्व अधिकारी / कर्मचारी यांनी संगणक हाताळणी व वापराबाबतचे प्रमाणपत्र शासनमान्य संस्थेकडून प्राप्त करून सादर करणे आवश्यक आहे. तसेच विहित मुदतीत प्रमाणपत्र सादर न केल्यास किंवा परिक्षा उत्तीर्ण होण्यापासून सुट देण्यात येईपर्यंतच्या कालावधीकरीता वेतनवाढी रोखून ठेवण्यात येतील.

3) सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक मातंसं/नस्ती 04/224/39, दिनांक 05/05/2007 नुसार संगणक अर्हता परिक्षा उत्तीर्ण करून प्रमाणपत्र शासनास सादर करण्यासाठी दिनांक 01/01/2007 पासून दिनांक 31/12/2007 पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. दिनांक 31/12/2007 पर्यंत संगणक अर्हता प्राप्त करून घेणे आवश्यक होते व ज्यांनी अशी अर्हता प्राप्त करून घेतलेली नाही, त्यांची दिनांक 01/07/2008 रोजी देय असलेली वेतनवाढ मंजूर न करता स्थगित ठेऊन, ज्या दिनांकास संबंधिताने संगणक अर्हता प्राप्त करून घेतली, त्या दिनांकास सदर वेतनवाढ मंजूर करणे आवश्यक होते. याप्रमाणे कार्यवाही करण्यात आली आहे काय? तसेच अशी कार्यवाही केली नसल्यास संबंधीत शिक्षकांचे नावासह त्यांची दिनांक 01/07/2008 रोजी मंजूर केलेली वेतनवाढ, वेतन अधिक ग्रेड वेतन व त्यानंतर मंजूर करण्यात आलेल्या सर्व वेतनवाढीचा तपशील लेखापरीक्षणास सादर करण्यासाठी अर्धसमास पत्र क्रमांक 03, दिनांक 13/06/2017 नुसार अभिप्राय देण्यात आलेले नाहीत.

उपरोक्त शासन निर्णयानुसार कार्यवाही करण्यात आली नसल्यास संबंधितांच्या वेतनवाढी रोखुन ठेवण्याबाबत कारवाई करणे आवश्यक आहे. तसेच दिनांक 01/07/2008 नंतर मंजूर करण्यात आलेल्या वेतनवाढी रद्द करून ज्या दिनांकास संबंधीतांनी संगणक अर्हता प्राप्त करून घेतली आहे, त्या दिनांकापर्यंत जादा प्रदान झालेली वेतनवाढीची रक्कम संबंधीतांकडून वसूल करणे आवश्यक आहे.

**3.135 शालेय पोषण आहार धान्यादी मालाचे पुरवठाबाबत.**

**जिल्हा परिषद नांदेड, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 2) -** सदरबाबत रक्कम रूपये 3,24,46,266/- खर्च करण्यात आलेले आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) शाळानिहाय, तालुकानिहाय सन 2015-2016 मधील मागणी, पुरवठा आदेशानुसार करण्यात आलेली मागणी व सन 2015-2016 मध्ये प्रत्यक्ष प्राप्त झालेला धान्यादी माल याबाबतचा तपशील उपलब्ध करुन देण्याबाबत अर्धसमास पत्र क्रमांक 02 दिनांक 21/04/2017, पत्र क्रमांक 04 दिनांक 21/04/2017, पत्र क्रमांक 06 दिनांक 25/04/2017, पत्र क्रमांक 18 दिनांक 12/05/2017 नुसार मागणी करण्यात येवुन देखील तपशील उपलब्ध करुन देण्यात आला नाही. शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे परिपत्रक क्रमांक शापोना/सुधायो/प्राशासि/307/2014-15/3288, दिनांक 11/06/2014 मधील सुचना परिच्छेद क्रमांक 03 नुसार कार्यवाही केल्याबाबत अभिलेखे दर्शविले नाहीत. त्यामुळे मागणीप्रमाणे पुरवठा झाल्याची खात्री पटु शकली नाही. सन 2015-2016 च्या AWP (ANNUAL WORK PROGAME) नुसार विद्यार्थी संख्येनुसार लाभार्थी संख्या निश्चीत करण्यात आली आहे. त्यानुसार मागणी करण्यात झाले बाबत खात्री पटवावी.

2) शिक्षण सहसंचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्रमांक शापोआ/पुरवठा मुदतवाढ/ 2015/303/4291, दिनांक 04/09/2015 नुसार शालेय व्यवस्थापन समिती यांचे संनियंत्रण वाढविण्यासाठी नियमीत नियंत्रणासोबत महिन्यातुन दोन दिवस समितीतील किमान 02 सदस्यांनी स्वत: शालेय पोषण आहार खाऊन बघावा. त्यामध्ये त्यांची काही तक्रार असल्यास त्यादिवशी शिजवलेल्या आहारात वापरण्यात आलेल्या मालापैकी ज्या धान्याच्या गुणवत्तेमुळे तक्रार निर्माण झाली, त्या धान्याचा लॉटच्या एकुण मालाचे देयक अदा करु नये, असे नमुद आहे. अशी कार्यवाही केल्याचे अहवाल दर्शविले नाहीत.

तसेच शाळा स्तरांवर माल वजन करुनच उतरवुन घ्यावा व त्यानंतरच पोहोच देण्यात यावी, असे नमुद असतांना तशी कार्यवाही केल्याचा अहवाल दर्शविला नाही.

3) प्राथमिक शिक्षण संचालनालय यांचे परिपत्रक क्रमांक शापोआ/सुधायो/प्रशिस/307/2014, मधील सुचना क्रमांक 02 नुसार पहील्या 02 महिन्यासाठी तांदुळ व धान्यादी मालाचा पुरवठा आदेश तात्काळ देण्यात यावा. त्यानंतर किमान 20 दिवस अगोदर पुरवठादारास दोन महिन्याचे तांदुळ आणि दोन महिन्याचे कालावधीसाठी पुरेल एवढ्या धान्यादी मालाचा पुरवठा आदेश द्यावेत व त्याप्रमाणे नियमित पुरवठा होईल, याची दक्षता घ्यावी, असे स्पष्ट नमुद आहे. तसेच सुचना क्रमांक 14 नुसार वर्षातील ठरवुन दिलेल्या शालेय दिवसांमध्ये एकही शालेय दिवस खंड पडल्यास संबंधीतावर योग्य ती कार्यवाही करण्यात येईल, असे निर्देश असतानाही गट शिक्षणाधिकारी कार्यालयाच्या अंतर्गत शाळांनी सदर नियमांची अंमलबजावणी केल्याचे दिसुन येत नाही.

4) प्राथमिक शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्रमांक शापोआ/सुधायो/प्रशिस/307/ 2014-15/3288, दिनांक 11/06/2014 तसेच करारनामा दिनांक 11/06/2014 अट क्रमांक 24 नुसार जिल्हास्तरावरील देयके मुख्य लेखा व वित्त अधिकारी हे सदर धान्यादी मालाच्या देयकातील प्रथम 90 टक्के रक्कम प्रयोग शाळेचा तपासणी अहवाल समाधानकारक आल्यानंतरच अदा करतील व जिल्ह्यातील शालेय पोषण आहाराच्या पुरवण्यासंदर्भात काही तक्रारी असल्यास उर्वरीत 10 टक्के रक्कम मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या मान्यतेने अदा करण्यात येईल, असे नमुद असतांना पुर्ण रक्कम अदा केली आहे.

5) करानामातील अट क्रमांक 35 मध्ये नमुद केल्यानुसार निविदा प्रक्रीयामध्ये सादर करण्यात आलेले धान्यादी मालाचे नमुने ज्या दर्जाचे होते, त्याच दर्जाच्या मालाचा पुरवठा करणे बंधनकारक राहील. त्याप्रमाणे कार्यवाही केल्याचा अहवाल दर्शविला नाही.

**3.136 वकील फी प्रदानातील अनियमितताबाबत.**

**जिल्हा परिषद नांदेड, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 3) -** सदरबाबत रक्कम रूपये 3,04,000/- खर्च करण्यात आलेले आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) संबंधीत विधीज्ञांना कायदेविषयक सल्लागार म्हणुन नेमणुक केल्याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांचे नियुक्ती आदेश दर्शविले नाहीत.

2) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम 1961 चे कलम 44 प्रमाणे कालबाह्य देयकास मुख्य कार्यकारी अधिकारी यांची मान्यता न घेता देयके प्रदान केली आहेत.

**3.137 प्राथमिक शिक्षकांची पदे अतिरीक्त असताना वस्तीशाळा निमशिक्षकांना नेमणूका देऊन शासन निधीची हानी केलेबाबत.**

**जिल्हा परिषद उस्मानाबाद, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 7) -** महाराष्ट्र शासन, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन निर्णय क्रमांक एसएसए-2012/प्र.क्र.250/प्रशि-4, दिनांक 01/03/2014 चे परिच्छेद 6 अन्वये वस्तीशाळा निमशिक्षकांना जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये रिक्त पदावर कायमस्वरुपी वेतनश्रेणीवर सामावून घेऊन त्यांचे समायोजन करावयाचे आहे. तथापि, रिक्त पदे नसताना समायोजन केलेले आहे.

वस्तीशाळा समायोजन संचिका तपासता टिपणी क्रमांक 15 मध्ये उपशिक्षणाधिकारी यांनी आर.टी.ई.ॲक्ट 2009 नुसार शिक्षकांची पदे अतिरीक्त होत आहे व टिपणी क्रमांक 20 नुसार अतिरीक्त शिक्षकांची स्थिती दर्शविली आहे. यावर लेखापरीक्षणात खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत:-

1) महाराष्ट्र शासन, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन निर्णय क्रमांक एसएसए-2012/प्र.क्र.250/ प्रशि-4, दिनांक 01/03/2014 चे परिच्छेद 6 अन्वये वस्तीशाळा निमशिक्षकांना जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये रिक्त पदावर कायमस्वरुपी वेतनश्रेणीवर सामावून घेऊन त्यांचे समायोजन करावयाचे आहे. तथापि, रिक्त पदे नसताना समायोजन केलेले आहे.

2) वस्तीशाळा समायोजन संचीका तपासता टिपणी क्रमांक 15 मध्ये उपशिक्षणाधिकारी यांनी आर.टी.ई.ॲक्ट 2009 नुसार शिक्षकांची पदे अतिरीक्त होत आहे.

3) टिपणी क्रमांक 24 नुसार अतिरीक्त 713 शिक्षकांमध्ये 126 वस्तीशाळा शिक्षकांचा समावेश असल्याचे नमूद केलेले आहे. त्यामुळे वस्तीशाळा निमशिक्षकांव्यतिरीक्त पूर्वीपासून जिल्हा परिषद सेवेत नियमीत शिक्षक पदावरील 587 शिक्षक अतिरीक्त ठरतात.

4) टिपणी क्रमांक 38 व 39 नुसार सामान्य प्रशासन विभागाने पूर्वीच कार्यरत असलेल्या नियमित शिक्षकांच्या समायोजनानंतर वस्तीशाळा निमशिक्षकांना सामावून घेण्यात यावे. असे अभिप्राय नोंदवूनही वस्तीशाळा निमशिक्षकांना जिल्हा परिषद प्राथमिक शाळामध्ये प्राथमिक शिक्षक म्हणून सेवेत सामावून घेतलेले आहे.

5) जिल्हा परिषद, उस्मानाबाद अंतर्गत शिक्षण विभागाकडे पूर्वीचेच नियमित शिक्षक अतिरीक्त असताना वस्तीशाळा निमशिक्षकांना प्राथमीक शाळेवर नियमीत शिक्षक म्हणून नेमणूक दिल्यामुळे शासनाचे सन 2015-2016 वर्षात रुपये 2,51,20,567/- चे नुकसान झालेले आहे. याबाबत जबाबदारी निश्चित होणे आवश्यक आहे.

**3.138 आदर्श शाळा योजना अंतर्गत केलेल्या नियमबाह्य खर्चाबाबत.**

**जिल्हा परिषद लातूर, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 5) -** सदरबाबत रक्कम रूपये 14,39,700/- खर्च केलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) आदर्श शाळा (स्मार्ट स्कूल) योजनेवर उपरोक्त प्रमाणे केलेल्या खर्चाबाबत नमुन्या दाखल (प्राथमिक शाळा सामनगाव, बोकणगाव, हटकरवाडी, चिंचोली, तळीखेड, बोर्सुरी, धानुरी या प्राथमिक शाळा) प्राथमिक शाळा स्तरावरील लेख्यांची तपासणी केली असता सर्वच शाळांनी साई-श्रध्दा इन्फोटेक या एकच विक्रेत्याकडून खरेदी केल्याचे निर्दशनास आले. शिक्षण विभाग, जिल्हा परिषद, लातूर यांनी केंद्रीय स्तरावर महाराष्ट्र शासन, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांक भांखस-2014/प्र.क्र.82/भाग-III/उद्योग-4, दिनांक 30/10/2015 नुसार साहित्य खरेदी ई-निविदाव्दारे होणे आवश्यक होते. तथापि अशी कार्यवाही टाळण्याच्या उद्देशाने पंचायत समिती स्तरावर वर्षाच्या शेवटी दिनांक 31/03/2016 रोजी रक्कम वितरीत केली आहे.

2) सदर योजनेच्या तपशीलात नमूद केल्याप्रमाणे सॉफ्टवेअरर्स व टी.व्ही. संच या बाबीवर खर्च करण्यास नमूद करण्यात आले आहे. तथापि नमुन्यादाखल प्राथमिक शाळा स्तरावरील लेख्याची तपासणी केली असता सर्वच शाळांनी साई-श्रध्दा इन्फोटेक यांचे प्रदान केल्याचे निदर्शनास आले.

सदर पावती मध्ये नमूद केल्याप्रमाणे अ.क्र.4,5 मधील बाब पडदे व चटईचा समावेश स्मार्ट स्कूल योजनेच्या खरेदी करावयाच्या बाबी मध्ये नाही. त्यामुळे अ.क्र.4,5,चा खर्च रुपये 1,200 + 4,800 = रुपये 6,000 x एकूण 30 शाळा = रुपये 1,80,000/- चा खर्च मान्य करता येत नाही. तो संबधीताकडून वसूल करून पूर्तता दर्शवावी.

3) नमुनादाखल प्राथमिक शाळा स्तरावरील लेख्याची तपासणी केली असता उपरोक्त प्रमाणे साहित्य प्राप्त झालेबाबत साठा नोंदवहीमध्ये नोंद घेतल्याचे आढळून आले नाही.

4) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 79 नुसार देयक रक्कम प्रदानानंतर ती विरुपित करणे आवश्यक असताना उपप्रमाणके विरुपित केली नाहीत.

5) ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए 2008/प्र.क्र.446/वित्त-9, दिनांक 20/06/2008 नुसार जिल्हा परिषदेकडील योजनांचे अंमलबजावणीचे वेळापत्रक ठरविण्यात आलेले असून निर्धारित वेळेनुसार प्रत्येक टप्प्याची कार्यवाही पूर्ण करण्याची जबाबदारी मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी प्रथमत: निश्चित करावी व त्याप्रमाणे अंमलबजावणीचे विविध टप्पे मुदतीमध्ये पूर्ण करावेत. परंतु विभागाने उपरोक्त शासन परिपत्रकातील वेळापत्रकाप्रमाणे कोणतीही कार्यवाही केलेली नाही. व प्रत्येक बाब विलंबाने केलेली आहे.

**3.139 शालेय पोषण आहार योजनेतील अनियमिततेबाबत.**

**जिल्हा परिषद लातूर, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 7) -** सदरबाबत रक्कम रूपये 6,28,03,529/- खर्च केलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) प्रयोगशाळेचा अहवाल समाधानकारक प्राप्त झालेनंतरच पुरवठादाराने सादर केलेल्या देयकाच्या एकूण रक्कमेच्या 90 टक्के रक्कम अदा करावी व शालेय पोषण आहाराच्या पुरवठ्याच्या संदर्भात काही तक्रार नसल्यास उर्वरित 10 टक्के रक्कम प्रदान करावी अशी तरतूद करारनाम्यात असतानाही याप्रमाणे कार्यवाही करण्यात नाही.

2) करारनाम्यातील अट क्र,03 अन्वये तालुक्याची शाळानिहाय मागणी गटशिक्षण अधिकारी हे शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांचेकडे करतील व शिक्षणाधिकारी हे जिल्ह्यातील एकूण मागणीनुसार पुरवठा आदेश पुरवठादारास देतील व त्याची एक प्रत पंचायत समिती स्तरावर दिली पाहिजे. तथापि शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांचेकडून संपूर्ण जिल्ह्याची शाळानिहाय तांदूळ व धान्यादी मालाची एकूण मागणी नोंदविण्यात येत नाही.

3) करारनाम्यातील अट 13 नुसार पुरवठादार शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांचे कार्यालयात पुरवठा करण्यात आलेल्या आहारासंबधी पावत्या प्राप्त करून देईन. त्याकरिता चार रंगाच्या पावत्या पुरवठादार छापुन घेईन 1 गुलाबी, 2 पिवळी, 3 पंढरी, 4 निळी या चार रंगापैकी गुलाबी रंगाची पावती आहार घेणाऱ्या शाळेच्या प्रमुखाकडे राहील. पिवळ्या रंगाची पावती पुरवठादार देयकासोबत जोडून गटशिक्षण अधिकारी / अधिक्षक (शालेय पोषण आहार) यांचेकडून तपासणी करून देयके शिक्षण अधिकारी (प्राथमिक) यांचेकडे सादर करील असे असताना सदरील देयकासोबत पिवळ्या रंगाची पावती जोडली नाही.

4) करारनाम्यातील अट क्र.14 नुसार प्रारंभिक पुरवठा दोन महिन्यासाठी असेल त्यानंतर तांदळाचे व इतर धान्यादी मालाचे दोन महिन्याचे पुरवठा आदेश देण्यात येतील शाळेमध्ये 20 दिवस पुरेल एवढा साठा शिल्लक असताना नवीन पुरवठा आदेश देण्यात येतील असे असताना बऱ्याच शाळेमध्ये तांदूळ / धान्यादी माल संपल्यामुळेशालेय पोषण आहार काही कालावधीसाठी बंद ठेवण्यात आला आहे.

उपरोक्त कालावधीमध्ये शालेय पोषण आहाराचे वाटप करण्यात आलेले नाही. त्यामुळे शालेय पोषण आहारापासून विद्यार्थी वंचित राहिल्यामुळे शासनाच्या योजनेचा मुळ उद्देश सफल झाला नाही.

5) करारनाम्यातील अट क्र.7 नुसार पुरवठाधारक, शाळेने मागणी केलेल्या मालाचा पुरवठा शाळेपर्यंत करील तसेच मालाचा पुरवठा प्रत्येक शाळेमध्ये मागणी पत्रानुसार आवश्यक तेवढाच प्रमाणात करील असे असताना पुरवठा

धारकाने शाळेने मागणी केलेल्या मालाचा पुरवठा कमी प्रमाणात केल्याचे तसेच मागणी केलेले साहित्य ऐवजी दुसरी वस्तू पुरवठा करणे दिसून येते. तसेच मालाचा पुरवठा सुस्थितीत न करता तालुका स्तरावर शिक्षणाधिकारी / अधिक्षक शालेय पोषण आहार यांचेशी समन्वय न ठेवता व धान्यादी मालाच्या साठ्याची वेळोवेळी आढावा न घेता मालाचा पुरवठा केल्याचे स्पष्ट होते.